CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २८४ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



धर्म जितका उच्च स्तरावर आहे तितकाच तो खोल व गहन आहे, जितका व्यक्तीकेंद्रित तितकाच समष्टिव्यापक आहे, जितका जुना तितकाच नवा आहे; जितका चिरंतन तितकाच गतिमान आहे, जितका बहुआयामी तितका एकाग्र आहे. तो सर्वभूत हितकारी असा अमृत कलश आहे, विश्वकल्याणी कल्पवृक्ष आहे.

- रंगा हरी
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## आज तान्हा पोळा



## महत्त्वाचे

### सोमवारी प्रभागरचना होणार जाहीर

**नवी दिल्ली** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोग आणि प्रशासनाचे काम सुरू झाले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, राज्य निवडणूक आयोग मुंबईसह अ, ब, आणि क वर्गातील महापालिकांची प्रभाग रचना २५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करणार आहे. या निवडणुकांच्या तयारीसाठी २२ ते २८ ऑगस्ट या कालावधीत प्रभाग रचनेवर हरकती आणि सूचना मागवण्यात येणार होत्या. मात्र, काही महापालिकांनी प्रभाग रचनेचे प्रस्ताव आयोगाकडे उशिरा पाठवल्यामुळे, आता प्रभाग रचना सोमवारी (२५ ऑगस्ट) प्रसिद्ध केली जाणार असल्याचे बोलले जात आहे. प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर हरकती आणि सूचना मागवून सुनावणी घेतली जाईल. त्यानंतर प्रभाग रचनेला अंतिम स्वरूप देऊन तो आराखडा नगरविकास विभागाकडे पाठवण्यात येईल. सध्या राज्यातील २९ महापालिकांपैकी १० महापालिकांच्या प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाला मिळाल्या आहेत. मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, वसई-विरार, नवी मुंबई या महापालिकांचा समावेश आहे. गट 'ड' मधील महापालिकांच्या प्रभाग रचनाही लवकरच प्राप्त होत आहेत. निवडणूक आयोगाकडून यापैकी बहुतांश महापालिकांच्या प्रभाग रचना सोमवारी प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल. ड वर्गाच्या महापालिकांच्या प्रभाग रचना ३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणार असून त्यानंतर हरकती मागवल्या जातील.

### ऑनलाईन मनी गेमिंगवर अखेर बंदी

**नवी दिल्ली** : संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सरकारने ऑनलाईन मनी गेमिंगवर बंदी घालणारे विधेयक मांडले होते. लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर झाल्यानंतर या विधेयकाला आज अखेर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही मंजुरी मिळाली आहे. म्हणजेच, आता या ऑनलाईन गेमिंगवर बंदी घालणाऱ्या या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हे विधेयक दोन्ही सभागृहांत मांडले. देशातील ऑनलाईन गेमिंग उद्योग ३.८ अब्ज रुपयांचा आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे देशातील ऑनलाईन गेमिंग उद्योगाला मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, विधेयक मंजूर झाल्यापासून ड्रीम ११ आणि माय इलेव्हन सर्कलसारख्या फॅन्टसी गेमिंग ॲप्सनी त्यांच्या प्लॅटफॉर्मवर रिअल मनी गेम्स बंद केले आहेत.

# श्वानांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालण्यावर बंदी

## सर्वोच्च न्यायालयाचा आदेश, लसीकरणानंतर करावे मुक्त

◆ **नवी दिल्ली, २२ ऑगस्ट**

राजधानी दिल्लीतून ताब्यात घेतलेल्या सर्व भटक्या श्वानांना लसीकरण व निर्बिजीकरण केल्यानंतर निवारागृहातून सोडण्यात यावे, असा महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्याच दोन सदस्यीय न्यायासनाने ११ ऑगस्ट रोजी दिलेला निर्णय बदलत सुधारित निकाल दिला आहे. तसेच श्वानांना अन्न देण्यासाठी एक विशिष्ट ठिकाण निश्चित करावे, असा निर्देश देत सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी, असे निकालात नमूद केले आहे.



न्यायालयाच्या निकालानंतर श्वानप्रेमींनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला

प्राणीप्रेमी किंवा भटक्या श्वानांना खाऊ घालणाऱ्यांसाठी हा मुद्दा भावनिक झालेला असताना या श्वानांमुळे प्रचंड मनस्ताप आणि प्रसंगी शारीरिक इजा सहन कराव्या लागणाऱ्यांसाठी हा मुद्दा महत्त्वाचा ठरला आहे. या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयातील या प्रकरणाच्या सुनावणीकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. विशेष म्हणजे यायालयाने शुक्रवारी दिलेले आदेश जरी राजधानी दिल्लीशी निगडित प्रकरणी दिले असले, तरी ते देशातील सर्व राज्यांना लागू असतील, असं न्यायालयाने नमूद केलं आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता व न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या न्यायासनासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. ज्या कुत्र्यांना रेबिजची लागण झाली आहे किंवा जे कुत्रे आक्रमक वर्तन करताना दिसत आहेत, अशा कुत्र्यांनाच फक्त त्यांच्यासाठीच्या निवारा केंद्रांमध्ये ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भात ११ ऑगस्ट रोजी दोन सदस्यीय न्यायासनाने दिलेल्या निर्णयात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. तसेच कोणतीही व्यक्ती वा संस्था प्रशासकीय अधिकारी वा कर्मचाऱ्यांना यासंदर्भातील त्यांची कर्तव्ये पार पाडण्यापासून रोखू शकत नाहीत. यात अडथळा आणणाऱ्यांना दंड ठोठावला जाणार आहे. (वृत्तसंस्था)

### निकालातील महत्त्वपूर्ण मुद्दे

- रस्त्यावर भटक्या श्वानांना खाऊ घालण्यावर बंदी
- अन्न खाऊ घालण्यासाठी स्वतंत्र जागेची व्यवस्था करावी
- रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांना दत्तक घेण्यासाठी प्राणीप्रेमी अर्ज सादर करू शकतात. एकदा संबंधित कुत्र्याला त्यांनी दत्तक घेतले, की त्यानंतर ते कुत्रे पुन्हा रस्त्यावर येणार नाहीत, याची जबाबदारी संबंधित प्राणीप्रेमींची असेल.
- ज्या प्राणीप्रेमी व संस्थांनी सर्वोच्च न्यायालयाने कुत्र्यांबाबत ८ ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशांना आव्हान देणारी याचिका केली होती, त्यांनी अनुक्रमे २५ हजार व २ लाख रुपये रजिस्ट्रारकडे दंडाची रक्कम म्हणून जमा करावी

बिहार मतदार यादी पुनरीक्षण

# मतदार नोंदणीसाठी आधार स्वीकारा

## सर्वोच्च न्यायालयाचा आयोगाला आदेश

◆ **नवी दिल्ली, २२ ऑगस्ट**

बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष मतदारयादीतील सुधारणेवर आक्षेप घेणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी मतदार नोंदणीसाठी आधार कार्डसह ११ कागदपत्रे ग्राह्य धरण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले. मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांना ऑनलाईन अर्ज करूनदेखील उपरोक्त कागदपत्रे सादर करता येणार असल्याचा निर्णय यावेळी न्यायासनाने दिला. ११ कागदपत्रांपैकी आधार कार्डसह ड्रायव्हिंग लायसन्स, बँक खाते पुस्तिका, पाणी बिल यांचाही समावेश राहणार आहे.




न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने बिहार मतदारयादी पुनरीक्षण प्रकरणी केलेल्या सुनावणीत मतदारांची नावे दुरुस्त करण्यासाठी राजकीय पक्ष पुढे येत नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. एसआयआर मोहिमेत ६० लाखांपेक्षा मतदारांना वगळण्यात आले असताना राज्यातील १२ राजकीय पक्षांपैकी केवळ तीनच पक्षांनी यावर आक्षेप घेतला ही गंभीर बाब आहे.

तसेच ८५,००० नवीन मतदार यादीत आले आणि राजकीय पक्षांच्या मतदान केंद्र सदस्यांनी यावर केवळ दोन आक्षेप दाखल केल्याच्या निवडणूक आयोगाच्या विधानावर न्यायासनाने आश्चर्य व्यक्त केले.

### वगळलेल्या मतदारांचा तपशील जारी

निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करून म्हटले की १४ ऑगस्टच्या न्यायासनाच्या आदेशानुसार प्रारूप मतदार यादीत समाविष्ट नसलेल्या बिहारमधील ६५ लाख मतदारांची नावे आणि तपशील राज्यातील सर्व ३८ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर टाकण्यात आले. निवडणूक आयोगाने यादीत त्यांचा समावेश न होण्याची कारणे देखील सांगितली.

बिहारमधील सर्व १२ राजकीय पक्षांना आधार कार्डसह ११ कागदपत्रे आणि आवश्यक फॉर्म दाखल करण्यासाठी मतदार यादीतून वगळलेल्या ६५ लाख लोकांना मदत करण्याचे निर्देश दिले. याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वतःहून किंवा बीएलएच्या मदतीने ऑनलाइन अर्ज करू शकते आणि अर्ज प्रत्यक्ष स्वरूपात सादर करणे आवश्यक नसल्याचे नमूद केले.

**पुढील सुनावणी ८ सप्टेंबर रोजी**

सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाचे वकील राकेश द्विवेदी यांनी युक्तिवादात म्हटले की, नागरिकांनी निवडणूक आयोगावर विश्वास ठेवावा. कोणालाही यादीतून वगळण्यात येणार नाही. यावर न्यायासनाने याप्रकरणी पुढील सुनावणी ८ सप्टेंबर रोजी होणार असल्याचे स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

### श्रीलंकेचे माजी राष्ट्रपती विक्रमसिंघेंना अटक

**कोलंबो** : श्रीलंकेचे माजी राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांना शुक्रवारी सरकारी निधीचा गैरवापर केल्याचा आरोपात सीआयडीने अटक केली. अटकेच्या कारवाईनंतर श्रीलंकेच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. विक्रमसिंघे यांना चौकशीसाठी आणि जबाब नोंदविण्यासाठी सीआयडी कार्यालयात बोलावले होते.

# रा. स्व. संघाचा विजयादशमी उत्सव २ ऑक्टोबरला

## माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद प्रमुख पाहुणे

◆ **नागपूर, २२ ऑगस्ट**

रा. स्व. संघाचा विजयादशमी उत्सव गुरुवार, २ ऑक्टोबर रोजी साजरा होत असून, यंदा माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे उद्बोधन होईल. रा. स्व. संघाची स्थापना



विजयादशमीला झाली होती. संघाचे हे शताब्दी वर्ष असल्याने या कार्यक्रमास विशेष महत्त्व आहे.

हिंदू समाजात पौरुष व शक्ती जागरण विजयादशमीच्या पावन पर्वावर होत असते. विश्व शांती व मानव कल्याणाचे उद्दिष्ट ठेवून युगानुयुगे सुरू असलेल्या हिंदू समाजाच्या प्रदीर्घ यात्रेचे हे सांप्रत रूप आहे. रेशीमबाग मैदानावर सकाळी ७.४० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. याप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन महानगर संघचालक राजेश लोया यांनी केले आहे. (तभा वृत्तसेवा)

# सांगलीतील उत्सवांमध्ये प्रखर, प्रकाशकिरणांच्या वापरावर बंदी


**जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक घुगेंचा निर्णय**

**सांगली, दि. २२ ऑगस्ट-**

गणेशोत्सव व पैगंबर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकीमध्ये प्रखर व अतितीक्ष्ण प्रकाशकिरणाच्या विद्युत रोषणाईवर जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी बंदी घातली आहे. तर पोलिसांच्या वाहनावर बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्यातून मिरवणुकीवर लक्ष ठेवण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी जाहीर केले. जिल्हाधिकारी काकडे यांनी दिलेल्या आदेशात जिल्ह्यात २५ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत सर्व प्रकारच्या सार्वजनिक मिरवणुकीमध्ये अतितीक्ष्ण प्रकाश किरणे असलेल्या प्लाझ्मा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटच्या वापरास प्रतिबंध करण्यात आला आहे. अन्यथा पोलीस विभागाने आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेशात म्हटले आहे.

२७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव व ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद (महंमद पैगंबर जयंती) हा सण साजरा केला जाणार आहे. या कालावधीत मोठ्या प्रमाणात मिरवणुका होतात. या मिरवणुकांमध्ये प्लाझ्मा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईट्सचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. प्लाझ्मा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटच्या प्रखर प्रकाशामुळे रस्त्यावरून जाणारे वाहनचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून वाहन मिरवणुकीमध्ये जावू शकते व त्यामुळे अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मिरवणुकीमध्ये सहभागी झालेले व मिरवणूक पाहण्यास आलेली लहान मुले यांच्या डोळ्यास इजा होवून त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

# तीन अटी मान्य करा अन्यथा विनाशाला सामोरे जा



◆ **मॉस्को, २२ ऑगस्ट**

अलास्कामध्ये युक्रेनसोबत युद्धबंदीबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी तीन महत्त्वाच्या अटी ठेवल्या. यामध्ये डोनबास प्रदेशात युक्रेनचे आत्मसमर्पण, नाटोचे सदस्यत्व मिळविण्याचा हट्ट सोडावा आणि युक्रेनमध्ये युरोपियन देशांच्या सैन्याला मज्जाव यांचा समावेश आहे. युक्रेनने तीन अटी मान्य केल्याच तरच युद्धबंदी शक्य आहे अन्यथा त्यांना विनाशाला सामोरे जावे लागेल असे रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लाव्हरोव यांनी बजावले.

ट्रम्प यांनी युक्रेनचा राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की आणि युरोपियन देशांशी पुतिन यांच्यासोबत झालेल्या चर्चेच्या तपशीलाची माहिती दिली. युद्धबंदीसाठी त्यांनी रशियावर दबाव वाढविण्यासाठी युरोपच्या माध्यमातून शस्त्रपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे.

विशेष असे म्हणजे शस्त्रासाठी आर्थिक मदत युरोपच्या देशांनाच करावी लागणार आहे. अशातच सर्गेई लाव्हरोव यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी मागण्यांसंदर्भात ट्रम्प यांना कळविले आहे. युद्धबंदी करणे झेलेन्स्कीच्या निर्णयावर अवलंबून आहे. झेलेन्स्कीनी अटी मान्य केल्या तरच युद्धबंदी शक्य आहे अन्यथा युक्रेनचा विनाश कोणीही रोखू शकणार नाही. पुतिन यांनी जून २०२४ मध्ये केलेल्या मागणीचा पुनरुच्चार करताना स्पष्ट सांगितले की, युक्रेनचे डोनबासच्या ज्या भागांवर अजूनही नियंत्रण आहे त्या भागांमधून पूर्णपणे माघार घ्यावी, त्या बदल्यात रशिया दक्षिणेकडील प्रदेशातील झापोरिझिया आणि खेरसनमधील प्रदेशावरील हक्क सोडेल.

**डोनबास प्रदेश रशियाला मिळणार नाहीः झेलेन्स्की**

झेलेन्स्की यांनी रशियाला डोनबास प्रदेश देण्याची मागणी नाकारली आहे. त्यांनी सांगितले की, औद्योगिक डोनबास प्रदेश हा आमच्यासाठी एक किल्ला म्हणून काम करतो, जो युक्रेनमध्ये रशियाच्या वाढत्या कारवाया थांबवत आहे. हा आपल्या देशाच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे, ज्यामध्ये सर्वात मजबूत संरक्षणात्मक रेषा समाविष्ट आहेत. नाटोमध्ये सामील होणे हे आपल्या देशाच्या संविधानात समाविष्ट असलेले एक धोरणात्मक उद्दिष्ट आहे, त्यामुळे रशियाच्या दोन्ही अटी आम्ही मान्य करणार नाही. (वृत्तसंस्था)

### रशियाने युक्रेनला बजावले



रशिया आणि युक्रेनने सलग दुसऱ्या दिवशी एकमेकांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्राने हल्ले केले. यात युक्रेनच्या खार्किव्ह, सुमी आणि निप्रोपेट्रोव्हस्क आणि कीवमधील पायाभूत सुविधा आणि रेल्वे रुळाचे मोठे नुकसान झाले असून ५० पेक्षा अधिक जण जखमी आहे. प्रत्युत्तरात युक्रेनने केलेल्या हल्ल्यात रशियाच्या तीन लष्करी तळ उद्ध्वस्त झाले. याशिवाय कच्चे तेल वाहून नेणाऱ्या मालगाडीवर ड्रोन हल्ला झाला, यात संपूर्ण मालगाडी जळाली, तसेच बॉम्ब हल्ल्यात तेल डेपोचे मोठए नुकसान झाले.

# दोन्ही डोळ्यांनी अंध 'सोन्या' राबतोय धन्यासाठी

## वाळूजमध्ये शेतकरी मोटेंनी लावला अंध बैलास जीव

तभा अँकर

**तभा वृत्तसेवा | गुरूराज कुलकर्णी**
**वाळूज, दि. २२ ऑगस्ट-**

आजच्या विकसित यांत्रिकीकरणाच्या युगात ट्रॅक्टर, आधुनिक साधनसामग्री शेतीत आली आहे. उत्पादनक्षमता वाढली, वेळ वाचला, कष्ट कमी झाले. मात्र या सर्व यंत्रसामग्रीनंतरही शेतकऱ्यांच्या मनातून बैलजोडीवरील प्रेम अद्यापही मावळलेले नाही. या बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा सण साजरा केला जातो ग्रामीण भागात बैल अजूनही शेतकऱ्यांचा जिवलग साथीदार आहे. त्याचे उदाहरण म्हणजे वाळूज (ता. मोहोळ) येथील इंद्रसेन मोटे कुटुंब. खिलार बैलांचे संगोपन करणाऱ्या या कुटुंबाने वेगळी ओळख पंचक्रोशीत निर्माण केली आहे.

आपल्या प्रगतीचा पाया फक्त यांत्रिकीकरण नसून निसर्ग, जनावरं आणि मानवी मूल्यांशी असलेलं नातं आहे. बैलजोडीवरचे प्रेम आणि 'सोन्या'सारखा प्रेरणादायी साथीदार आपल्याला हाच धडा देतात. हे कुटुंब बैलजोड्यांवर जीव ओवाळते. जातिवंत खिलार बैलांच्या संगोपनामुळे आणि सोन्या नावाचा अंध बैल असूनही पोटच्या लेकराप्रमाणे




त्याचा संभाळ करतात. शेतामध्ये काम करत असताना अचानक त्याच्या दोन्ही डोळ्यांतून पाणी गळत असल्याचे शेतकरी इंद्रसेन मोरे यांना दिसले.

तेव्हा त्यांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी शिनगारे यांना दाखविले असता त्यांनी दोन्ही डोळ्यांवर भरपूर प्रमाणात मांस डोळे काढून ऑपरेशन करावे लागेल, मात्र त्याला दोन्ही डोळ्यांनी दिसणार नाही, असा सल्ला डॉक्टरानी दिला. सोन्या बैलाचे दोन्ही डोळे काढून यशस्वी शस्त्रक्रिया केली आणि आज दहा वर्षे झाल, शेतामधील नांगरणी, कोळपणी, सरी सोडणे अशी कामे तो आजही शेतामध्ये काम करत आहे. जातिवंत बैल, गाई त्यांचे संगोपन हे कुटुंब सातत्याने करीत असतात, आजही चार जातिवंत बैल व खोंडे, गाई, म्हैशी त्यांच्या दावणीला असून आकर्षक बैल विशेष लक्ष वेधून घेतात. हे केवळ कौटुंबिक अभिमान नाही तर कृषी संस्कृती जपण्याची प्रयत्न आहे असे त्यांचे मत आहे.

> आज खिलार जातीच्या बैलांचे संगोपन होणे काळाची गरज आहे. बैलांवर मनापासून प्रेम केले तर शेतकऱ्यांची प्रगती होते त्यासाठी सर्वांनी बैलं सांभाळले पाहिजेत. आपल्या धन्यासाठी दोन्ही डोळ्यांनी दिसत नसतानाही राबणाऱ्या सोन्याची तब्येत चांगली राहावी म्हणून त्याला दररोज दोन किलो शेंगदाणा पेंड दिली जाते. त्यामुळे त्याची प्रकृती ठणठणीत आहे. जनावरांना जीव लावला, त्यांना प्रेम दिले, तर त्याची परतफेड ते आयुष्यभर करत राहतात. कष्ट, प्रामाणिकपणा आणि प्रेम याचे उदाहरण म्हणजे आमचा सोन्या आहे. या बैलाचा काही उपयोग नाही त्याला कसायाला विकुन टाका असे अनेकांनी सांगितलं पण हा बैल विकला नाही सोन्याला दोन्ही डोळ्यांनी काहीही दिसत नसताना गेल्या पंधरा वर्षांपासून तो शेतात प्रामाणिकपणे राबतो आहे. या बैलांमुळे आमची कीर्ती महाराष्ट्रभर पसरली आहे
>
> - **इंद्रसेन मोटे,** शेतकरी, वाळूज (दे), ता. मोहोळ

## महत्त्वाचे...

### मराठा समाज विकासासाठी पुनर्गठित मंत्रीमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदी विखे

**शिर्डी, दि. २२ ऑगस्ट-**

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संबंधित बाबींवरील शिफारशींवर कार्यवाही करण्यासाठी राज्य सरकारने मंत्रीमंडळाची उपसमिती पुनर्गठित केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आतापर्यंत झालेल्या मराठा आरक्षण संदर्भातील कार्यवाहीला पुढे नेण्यासाठी समिती काम करणार असल्याचे श्री. विखे पाटील यांनी सांगितले. त्यांनी मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. बारा सदस्यीय या समितीमध्ये उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, क्रीडामंत्री ड. माणिकराव कोकाटे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व सामान्य प्रशासन विभागाचे सचिव यांचा समावेश आहे. या समितीमार्फत मराठा आरक्षणाशी संबंधित प्रशासकीय व वैधानिक कामकाज, न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी नेमलेल्या समुपदेशींशी समन्वय, न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती ठरविणे, न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीच्या कामकाजाला आवश्यक सहकार्य, मराठा आंदोलक व शिष्टमंडळांशी संवाद साधणे, जात प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेत अडचणी दूर करणे तसेच सारथी व आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे ही कार्ये केली जाणार आहेत.

### महापालिका उद्यान विभागातील कामगाराचा झाडावरून पडून मृत्यू

**सोलापूर, दि, २२ ऑगस्ट-**

महापालिका उद्यान विभागातील कायम कामगार प्रभूराज धुळप्पा कलशेट्टी हे झाडाच्या फांदया कापत असताना तोल गेल्याने झाडावरून जमिनीवरील फरशीवर पडून मृत्यूमुखी पडले. ते महापालिका उद्यान



विभागात माळी या पदावर कार्यरत होते. ते मूकबधिर होते. तुळजापूर वेस येथील हुतात्मा स्तंभ येथील उद्यानाची देखभालीस कार्यरत होते. काल सकाळी हुतात्मा स्तंभ येथे झाडाच्या फांदया अस्ताव्यस्त वाढल्याने ते कापायला झाडावर चढले. फांदया कापत असताना तोल जाऊन हुतात्मा स्तंभ येथील जमिनीवरील फरशीवर पडले. तेंव्हा डोक्यास मार लागून रक्तस्त्राव सुरु झाला. तेथील नागरिकांनी त्यांना ताबडतोब मार्कंडेय रुग्णालय येथे दाखल केले. त्यावेळी त्यांची प्रकृती चिंताजनक होती. त्यांच्या मेंदूत रक्तस्त्राव

**कर्तव्यावर सेवा बजावत असल्याने नुकसान भरपाई व अनुकंपा सेवेची मागणी**

झाल्याने अखेर सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचे वय ५२ वर्ष होते. ते भवानी पेठ येथे राहत होते. त्यांनी यापूर्वी प्राणी संग्रहालय, रूपाभवानी उद्यान येथेही सेवा बजावली. त्यांच्या पश्च्यात पत्नी व २ मुले असा परिवार आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने कलशेट्टी कुटुंबच उघड्यावर आला आहे. कलशेट्टी कुटुंबीय व त्यांचे नातलग धाय मोकलून आक्रोश करत रडत होते. ते कर्तव्य बजावत असताना मरण पावल्याने त्यांना तातडीची मदत व अनुकंपा तत्वावर त्यांच्या मुलांना महापालिका सेवेत घेण्याची मागणी तेथे उपस्थित नागरिक करत होते. यावेळी आ. विजयकुमार देशमुख यांनी त्यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. पुढील कार्यवाही करण्याची हमी दिली. त्यांच्यासमवेत माजी नगरसेवक शिवानंद पाटील, बाळासाहेब आळसंदे उपस्थित होते.

### महाराष्ट्रात साजरा होणार समृद्ध खाद्य उत्सव, २३ सप्टेंबरला सोलापुरात

**सोलापूर, दि, २२ ऑगस्ट-**

'उमंग मीडिया नेटवर्क'च्या संयुक्त अभिमानाने 'किचन क्वीन ऑफ महाराष्ट्र २०२५' या नव्या शोची घोषणा केली आहे,हा अशा प्रकारचा पहिलाच राज्यस्तरीय पाककृती कार्यक्रम आहे ज्याचा उद्देश स्वयंपाकाच्या कलेद्वारे महिलांना ओळख मिळवून देणे, त्यांचा उत्सव साजरा करणे आणि सक्षमीकरण करणे हा आहे.नीलम स्टेनलेस स्टील्स आणि बियॉन्ड अप्लायन्सेस यांच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजिली आहे. महाराष्ट्रातील १० प्रमुख शहरांमध्ये ऑडिशन्सद्वारे स्पर्धकांचा हा प्रवास सुरु झाला आहे. राज्यातील टॉप ५० अंतिम स्पर्धक पाककृती प्रदर्शनात भाग घेतील. याची सुरुवात मुंबईहून होणार असून ७ सप्टेंबर रोजी ही ऑडिशन प्रक्रिया सुरु होणार आहे. सोलापुरला हा उत्सव २३ सप्टेंबरला होईल.

# विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टपूर्तीत महिलांचा सहभाग वाढणे गरजेचे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ ऑगस्ट-**

विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. शक्ती संवादाच्या माध्यमातून म हिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत चर्चा आणि विचार मंथन होत असून सकारात्मक विचार करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले.

राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्यावतीने दोन दिवसीय शक्ती संवाद कार्यक्रमाचे हॉटेल ट्रायडंट येथे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, मनीषा चौधरी, विद्या ठाकूर, सदस्य सचिव नंदिनी आव्हाडे, सहसचिव राधिका चक्रवर्ती यांच्यासह विविध राज्यातील महिला आयोगाच्या अध्यक्षा, सहसचिव, सदस्य उपस्थित होते. यावेळी पॉश कायद्यासंदर्भातील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. दोन दिवस शक्ती संवादाच्या माध्यमातून राज्यासह देशातील महिलांच्या विविध समस्या आणि त्यावर उपाय यासदंर्भात चिंतन - मंथन होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नपूर्तीसाठी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत सहभाग आवश्यक आहे.

विकसित अर्थव्यवस्थेसाठी लैंगिक समानता महत्त्वाची आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून जातीभेद आणि लिंगभेद समाप्त करून व्यक्तीच्या रूपाने सर्वांना समान संधी आणि अधिकार प्राप्त करून दिले आहेत. महिलांचे शिक्षण, रोजगार हे केवळ अधिकार राहिले नसून आर्थिक परिवर्तनाच्या उपक्रमासाठी आवश्यक आहेत.

मुलींच्या सबलीकरण व संरक्षणासाठी सुरू केलेल्या 'बेटी बचाव - बेटी पढाओ' योजनेपासून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी 'लखपती दीदी' पर्यंतच्या योजना यशस्वीरित्या राबविण्यात येत आहेत. एक करोड महिलांना 'लखपती दीदी' बनविणार असल्याचा विश्वास यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी व्यक्त केला. 'केजी टू पीजी' पर्यंत मुलींसाठी शिक्षण राज्य शासनामार्फत मोफत दिले जात आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी राज्य शासन कार्यरत असून, समाजात वाढणाऱ्या विकृती दूर करण्यासाठी समाजाने एकत्रितरित्या काम करणे गरजेचे आहे. लहान बालकांपासून घरात संस्कार रूजविणे, तसेच महिलांचा आदर करण्याचे विचार रूजविणे, कुटुंबातच लिंगभेदाची वागणूक न देणे अशा विचारातून विकृती रोखता येईल, असे सांगून फडणवीस म्हणाले, आज महिला अत्याचाराविरोधात बोलत असल्याने ही विकृती मोठ्या प्रमाणात पुढे येत आहे. आज डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान कार्यक्षमात वाढवत आहे, त्याचबरोबर डीप फेक सारखे गुन्हे ही घडत आहेत. स्त्रियांच्या बाबतीत होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये आरोपी दोषी ठरण्याचे प्रमाण ९० टक्के आहे. अशावेळी समाजाने पीडित महिलांना मानसिक आधार देणे गरजेचे आहे.

लाडकी बहीण योजनेचा माध्यमातून २.५० करोड महिलांना १५०० दरमहा देण्यात येत आहेत. याच्या माध्यमातून लघु उद्योग आणि क्रेडिट सोसायटी निमर्ाण होत आहेत. महिला सक्षम होण्याच्या दिशेने राज्यात गतीने कार्यक्रम राबविले जात आहेत.

विजया रहाटकर म्हणाल्या की, 'सर्व राज्यांनी एकत्रितरित्या काम केल्यास अधिक चांगले परिणाम साधता येतील. महाराष्ट्रात उद्योग जास्त असल्याने प्रत्येक कार्यालयात पॉश क्ट संदर्भात समिती कार्यरत असणे गरजेचे असून त्यासाठी प्रयत्न करणार आहे. स्थानिक समित्यांना एकत्र करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच, 'तेरे मेरे सपने' ही लग्नापूर्वी समुपदेशन करणारी केंद्रे राज्यांमध्ये वाढविण्यात येणार आहेत.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या ,भारतीय राज्यघटनेने महिलांच्या सन्मान व हक्कांच्या रक्षणासाठी केलेल्या विशेष तरतुदीनुसार राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महिलांची सामाजिक स्थिती उंचावणे, हक्कांचे रक्षण करणे व अन्यायाविरुद्ध न्याय मिळवून देणे हा याचा उद्देश आहे. महिला आयोग आपल्या दारी, बालविवाह व विधवा प्रथांना आळा बसण्यासाठी अभियान राबविण्यात येते. महिलांच्या सुरक्षेसाठी हेल्पलाईन-१५५२०९ सुरू करण्यात आली आहे. मिशन ई-सुरक्षा, सखी वन-स्टॉप सेंटर, भरोसा सेल्स व प्रशिक्षण शिबिरे हे महत्त्वाचे उपक्रम आहेत. राष्ट्रीय स्तरावर पंचायत से संसद २.०, सायबर सुरक्षेसाठी डिजिटल शक्ती, हरियाणाची मोरी लाडो रेडिओ कार्यक्रम, दृष्टीहीन महिलांसाठी सवेरा, निमिया रोखण्यासाठी मिशन उत्कर्ष, इशान्य भारतात महिलांना उद्योगासाठी स्वावलंबिनी आणि खाद्यपदार्थ व्यवसायासाठी महाराष्ट्राचे फराळ सखी हे उपक्रम उल्लेखनीय आहेत. पश्चिम बंगालचे अपराजिता विधेयक व विविध राज्यांतील अभिनव उपक्रम राष्ट्रीय महिला आयोगांची भूमिका अधिक प्रभावी करतात.

रूपाली चाकणकर म्हणाल्या की, राज्यातील महिला तस्करी संपूर्ण नष्ट करण्याच्या दृष्टीने राज्य महिला आयोग काम करीत आहे.

## गणपतीसाठी एसटी बस ओव्हरफुल्ल!

■ राज्यात ५१०३ बसेस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ ऑगस्ट-**

बाप्पाच्या स्वागतासाठी मुंबई, ठाणे व पालघर विभागातून कोकणात आपल्या गावी जाणाऱ्या कोकणवासीयांची पहिली पसंती एसटीला दिली आहे. त्यामुळे एसटीच्या ४४७९ बसेस गट आरक्षणासह एकूण ५१०३ जादा बसेस आतापर्यंत फुल्ल झालेले आहेत. कोकणवासीयांचा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या गणपती उत्सवासाठी एसटी महामंडळाने यंदा २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान ५२०० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. २३ ऑगस्ट पासून मुंबई, ठाणे, पालघर, या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून या जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.



कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथक देखील तैनात करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर प्रवाशांना नैसर्गिक विधीसाठी तात्पुरत्या स्वरूपाची प्रसाधानगृह उभारण्यात येणार आहेत.
**- प्रताप सरनाईक (परिवहन मंत्री)**

## वेळापूर साधना केंद्राची नववी वार्षिक सभा उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२२ ऑगस्ट-**

महिला आर्थिक विकास महामंडळ सोलापूर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत परिवर्तन लोकसंचालित साधना केंद्र वेळापूरची ९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा वेळापूर येथील शिवशंभू मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाली.

यावेळी सहाय्यकजिल्हा समन्वयक अधिकारी दीपक टेकाळे, जिल्हा सल्लागार राजकुमार पवार , उपजीविका विकास सल्लागार उमेश जाधव, विशाल सातपुते, प्रेमकुमार कचरे, सरपंच रजनीश बनसोडे, एचडीएफसी बँकेचे अनिकेत, पत्रकार महादेव जाधव तसेच अध्यक्षा उर्मिला निंबाळकर, सचिव अर्चना उरणे, व्यवस्थापक वैशाली इंगोले, सदस्या अश्विनी दुपडे, ताहिरा बागवान, रूपाली कुंभार, शोभा वाघमारे आदि उपस्थित होते. प्रतिमापूजन व दीप प्रज्वलनाने सुरूवात झाली. प्रस्ताविक वैशाली इंगोले यांनी केले. अहवाल वाचन अध्यक्ष उर्मिला निंबाळकर यांनी केले. मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विशेष कामकाज केलेले बचत गट सई शेंडेचिंच, गीतांजली तांदुळवाडी, स्वप्नपूर्ती तांदूळवाडी, रोहिणी फळवणी, स्वप्नपूर्ती फळवणी, झाशीची राणी काळमवाडी, श्रावणी कोळेगाव, कालिकादेवी कोळेगाव, अर्धनारी नटेश्वर वेळापूर, पाकीजा वेळापूर, धनलक्ष्मी वेळापूर, गायत्री मळोली, शीलरत्न वेळापूर, साळूबाई साळमुखवाडी, श्रीकृष्ण वेळापूर, गुलाब मळोली, समर्थकृपा मळोली, हिरकणी शेळी पालन गट मळोली, संकल्प ग्रामसंस्था शेंडेचिंच, आदिशक्ती ग्रामसंस्था वेळापूर, आदी बचत गटांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देऊन जिल्हा समन्वयक अधिकारी दिपक टेकाळे तसेच, राजकुमार पवार, उमेश जाधव, यांच्या हस्ते सर्व बचत गटांचा गौरव करण्यात आला. तसेच यावेळी बचत गट भगिनी ऋतुजा खरात, सुचिता माने यांनी लावणी कला सादर केली तसेच अनेकांनी नृत्य गायन सादर केले. तसेच यावेळी मान्यवरांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन दिपाली राऊत यांनी केले. आभार वैशाली इंगोले यांनी मानले. पिंकू धांडोरे, अजित बनसोडे व नीलम बनसोडे यांनी परिश्रम घेतले.

## देशभरात कर्करोगाची लवकर तपासणी अन् जनजागृतीसाठी मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, २२ ऑगस्ट-**

भारतात कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने या संकटाला सामोरे कसे जावे, या विषयावर चर्चा करण्यासाठी फेडरल बँक हॉरमिस मेमोरियल फाउंडेशन,न्यूज१८ नेटवर्क आणि ज्ञानसहभागी टाटा ट्रस्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने संजीवनी राष्ट्रीय परिषद नुकतीच आयोजित करण्यात आली.परिषदेच्या या तिसऱ्या पर्वात आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ,शासन,स्वयंसेवी संस्था आणि खासगी क्षेत्र यांच्या प्रतिनिधींनी भाग



घेतला.२०२५ या वर्षभरात देशातील कर्करोग रुग्णांची संख्या १५.७ लाखांवर जाण्याचा अंदाज आहे.त्यातील सुमारे ७० टक्के रुग्णांचे निदान अजूनही उशिराच्या टप्प्यावरच होत असल्याने, या परिषदेचा केंद्रबिंदू जागरूकतेपलीकडे जाऊन वेळेवर कृती करण्यावर होता.प्रसिद्ध अभिनेत्री आणि संजीवनी मोहिमेच्या प्रचारक विद्या बालन यांच्यासाठी ही मोहीम अत्यंत वैयक्तिक आहे.स्वतःला स्वीकारण्याची आणि समाजाशी जोडले जाण्याची जी परिवर्तनकारी ताकद आहे, त्याबद्दलही विद्या बालन यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.या परिषदेतील सर्वाधिक लक्षवेधी क्षणांपैकी एक होता 'अंतरात्मा' हा विशेष रॅम्प शो.यात कर्करोगातून बरे झालेल्यांनी भाग घेतला होता.



## मंगळवेढ्यात मूर्तिकार मूर्तीवर फिरवताहेत अखेरचा हात

**मंगळवेढा दि.२२ ऑगस्ट-**

लाडक्या गणरायाचे दि.२७ ऑगस्ट रोजी राज्यभर मोठ्या उत्साहात आगमन होत आहे. दरम्यान या पार्श्वभूमीवर मंगळवेढा शहर व ग्रामीण भागातील मुर्तीकार श्री गणेशाच्या मुर्तीवर अखेरचा हात फिरवत असल्याचे चित्र आहे. दि.२७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत हा उत्सव साजरा होत असल्याने मुर्तीकार मुर्तीवरुन शेवटचा हात फिरवत आहेत. मंगळवेढा येथील कुंभार गल्लीतील मुर्तीकार अमोल कुंभार हे आपल्या कुटूंबातील आई नंदा, पत्नी गौरी, बहिण ज्योती यांच्यासह मुर्ती तयार करण्यात व्यस्त आहेत. मुर्तीसाठी केसर, कलर, प्लॅस्टिक ऑफ पॅरीस (शाडू) आदी साहित्याची गरज लागते. गतवर्षी पेक्षा यंदा रंगाचे दर २५ टक्क्यांनी वाढले आहेत. पीओपी वर मागील काही दिवस बंदी होती. मात्र ती बंदी ९ जुलैला उठविली गेली. त्यामुळे मुर्ती तयार होण्यास वेग आला आहे. गतवर्षी कुंभार कुटुंबीयांने ३ हजार मुर्त्या केल्या होत्या, बंदीमुळे अपुरा वेळ मिळाला. तरी सुद्धा त्यांनी यंदा जवळ जवळ पाच हजार मुर्त्या तयार करण्यात आल्याचे सांगण्यात आले. सहा इंचापासून ते दहा फुटापर्यंत गणपती मुर्त्या तयार करण्यात आल्या आहेत. या मुर्तीची किंमत सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी असावी म्हणून ५0ते १५ हजार रुपये पर्यंत असून मुर्ती बुकींग करण्यास सुरुवात झाली आहे. दरम्यान यामध्ये मंगळवेढा शहर,बोराळे, हुलजंती, ओझवाडी,कर्नाटकातून विजापूर, निगोडी, जाडर बबलाद, कुन्नूर,सांगोला, मोहोळ आदी भागातून मोठ्या प्रमाणात बुकींग करण्यात आल्याचे प्रसार माध्यमांशी बोलताना कुंभार यांनी सांगितले. यापुर्वी हा व्यवसाह तुकाराम दशरथ कुंभार हे करीत होते. त्यांच्या पश्चात अमोल कुंभार यांनी वडिलांची मुर्ती तयार करण्याची परंपरा ४0वर्षापासून आजतागायत सुरु ठेवली आहे. मुर्ती तयार करण्यास मागील आठ महिन्यापासून सुरुवात करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## शिरूर, हडपसरच्या मतदार यादीत मोठा घोटाळा

■ शरद पवारांकडून वोट चोरी-२ चे डेमो दाखवित आरोप !

■ निवडणूक आयोगाची भूमिका अयोग्य असल्याचा ठपका

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. २२ ऑगस्ट -**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या निवडणूक आयोगावरील मत चोरीचा आरोपावरून देशभरात चर्चा रंगली असताना आता राज्यातील जेष्ठ नेते शरद पवार यांनी त्याला आणखी फोडणी दिली आहे. विधानसभा निवडणुकीत पुण्यातील शिरूर- हवेली व हडपसर मतदार संघातील मतदार यादीत मोठया प्रमाणात घोटाळा करण्यात आला होता, असा आरोप करीत केंद्रीय निवडणूक आयोग आपली भूमिका प्रामाणिकपणे बजावत नसल्याचे शुक्रवारी सांगितले.



दोन्ही मतदार संघातील बोगस मतदान, दुबार नावे पुराव्यानिशी सादर करीत आयोगाच्या भोगळ कारभाराचा पर्दापाश यशवंतराव चव्हाण सेंटर येथे भरगच्च पत्रकार परिषद घेत केला. आयोगाच्या माध्यमातून कशाप्रकारे मत चोरी करण्यात आली यासंदर्भातील प्रात्यक्षिक शिरूर मतदार संघातील पक्षाचे पराभूत उमेदवार अशोक पवार यांनी तर हडपसर मतदार संघातील उमेदवार प्रशांत जगताप यांनी दाखवले. राज्य व केंद्रीय निवडणूक आयोगाकडे त्याबाबत वारंवार तक्रारी व पत्र व्यवहार करूनही काहीही दखल घेण्यात येत असल्याचा त्यांनी आरोप केला. तर प्रत्येक मतदार संघातील घोटाळे बाहेर काढत राज्यभरात त्याविरोधात जनआंदोलन उभारण्यात येणार आहे. शरद पवार साहेब हे स्वतः पुढाकार घेऊन ही चोरी उघडकीस आणणार असल्याचे पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आ. जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी सांगितले. निवडणूक आयोग स्वच्छ भूमिका घेत नाही. आयोग स्वायत संस्था आहे. मात्र त्यांनी त्यानी जी भूमिका घ्यायला हवी ती घेतलेली नाही.. निवडणूक आयोगाकडून आमची फार काही अपेक्षा नाही, असा टोला लगावत शरद पवार म्हणाले की , राहुल गांधी यांनी हे सर्व सत्य समोर आणले असून त्याची सुरूवात बिहारमधून झाली आहे. त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.. बिहार आर्थिकदृष्या अडचणीचं राज्य असलेतरी मात्र राजकियदृष्ट्या ते जागरूक आहे आणीबाणच्या काळात पहिला संघर्ष बिहारमद्ये झाला होता. राहुल गांधी यांच्या माहितीत एका झोपडपट्टीत एका घरात १४० लोकं राहत असल्याचे समोर आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून राज्यातील मतदारयाद्यांचा अभ्यास सुरू करण्यात आला आहे. असून मतदानातील घोटाळे बाहेर काढणार असल्याचे स्पष्ट केले. पक्षाचे विधीमंडळ नेते जयंत पाटील म्हणाले की, मतदार यादीत एका घरात १८ नावे असून एका घरात दुसरे कोणी आहे. काही ठिकाणी घरांसमोर 0 त्या पुढे 00 असे नमूद केले असून जिल्हाधिकाऱ्यांना सांगूनही आता ते तपासण्यासाठी तेवढा वेळ नाही,असे सांगितले जात आहे. मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याचे मुख्यमंत्री फडणवीसांनी मान्य केले ही चांगली बाब आहे. आमची इच्छा आहे की, त्यांनी आमचा जो प्रयत्न सुरु आहेत, ज्यात सामील होऊन निवडणूक आयोगाला वठणीवर आणण्यासाठी प्रयत्न करावा, प्रत्येक मतदारसंघात १० ते १५ हजार नावे घुसडण्यात आल्याचा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला.

### फडणवीसांना नाही म्हणून सांगितले : पवार

उपराष्ट्रपती निवडणुकीवर बोलताना शरद पवार म्हणाले की, आम्ही सगळ्यांनी मिळून दोन ते तीन नावाची चर्चा करून एकमताने निर्णय घेण्यात आला. सत्ताधाऱ्यांकडून उमेदवार जाहीर झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी फोन करून महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत म्हणून सहकार्य करावे, ही विनंती केली. तथापि, मी ते वेगळ्या विचाराचे असल्याने शक्य नसल्याचे सांगितले. राऊतांशी बोलणं झालं असून त्यांचीही चर्चा झाली. त्यांचा आणि आमचा निर्णय एकच आहे. आम्ही आमचं बघतो त्यांनी काय करायचं ते ठरवतील, निकाल वेगळा लागेल. आम्ही सरकारचा विचार करत नाही. गेल्यावेळी ३०० खासदार रस्त्यावर उतरले. आम्हाला अटक करण्यात आली. असेही ते म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# काँग्रेस, राजद घुसखोरांच्या पाठीशी

## गयाजी येथील सभेत पंतप्रधान मोदींची सडकून टीका



### १३ हजार कोटींच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १३ हजार कोटींच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन झाले. याप्रसंगी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, केंद्रीय मंत्री जितन राम मांझी आदी उपस्थित होते. पंतप्रधान मोदी नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री समर्थ चौधरी यांच्यासह खुल्या जीपमधून नागरिकांचे अभिवादन स्वीकारत सभास्थळी आले.

### बिहारी जनतेने जागरूक राहावे

राज्यात घुसखोरांची समस्या मोठी आहे. राजद आणि काँग्रेसने मतपेढीसाठी लांगुलचालन करण्याचे धोरण स्वीकारले असल्याने घुसखोरांचे फावत आहे. हे घुसखोर बिहारी नागरिकांचे हक्क हिरावत आहेत. मात्र, आम्ही तसे होऊ देणार नाही. जनतेनेही याबाबत जागरूक राहावे, असे आवाहन मोदींनी केले.



**गयाजी, २२ ऑगस्ट**

घुसखोरांमुळे बिहारच्या सीमावर्ती भागात लोकसंख्येची रचना झपाट्याने बदलत आहे. काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल घुसखोरांच्या पाठिशी असल्याने घुसखोरांची हिंमत वाढली, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. गयाजी येथील सभेत पंतप्रधान बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी बिहार आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर होते. बिहारमधील विविध प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झाले.

सभेला संबोधित करताना मोदी यांनी काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलावर जोरदार टीका केली. या दोन्ही पक्षांचे अनेक नेते तुरूंगात होते किंवा जामिनावर बाहेर आहेत. पंतप्रधान असो की मंत्री, जे गंभीर स्वरूपांच्या गुन्ह्यासाठी ३० दिवस अथवा ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस तुरुंगात राहिले असल्यास त्यांना पदावरून हटविणारे घटना दुरूस्ती (१३० वे दुरूस्ती )विधेयक आम्ही संसदेत आणले आहे. पण, या विधेयकाला काँग्रेस,राजदसह अन्य विरोधी पक्षांनी विरोध केला आहे. एखाद्या साध्या लिपिकाने थोडे दिवस जरी तुरूंगात घालविले तर त्याला निलंबित केले जाते. पण, देशात असे काही राजकारणी आहेत ज्यांनी तुरूंगात राहून सत्ताकारण केले. आमच्या ११ वर्षांच्या काळात एकही भ्रष्टाचाराचा आरोपी एनडीए सरकारवर लागला नाही. म्हणूनच भ्रष्टाचारी, डागाळलेल्या नेत्यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी जे विधेयक आणले आहे, त्याला काँग्रेस आणि राजद विरोध करीत असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

राजद अथवा काँग्रेसच्या काळात बिहारमध्ये एकही मोठा उद्योग आला नाही. त्यांनी केवळ मतपेढीचे राजकारण केले. राजदचे नेते तर भ्रष्टाचार करण्यातच गुंग होते. जनतेच्या भल्यापेक्षा या नेत्यांनी स्वतःचेच खिसे भरले, असा हल्लाबोलही त्यांनी केला. (वृत्तसंस्था)



बिहारमधील फेअर प्राईस डिलर्स संघटनेच्या वतीने शुक्रवारी विविध मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. आंदोलक आक्रमक होताच पोलिसांनी काठ्यांचे प्रहार केले

# खगोलशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारताला चार सुवर्ण, एक रौप्य

## जागतिक स्तरावर शास्त्रज्ञांचा पराक्रम

**मुंबई, २२ ऑगस्ट**

१८ व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी ऑलिम्पियाडमध्ये भारताच्या तरुण खगोलशास्त्रज्ञांनी अभूतपूर्व यश मिळवले. आरुष मिश्रा, अक्षत श्रीवास्तव, बानीपब्रत माझी आणि पाणिनी यांनी सुवर्णपदक पटकावले, तर सुमंत गुप्ताला रौप्यपदक मिळाले. ६४ देशांतील ३२० तरुण शास्त्रज्ञ या स्पर्धेत सहभागी झाले होते.



अंतिम निकाल गुरुवारी मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक सभागृहात जाहीर झाला. या कार्यक्रमाला इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. दीपांकर बनर्जी आणि अणुऊर्जा विभागाचे सचिव, तसेच होमी भाभा राष्ट्रीय संस्थेचे कुलगुरू डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जिज्ञासा, सौहार्द आणि जागतिक प्रगतीच्या भावनेतून विज्ञानाच्या नव्या क्षितिजांचा सातत्याने शोध घ्या, असे आवाहन डॉ. काकोडकर यांनी विद्यार्थ्यांना केले. डॉ. बनर्जी यांनी भारतातील अवकाश विज्ञान नव्या टप्प्यात प्रवेश करीत असल्याचे सांगितले.

गट स्पर्धेत शनी गटा या संघाला विशेष विजेतेपद मिळाले. यात बांगलादेशचा फर्हान साजिद, बोलिव्हियाचा अडेमीर जयमेस रिवेरा, ब्राझीलचा लुका पिर्मता, बल्गेरियाचा स्वेतोस्लाव अराबोव, फ्रान्सची चार्लेन इलोय आणि जॉर्जियाची मरियम बेकौरी यांचा समावेश होता. (वृत्तसंस्था)

### ५४ पैकी पाच विद्यार्थ्यांची निवड

कठीण चाचण्यांमधून एकूण ५४ पैकी पाच विद्यार्थ्यांची भारतामधून या स्पर्धेसाठी निवड झाली. २१ ऑगस्ट रोजी एकूण १४५ पदके प्रदान केली यामध्ये ५० सुवर्ण, ४४ रौप्य, ५१ कांस्य पदकांसह २६ विशेष उल्लेखपत्रांचा समावेश होता. या ऑलिंपियाडचे आयोजन होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च यांनी संयुक्तपणे केले.

# एल्विशच्या घरावर गोळीबार करणाऱ्या आरोपीला अटक

**गुरुग्राम, २२ ऑगस्ट**

हरयाणातील गुरुग्राम येथे यूट्यूबर आणि बिग बॉस ओटीटी विजेता एल्विश यादवच्या घरावर गोळीबार करणाऱ्या आरोपी इशांत ऊर्फ इशू गांधीला फरिदाबाद गुन्हे शाखेने एन्काउंटरनंतर अटक केली आहे.

इशांत फरिदाबादमध्ये लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. इशांतने एल्विशच्या घरी गोळीबार केल्याचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, चकमकीत इशांतच्या पायाला गोळी लागली आहे. तो सध्या रुग्णालयात दाखल आहे.

१७ ऑगस्ट रोजी सकाळी ५.३० वाजता, सेक्टर ५७ मधील एल्विशच्या घरावर २४ राउंड गोळीबार झाला होता. (वृत्तसंस्था)



मतदार अधिकार यात्रेवर असलेले लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सध्या बिहारच्या विविध भागात सभा घेत आहेत. भागलपूर येथे असताना प्रशंसकासोबत त्यांनी सेल्फी काढली

# ओपन एआयचे भारतातील पहिले कार्यालय नवी दिल्लीत

कर्मचारी भरती सुरू


**बंगळुरू, २२ ऑगस्ट**

चॅटजीपीटीची मूळ कंपनी ओपन एआय या वर्षाच्या अखेरीस भारतामध्ये आपले पहिले कार्यालय नवी दिल्लीत सुरू करणार आहे. यासाठी कंपनीने कर्मचारी भरती सुरू केली आहे. वापरकर्त्यांच्या संख्येनुसार भारत ही ओपन एआयसाठी दुसरी सर्वात मोठी बाजारपेठ असून, या निर्णयामुळे कंपनी भारतातील आपले स्थान अधिक मजबूत करत आहे.

मायक्रोसॉफ्टच्या पाठबळाने स्थापन झालेल्या ओपन एआयने भारतात आपली कायदेशीर संस्था नोंदवली असून स्थानिक टीमची भरती सुरू केली असल्याची माहिती कंपनीने दिली. भारतात जवळपास एक अब्ज इंटरनेट वापरकर्ते आहेत. त्यांना लक्ष्य करत ओपनएआयने याच आठवड्यात ४.६० डॉलरचा (अंदाजे ३८५ रुपये) सर्वात स्वस्त मासिक प्लॅन भारतात सादर केला होता. त्यामुळे भारताला एक महत्त्वपूर्ण बाजारपेठ म्हणून पाहिले जात आहे.

एकीकडे विस्तार करत असताना ओपनएआयला भारतात कायदेशीर आव्हानांनाही सामोरे जावे लागत आहे. अनेक वृत्तसंस्था आणि पुस्तक प्रकाशकांनी चॅटजीपीटीला प्रशिक्षित करण्यासाठी आपला मजकूर परवानगीशिवाय वापरल्याचा आरोप केला आहे. तथापि, कंपनीने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. ओपनएआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी एका निवेदनात म्हटले आहे, भारतात आमचे पहिले कार्यालय उघडणे आणि स्थानिक टीम तयार करणे, हे प्रगत एआय देशभरात अधिक सुलभ बनवण्याच्या आणि भारतासाठी व भारतासोबत एआय तयार करण्याच्या आमच्या वचनबद्धतेतील एक महत्त्वाचे पहिले पाऊल आहे. (वृत्तसंस्था)

### तीव्र स्पर्धेला जावे लागणार सामोरे




भारतात ओपन एआयला गुगलचे जेमिनी आणि एआय स्टार्टअप पर्प्लेक्सिटी यांसारख्या प्रतिस्पर्धकांकडून तीव्र स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे. या दोन्ही कंपन्यांनी भारतातील अनेक वापरकर्त्यांसाठी त्यांचे प्रगत प्लॅन्स विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. शुक्रवारी जाहीर केलेल्या नवीन आकडेवारीनुसार, चॅटजीपीटी वापरणाऱ्यांमध्ये भारतात विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक आहे. तसेच, गेल्या वर्षभरात येथील साप्ताहिक सक्रिय वापरकर्त्यांची संख्या चौपट झाली आहे, असेही ओपनएआयने म्हटले आहे.

# आमच्या भूमीवरून कटाचे राजकारण नाही

### बांगलादेश सरकारचे दावे भारताने फेटाळले

**नवी दिल्ली, २२ ऑगस्ट**

माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाचे काही कार्यकर्ते भारतात सरकारविरोधात राजकीय कारवाया करत असल्याचा आरोप बांगलादेशच्या सरकारने केला होता. यावर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने बांगलादेशच्या अंतरिम सरकारच आरोप फेटाळून लावले. सरकारला भारतातील अवामी लीग कार्यकर्त्यांकडून बांगलादेशविरुद्ध कोणत्याही कारवायांची माहिती नाही. भारत आपल्या भूमीवरून कोणत्याही देशाविरुद्ध राजकीय कारवायांना परवानगी देत नसल्याचे भारताने स्पष्ट केले.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, बांगलादेशच्या अंतरिम सरकारची टिप्पणी चुकीची आहे. बांगलादेशात मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका व्हाव्यात, जेणेकरून लोकांची इच्छा काय आहे, हे कळेल अशी भारताची इच्छा आहे. आम्ही कोणत्याही देशाविरोधात राजकीय कारवाया करण्यासाठी कोणालाही परवानगी दिली नाही. (वृत्तसंस्था)

# इम्रान खान यांना आठ खटल्यात जामीन

**नवी दिल्ली, २२ ऑगस्ट**

पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी माजी पंतप्रधान आणि पीटीआयचे संस्थापक इम्रान खान यांना ९ मे २०२३रोजी झालेल्या दंगलीशी संबंधित आठ प्रकरणांमध्ये जामीन मंजूर केला. यावेळी लाहोर उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला ज्यामध्ये त्यांना यापूर्वी दिलासा नाकारण्यात आला होता. या निर्णयामुळे त्यांचा तुरुंगातून बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश याह्या आफ्रिदी यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर इम्रान खान यांना जामीन देण्याचा निर्णय दिला. विशेष सरकारी वकिल झुल्फिकार नक्वी यांनी आग्रह धरला की जामीन आदेश नेहमीच अंतरिम असतात आणि खटल्याच्या कार्यवाहीवर परिणाम करत नाहीत. त्यांनी १९९६ ते २०२४ पर्यंतच्या अनेक उदाहरणांचा उल्लेख केला. तथापि, न्यायालयाने नमूद केले की पीटीआय नेते एजाज चौधरी यांच्यासह इतरांना कट रचल्याच्या आरोपात जामीन मंजूर करण्यात आला. मुख्य न्यायाधीश आफ्रिदी यांनी खान यांचा खटला कसा वेगळा होता हे स्पष्ट करण्याचे निर्देश सरकारी वकिलांना दिले. (वृत्तसंस्था)

# गोड तुळशीची पाने साखरेपेक्षा ३० पट जास्त गोड

## तरीही मधुमेह रुग्णांना धोका नाही

तरुण भारत १०० वर्ष शताब्दीचे

**कन्नूर, २२ ऑगस्ट**

केरळच्या कन्नूरमधील गोड तुळशीचे रोपटे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या वनस्पतीचे एक पान हे साखरेपेक्षा ३० पट जास्त गोड असल्याचे म्हटले जाते. यातील खास बाब म्हणजे, मधुमेह असलेले रुग्णदेखील याचे सेवन करू शकतात.



कन्नूरमधील परियाराम येथील रहिवासी के. व्ही. शाजी हे या वनस्पतीची शेती करत आहेत. या वनस्पतीला मोठी मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. गोड तुळस (मल्याळममध्ये मधुरा तुलसी) मध्ये रक्तातील साखरेचे नियंत्रण आणि रक्तदाब कमी करण्याचे गुण आहेत. शाजी यांनी या तुळशीचे रोपे त्रिवेंद्रम येथून आणली. या तुळशीला तीन महिन्यात फुले येतात. फुले आल्यानंतर झाडाच्या फांद्या काढल्या जातात. या फांद्याची पाने वाळण्यात येतात आणि त्यापासून पावडर बनवण्यात येते. ही पावडर ५ ते ७ मिनिटे उकळली की पाण्यात गोडवा मिसळतो. या तुळशीचे तीन रोपटे २५० रुपयांना शाजी विकतात. ही वनस्पती सुमारे पाच वर्ष उत्पन्न देत असल्याचे के. व्ही. शाजी यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



### उत्तराखंडमध्ये विपुलता

गोड तुळशीला स्टीविया असेही म्हटले जाते. या रोपट्याला उत्तराखंडमधून आणले गेले असावे. कारण याची रोपे उत्तराखंडच्या हिरव्यागार दरी-डोंगरांमध्येच आढळतात. तेथील वातावरण या तुळशीसाठी विशेष अनुकूल मानले जाते. बुंदेलखंडातील वातावरणातही अशी तुळस बऱ्याच प्रमाणात आढळते. आजच्याकाळात जेव्हा बहुतांश लोकांना लठ्ठपणा, मधुमेह अशा तक्रारी असतात, ही तुळस अतिशय गुणकारी ठरते. कारण याचा गोडवा साखरेपेक्षा जास्त असल्याने चहा, कॉफी किंवा अन्य गोड पदार्थात ती मिसळून खाल्ल्याने साखरेची गरज उरत नाही. साखरेला पर्याय म्हणून याचा वापर केला जातो.

## चित्रपट वार्ता

### रामललाच्या दर्शनासाठी पोहोचली रविना टंडन



**अयोध्या** : प्रसिद्ध अभिनेत्री रवीना टंडन अयोध्येत पोहोचली. तिने राम मंदिरात रामललाचे दर्शन घेतले आणि नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतला. त्यानंतर ती हनुमानगढी येथे पोहोचली आणि प्रार्थना केली. तिने तेथे जय श्री रामचा जयघोषही केला. सुमारे ४० मिनिटे ती अयोध्येत राहिली. हनुमानगढीला भेट दिल्यानंतर रविना म्हणाली- आज माझे जीवन सार्थक झाले आहे. रामललाच्या या दिव्य आणि भव्य मंदिराला भेट देऊन मी आध्यात्मिक शांतीचा अनुभव घेतला आहे. मी योगीजी आणि मोदीजींचे आभार मानू इच्छिते. ज्यांनी आमच्यासाठी आमच्या रामजींच्या जन्मस्थळाला भेट देण्याची इतकी अद्भुत व्यवस्था केली आहे. आम्हाला खूप आनंद झाला.

### लक्ष्मीकांत बेर्डेंच्या लेकीचे व्यवसायात पदार्पण



**मुंबई** : आजकाल सिनेसृष्टीतील कलाकार अभिनयासोबतच दुसरा कोणता व्यवसायही सुरू करतात. त्यात आता आणखी एका अभिनेत्रीची भर पडली आहे. ती म्हणजे स्वानंदी बेर्डे. दिवंगत लक्ष्मीकांत बेर्डे यांची लेक स्वानंदीने स्वतःचा ज्वेलरी ब्रॅण्ड सुरू केला आहे. आई-वडिलांच्या नावावरून तिने तिच्या ब्रॅण्डचे नाव ठेवले आहे. तिच्या ज्वेलरी ब्रॅण्डचे नाव 'कांतप्रिया' असे आहे. वडील लक्ष्मीकांत यांच्या नावातील 'कांत' आणि आई प्रिया यांच्या नावातील 'प्रिया' असे एकत्र करून तिने हे नाव ठेवले आहे. या ब्रॅण्डची झलकही तिने समाज माध्यमावर शेअर केली आहे. हा माझ्यासाठी केवळ एक ब्रॅण्ड नसून माझ्या हृदयाचाच एक भाग आहे. माझे आई-वडील माझे आयुष्य आहे, अशी भावना तिने व्यक्त केली आहे.

### 'छावा'तील काढून टाकलेले दृश्य व्हायरल




**मुंबई** : १४ फेब्रुवारीला प्रसिद्ध झालेला 'छावा' सिनेमा प्रेक्षकांना प्रचंड आवडला होता. यात विकी कौशलच्या अभिनयाचे भरभरून कौतुक झाले. विकीने यात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली होती. मात्र, चित्रपटाच्या प्रदर्शनाआधी काही दृश्यांवरून वाद पेटला होता. त्यामुळे ती दृश्ये काढून टाकली होती. अशातच आता यातील एक काढून टाकलेले दृश्य समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. या दृश्यामध्ये औरंगजेब छत्रपती संभाजी महाराजांकडे निरखून बघत असतो. मला पकडायला तू आला नाही तर मीच इथे आलोय. कारण या गादीवर बसण्याच्या लायक तू नाही, असे शंभूराजे औरंगजेबाला सांगतात आणि तलवारीने मारतात. तेवढ्यात औरंगजेब घाबरून झोपेतून उठतो. हे औरंगजेबाचे स्वप्न असते. हे दृश्य पाहिल्यावर अनेकांनी त्याचे कौतुक केले आणि हे दृश्य चित्रपटात हवे होते, असे म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# वाहून गेलेले पावसाळी अधिवेशन

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले म्हणण्यापेक्षा विरोधकांच्या गदारोळामुळे हे संपूर्ण अधिवेशन वाहून गेले वा अधिवेशनावर पावसाने पाणी फेरले, असे म्हणावे लागेल. २१ जुलैला या अधिवेशनाची सुरुवात झाली आणि २१ ऑगस्टला हे अधिवेशन संपले, पण यात जनतेच्या जिव्हाळ्याच्या आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या किती मुद्यांवर चर्चा झाली, याचा विचार केला तर एक मोठे शून्य समोर येते. संसदेच्या कामकाजावर दर मिनिटाला काही लाख रुपयांचा खर्च होत असतो, पण कामकाज न झाल्यामुळे हा सारा खर्च वाया जातो, याचाही विचार व्हायला पाहिजे. गेल्या काही वर्षांपासून संसदेच्या अधिवेशनात रोजच गदारोळ होणे हे ठरलेले आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांत एकवेळ प्रश्नोत्तराचा तास होणार नाही, शून्य तास होणार नाही, पण गोंधळ आणि गदारोळ झाल्याशिवाय राहत नाही. गोंधळ आणि गदारोळ हा संसदेच्या कामकाजाचा कुळाचार झाला, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. बरं गोंधळ हा फक्त लोकनिर्वाचित सभागृहात म्हणजे लोकसभेतच होतो असे नाही तर ज्येष्ठांचे सभागृह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यसभेतही होतो आणि हे करताना सर्व सांसदीय संकेत, मर्यादा आणि शिष्टाचार पायदळी तुडवला जातो. हा गोंधळ आणि गदारोळ किती व्हावा तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लाज वाटेल, एवढा असतो.

ऑपरेशन सिंदूरवर दोन दिवस दोन्ही सभागृहांत झालेली चर्चा वगळता या अधिवेशनाची एकही उपलब्धी सांगण्यासारखी नाही. काही विधेयके नाही म्हणायला पारित करण्यात आली, पण यातील एखाददुसरा अपवाद वगळता एकाही विधेयकावर व्यापक आणि सखोल चर्चा झाली नाही. विरोधी पक्षांच्या गदारोळात सरकारला ही विधेयके पारित करून घ्यावी लागली. विधेयकांवरील चर्चेत सरकारला घेरण्याची संधी विरोधी पक्षांनी गमावली, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. आपण लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात बसलो आहोत, याचे भानही गोंधळ घालणारे काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे सदस्य ठेवत नाही. गुन्हा दाखल झालेल्या आणि ३० दिवसपर्यंत जामीन मिळू न शकलेल्या लोकप्रतिनिधीचे पद आपोआप रद्दबातल होण्याबाबतचे विधेयक गृहमंत्री अमित शाह लोकसभेत मांडत असताना काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी कपडे घालून जो नंगानाच केला, ते पाहून देशातील समस्त लोकांची मान लज्जेने खाली झुकली. हेच आमचे लोकप्रतिनिधी आहे का, कशाला यांना आम्ही निवडून दिले, असा प्रश्न त्यांना पडला. सभागृहात पोस्टर्स घेऊन येणे अध्यक्ष तसेच सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत येऊन घोषणाबाजी करणे ही आता संसदेच्या दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षांच्या सदस्यांची नियमित प्रथा झाली आहे. विशेष म्हणजे अशी घोषणाबाजी करताना विरोधी पक्षांचे सदस्य सत्ताधारी बाजूला येतात. गृहमंत्री अमित शाह विधेयक मांडत असताना विरोधी पक्षांच्या सदस्यांनी त्यांच्यासमोरील माईक हिसकण्याचा प्रयत्न केला, भाजपा सदस्य अमित शाह यांच्या संरक्षणासाठी धावले नसते, त्यांनी सुरक्षाकडे केले नसते, तर विरोधी पक्षांच्या संतप्त सदस्यांनी शाह यांना सभागृहात धक्काबुक्की करायलाही मागेपुढे पाहिले नसते. मुळात या विधेयकात गैर काय आहे, ते विरोधी पक्षांच्या सदस्यांनी देशातील जनतेला सांगितले पाहिजे. या विधेयकाच्या कक्षेत सरकारने फक्त मुख्यमंत्री आणि राज्यांच्या मंत्र्याचाच समावेश केला नाही, तर पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्र्यांनाही आणले आहे. त्यामुळे त्यामुळे उद्या विरोधी पक्षांच्याच नाही तर सत्ताधारी पक्षांच्या पंतप्रधानाने वा केंद्रीय मंत्र्याने चुकीचे काही केले तर त्यालाही त्याची किंमत चुकवावी लागेल, यात शंका नाही. याउपरही अमित शाह यांनी यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयके सखोल आणि व्यापक चर्चेसाठी संयुक्त सांसदीय समितीकडे पाठवली आहेत. सरकारने आणखी काय करणे विरोधी पक्षांना अपेक्षित आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेत १२० तास कामकाज होणे अपेक्षित होते, प्रत्यक्षात ३७ तासच कामकाज झाले. कामकाजाची टक्केवारी ३७ होती. उत्तीर्ण होण्यासाठी ३५ टक्के गुण लागत असतात. त्याचा निकष लावला तर संसदेच्या कामकाजाच्या परीक्षेत सर्व खासदार काठावर उत्तीर्ण झाले, असे म्हणावे लागेल.

प्रश्नोत्तराच्या तासात ४५५ प्रश्नांवर चर्चा व्हायला पाहिजे होती, प्रत्यक्षात ५५ प्रश्नांचीच तोंडी उत्तरे देता आली. राज्यसभेची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. त्यामुळेच अधिवेशनाच्या समाप्तीची घोषणा करताना लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंशनारायणसिंह यांना सदस्यांच्या वागणुकीवर तीव्र नाराजी व्यक्त करावी लागली, सदस्यांची कानउघाडणी करावी लागली. पण विरोधी पक्षांच्या सदस्यांवर त्याचा कोणताही परिणाम होईल, असे वाटत नाही. बिहारमधील स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (सर) च्या मुद्यावर सभागृहात चर्चा घडवावी, अशी विरोधी पक्षांची मागणी होती, याच मुद्यावरून विरोधकांनी सभागृहाचे कामकाज बंद पाडले. निवडणूक आयोग ही घटनात्मक यंत्रणा आहे, तिच्या कार्यपद्धतीवर संसदेत चर्चा करणे योग्य ठरणार नव्हते, कारण या चर्चेतून होणाऱ्या आरोपांना संसदेत येऊन मुख्य निवडणूक आयुक्त उत्तर देऊ शकणार नव्हते, या तांत्रिक बाबीमुळे सरकार या मुद्यावर चर्चेला तयार नव्हते. आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल काही आक्षेप असतील तर विरोधकांनी न्यायालयात धाव घ्यायला हरकत नाही. विरोधकांनी सरकारची ही बाजू समजून घ्यायला पाहिजे होती. मुळात संसदेच्या दोन्ही सभागृहांत गोंधळ घालून आपण काय साध्य केले, याचे आत्मपरीक्षण विरोधकांनी करायला पाहिजे. मुळात आपण विरोधक आहोत, म्हणून सरकारच्या सर्व गोष्टींना विरोध केलाच पाहिजे, गोंधळ घालून सभागृहाचे कामकाज बंद पाडलेच पाहिजे, असे नाही. संसदेचे कामकाज सुरू ठेवून विविध सांसदीय आयुधांचा वापर करत सरकारला घेरण्याचे कौशल्य विरोधकांनी दाखवणे अपेक्षित आहे. पण विरोधकांची संसदेच्या दोन्ही सभागृहांतील कृती देशातील सर्वसामान्य जनतेची निराशा करणारी म्हटली पाहिजे. हेचि फळ काय मम तपाला असे म्हणण्याची वेळ विरोधी पक्षातील काही गोंधळी सदस्यांनी जनतेवर आणली आहे.

काही वर्षांपूर्वी संसदेत एकापेक्षा एक संसदपटू होते. विशेष म्हणजे हे संसदपटू जसे विरोधी पक्षांत होते, तसेच सत्ताधारी पक्षातही होते. हे संसदपटू जेव्हा भाषणाला उभे राहात तेव्हा त्यांच्या शब्दांची परिणामकारकता एवढी असायची की सत्ताधारी पक्षाच्या पोटात गोळा फिरत असे. विरोधी पक्षांचे सदस्य सभागृहात आक्रमक व्हायचे, पण त्यात आक्रस्ताळेपणा नसायचा. सध्याच्या विरोधी पक्षांत आक्रमकता कमी आणि आक्रस्ताळेपणा जास्त दिसतो.

सभागृहात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यातील सौहार्द कमी झाल्यासारखे दिसते. सत्ताधारी पक्ष हा आपला शत्रू क्रमांक १ आहे, अशी विरोधी पक्षांची वागणूक असते. त्यामुळे भाषण करताना वा घोषणा देताना सभ्यपणा खुंटीला टांगून भाषेची मर्यादा ओलांडली जाते. पंतप्रधानपदाची गरिमा आणि प्रतिष्ठा विरोधी पक्षांनी राखली पाहिजे. तुम्हाला नरेंद्र मोदी नावाची ॲलर्जी असू शकते, पण ते देशाचे पंतप्रधान आहेत, लोकनेते आहेत, देशातील सर्वांत लोकप्रिय नेते आहेत, विशेष म्हणजे देशातील जनतेने सलग तीनदा निवडून देत त्यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे, याचे भान विरोधी पक्षांच्या सदस्यांनी ठेवले पाहिजे.

जनतेला खासदार निवडून देण्याचा जसा अधिकार आहे, तसा त्यांच्या कसोटीवर न उतरणाऱ्या खासदाराला परत बोलवण्याचा अधिकारही असला पाहिजे. या संदर्भातील मागणी अधूनमधून डोके वर काढत असते. पण आता या मागणीवर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. सरकार अनेक वेळा घटनादुरुस्ती करत असते, तर जनतेच्या अपेक्षांवर आणि कसोटीवर न उतरणाऱ्या खासदारांना परत बोलवण्याचा अधिकार सरकारने जनतेला घटनादुरुस्तीच्या माध्यमातून करून दिला पाहिजे. त्याचप्रमाणे एकेका खासदारावर सरकार दरवर्षी पगार आणि भत्त्यापोटी कोट्यवधी रुपये खर्च करत असते. ज्या दिवशी गोंधळामुळे संसदेचे कामकाज होणार नाही, त्या दिवसाचा पगार आणि भत्ता खासदारांना मिळणार नाही, अशी तरतूदही कायद्यात करण्याची वेळ आली आहे. त्याशिवाय गोंधळी खासदारांचे डोळे उघडणार नाहीत. .

## यंगिस्तान

# यांना बुद्धी दे गणनायका!

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय वातावरणात सध्या एका छोट्या टिप्पणीने मोठा गदारोळ उडवला आहे. दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री आणि त्यांच्या पत्नी अभिनेत्री पल्लवी जोशी यांनी 'कर्ली टेल्स' या युट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत महाराष्ट्रीयन जेवणाबद्दल बोलताना वरण-भाताचा उल्लेख केला. ही मुलाखत ४४ मिनिटांची असून त्यातील १५ मिनिटांच्या आसपासचा भाग आता वादाचा केंद्रबिंदू बनला आहे. मात्र, माध्यमांनी या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढून द्वेष पसरवला, ज्यामुळे मराठी समाजात अनावश्यक प्रतिक्रिया उमटल्या. विवेक अग्निहोत्री दिल्लीचे रहिवासी असून त्यांना मसालेदार, स्पायसी जेवणाची सवय होती. पल्लवी जोशींसोबत लग्न झाल्यावर त्यांनी पहिल्यांदा महाराष्ट्रीयन जेवण चाखले. मुलाखतीत पल्लवी म्हणाल्या, 'महाराष्ट्रीयन पदार्थ बनवले तरी त्यांना आवडत नव्हते. ते म्हणायचे, 'ये गरीबों का खाना है.' विवेक अग्निहोत्री यांनीही याला दुजोरा दिला. ते म्हणाले, 'मी दिल्लीतून आलो होतो. जेवणात मसाले, घी भरपूर. इथे वरण-भात दिला, ज्यात मीठही कमी. लिंबूही वरून पिळलं जायचं. हा कल्चरल शॉक होता.' मात्र, पुढे त्यांनी याच मुलाखतीत लगेच स्पष्ट केले की, आता त्यांना महाराष्ट्रीयन थाळी आवडते. हे जेवण परवडणारे, आरोग्यदायी आणि सोपे आहे. ते म्हणतात, 'जो महाराष्ट्रीयन थाली है ना, बहुत इकॉनॉमिकल, व्हेरी हेल्दी और व्हेरी गुड थाली है.' आता यात महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा अपमान काय आहे?

ही मुलाखत 'कर्ली टेल्स'च्या 'संडे ब्रंच' भाग १८२ मध्ये आहे, ज्यात ते दोघे भोपाळी नॉन-व्हेज आणि सात्त्विक जेवणाबद्दल बोलतात. मात्र, माध्यमांनी फक्त सुरुवातीचा भाग उचलला आणि 'विवेक अग्निहोत्री यांनी महाराष्ट्रीयन जेवणावर टीका केली' अशी बातमी पसरवली. परिणामी, सोशल मीडियावर ट्रोलिंग सुरू झाली. लोकांनी विवेक यांना हिणवले, त्यांच्या चित्रपटांवर बहिष्काराची मागणी केली. पण कुणीही पूर्ण मुलाखत पाहिली नाही. विवेक यांनी नंतर स्पष्टही केले की, हे वक्तव्य विनोदी होते व हा नवरा-बायकोमधील संवाद होता. वरण-भात आता त्यांचा आवडता पदार्थ आहे. तरीही वाद थांबला नाही. माध्यमे असा द्वेष का पसरवतात? आणि मराठी माणसं मूळ स्रोत जाणून न घेता का टीका करतात? महाराष्ट्राला ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बौद्धिक परंपरा लाभली आहे. त्यामुळे माझी नेहमीच अशी इच्छा असते की, महाराष्ट्राने ही बौद्धिक परंपरा जपायला हवी. मराठी माणूस हा मुळातच प्रचंड बुद्धिमान आहे. मात्र, १९६० नंतर मतांच्या राजकारणासाठी मराठी माणसाची बौद्धिक क्षमता संकुचित



करण्यात आली. मराठी नेत्यांनी मराठी माणसाच्या हातातील विद्येची प्रतीक असलेली लेखणी हिसकावून घेतली आणि त्याच्या हातात दगड दिला. जेणेकरून नेते चाळीतून बंगल्यात गेले. मात्र मराठी माणसाची सामाजिक प्रगती खुंटली. आजही तोच प्रकार सुरू आहे. गंमत पाहा ना, काँग्रेसने १०५ मराठी माणसांचा जीव घेतला, ज्यांना आज आपण हुतात्मा म्हणतो. पण उद्धव ठाकरे मुंबई वाचवणार, अशी वल्गना राहुल गांधींच्या हातात हात घालून करतात. राहुल गांधी सतत मराठी माणसाचा अपमान करीत आले आहेत. त्यांनी सावरकरांवर गलिच्छ आरोप केले. आता तर सात्यकी सावरकर यांच्यावर ते गोडसेचे नातेवाईक आहेत म्हणून माझ्या जिवाला धोका आहे, असा खोटा आरोप करीत आहेत. हा महाराष्ट्राचा अपमान नाही का? सावरकर कुटुंब हे मराठी कुटुंब आहे आणि देशभक्त कुटुंब आहे. त्यांचा किती अपमान हे काँग्रेसी करणार आहेत? आणि इथले मराठीच्या नावावे मते मागणार, स्वत:ला मराठीचा कैवारी समजणारे याबाबत काही बोलणार आहेत की नाही?

दुसरीकडे मराठी अस्मितेच्या नावाने राजकारण करणारे नेते धार्मिक सणांवर विवादास्पद वक्तव्ये करतात, तरी माध्यमे त्यांचा समाचार घेत नाहीत. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या एका नेत्याने कृष्ण जन्माष्टमीला मांस वाटल्याची चर्चा आहे. आमदार आदित्य ठाकरे म्हणाले की, 'स्वातंत्र्य दिनी काय खावे हे आमचे स्वातंत्र्य आहे.' उद्या तळीराम म्हणतील की दारू पिणे हा आमचा अधिकार आहे. गांधी जयंतीला ड्राय डे ठेवू नका! उद्धव ठाकरेंची ही कथा तर त्यांचे बंधू राज ठाकरे यांनी दहीहंडीच्या निमंत्रणावर 'मी दही हंडीचे नाही, फक्त मटण हंडीचे आमंत्रण स्वीकारतो,' असा विनोद केला. दहीहंडीसारखे मराठी उत्सव असले घाणेरडे विनोद करण्यासाठी आहेत काय? दहीहंडी हा मराठी माणसाचा मोठा उत्सव आहे. तेव्हा माध्यमे बोटे तोंडात घालून का बसली होती. राज ठाकरेंनी मागे कुंभस्नानावरही टीका केली. तरी माध्यमे यावर फार आक्रमक दिसली नाहीत. हा माध्यमांचा दुटप्पीपणा म्हणायचा का? मुळात जे वक्तव्य जसे आहे तसे दाखवणे माध्यमांचे कर्तव्य आहे. समाजात द्वेष पसरवणे, भांडणे लावणे, दंगलीसदृश वातावरण निर्माण करणे हे माध्यमांचे काम नाही. आता गंमत पाहा, माध्यमे कशी कामे करतात. संजय राऊत यांनी कुणावर टीका केली तर 'संजय राऊत यांचे शरसंधान, घणाघात' वगैरे मथळे देतात. मात्र विरोधकांनी टीका केली तर 'अमुक अमुक यांची जीभ घसरली. अमुक अमुक बरळले.' इ. मथळे देतात. संजय राऊत उघडपणे माध्यमांसमोर शिव्या देतात, महिलांनाही शिव्या देतात तेव्हा त्यांच्याबद्दल बातम्या चालवायला माध्यमांना अवघड का जात असेल? 'ये रिश्ता क्या कहलाता है?' असं काय मिळतं या पत्रकारांना की, विशिष्ट नेत्यांबद्दल ते अवाक्षरही काढत नाहीत? हल्लीच राज ठाकरेंच्या पत्रपरिषदेत त्यांचा कुत्रा 'रायनो' आला, ज्याने सर्वांचंच लक्ष वेधलं. सोशल मीडियावर मीम्स फिरू लागले.

लक्षात घ्या मराठी माणसांनो, उद्या मराठीच्या जिवावर कुणी उठला तर आपण सगळे मिळून त्याला शिंगावर घेऊ. पण ऊठसूट शिंगे दाखवत फिरणे बरे नव्हे! मला माध्यमांकडून कोणतीच अपेक्षा नाही. पण मराठी माणसाने यांच्या नादी लागू नये. मराठी लोकांनी मूळ स्रोत जाणून घेऊन प्रतिक्रिया द्याव्यात. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीपासून ते सावरकरांच्या उपयुक्ततावादापर्यंतची परंपरा ही तर्कशुद्ध आहे. मराठी माणूस हा तर्कशुद्धच असला पाहिजे, तर्कहीन किंवा तर्कट नव्हे. त्यासाठी मराठीच्या नावाने राजकारण करणाऱ्या नेत्यांच्या नादी न लागता डॉ. आंबेडकरांसारख्या बौद्धिक व्यक्तीच्या ग्रंथांचे पारायण मराठी माणसाने केले पाहिजे. आता गणेशोत्सव सुरू होईल. गणपती ही बुद्धीची देवता, महाराष्ट्राची देवता आहे. मी गणपती बाप्पाकडे या निर्बुद्ध लोकांसाठी एकच मागणे मागीन, 'यांना बुद्धी दे गणनायका!'

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# अन्यथा निसर्ग माफ करणार नाही

निसर्गाचा समतोल बिघडल्याने याही वर्षी बदलत्या वातावरणाचा फटका अखेर बसलाच. धो धो बरसलेल्या पावसाने क्षणाधार्थ सर्व काही उद्ध्वस्त केले. हजारो हेक्टर शेतजमीन खरडून गेली. भविष्यामध्ये कधीही भरून न निघणारी हानी झाली. शेतकरीच नव्हे, तर सामान्य माणूसही या पावसाने भरडला गेला. हवामानाच्या बदलांमुळे मानवी आयुष्याला अनेक गंभीर धोके निर्माण होत आहेत. रोगराईचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. याकडे आमचे अजूनही लक्ष वेधले गेले नाही. आमचे आज होणारे हे दुर्लक्ष भविष्यामध्ये अती गंभीर परिणामाकडे सर्वांना घेऊन जाणारे आहे. निसर्गाला अक्षरक्ष: ओरबाडणे सुरू आहे. त्यामुळे कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनाचे प्रमाण वाढत असून संपूर्ण जगाच्या तापमानामध्ये वाढ झाली आहे. मानवाने विकासाच्या नावावर नैसर्गिक संसाधनाचा अमाप विध्वंस केला. त्यामुळे पूर, प्रदूषण, तापमानामध्ये वाढ, हवामान बदल, ओझोनचा विरळ होणारा थर तसेच नैसर्गिक आपत्ती आणि त्यामुळे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. निसर्ग नियमामध्ये केलेली मानवी ढवळाढवळ तोही किती दिवस सहन करणार, हा खरा प्रश्न आहे. तरीही मानव त्याकडे अजूनही आपल्या उघड्या डोळ्यांनी निव्वळ बघ्याची भूमिका घेत आहे. ही विनाशकारी वृत्ती आम्ही किती दिवस पोसणार आहोत? विनाशाकडे घेऊन जाणारी ही दुर्लक्षित वृत्ती मानवाच्या मुळावर उठली आहे. ऑगस्ट महिन्यातील नैसर्गिक आपत्तीचा सर्वाधिक फटका वऱ्हाड प्रदेशाला बसला.



वाशीम जिल्ह्यातील पावसाने तर सर्व उच्चांक मोडलेत. हजारो हेक्टरमधील पिके शेतामध्ये सडली. शेती खरडून गेली ती वेगळीच. शेतकऱ्यांच्या तोंडापर्यंत आलेला घास धो धो पावसाने हिरावून नेला. बदलत्या वातरणाची ही तर फक्त सुरुवात आहे. विकासामधून विध्वंस ही नाण्याची दुसरी बाजू आहे. याकडे आम्ही कधीच लक्ष दिले नाही. पूर्वी वातावरणाशी समरस होणारी भारतीय पीक पद्धत वेगळी होती. काळानुरूप त्यामध्ये बदल होत आम्ही हायब्रीड आणि रासायनिक युगामध्ये येऊन ठेपलो आहोत. भारतीय परंपरा आणि ज्ञानाला समाजाने तिलांजली दिल्याने ही गंभीर परिस्थिती उद्भवली आहे. शेतामध्ये अमाप टाकली जाणारी रासायनिक खते आणि कीटकनाशकाने होणारे अतिशय गंभीर परिणाम आम्ही भोगत आहोत. कॅन्सर, मधुमेह, हृदयरोग वाढण्यामागे बदललेली जीवनशैलीच कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे ठाम मत आहे. अतिहव्यासापायी आमची विनाशाकडे कशी वाटचाल सुरू झाली, हे अजूनही आम्हास समजलेच नाही. कधीही धो धो बरसणारा पाऊस, उन्हाळ्यामध्ये वाढलेले तापमान अन् हिवाळ्यामध्ये गायब झालेली थंडी हा निसर्गाने दिलेला स्पष्ट इशारा असला, तरी भविष्यामध्ये त्याचे होणाऱ्या गंभीर परिणामाची आम्ही साधी दखलही घेतली नाही. अमेरिका हा जगामधील क्रमांक १ चा हरितगृह उत्सर्जक देश असून हे उत्सर्जन कमी करण्याची सर्वाधिक जबाबदारी या देशाचीच आहे. परंतु, जगाचा दादा म्हणून मिरवणारा अमेरिका या बाबीकडे डोळेझाक करीत आहे. त्यास मानव जातीशी काहीएक देणेघेणे नाही. त्यामुळे अमेरिकेपेक्षाही सर्वाधिक नुकसान पृथ्वीचे झाले आहे. अमेरिका आपल्या स्वार्थापायी संपूर्ण जगाला विनाशाच्या खाईमध्ये लोटत आहे. हवामानामध्ये होणाऱ्या बदलाचे परिणाम भारतामध्येही जाणवू लागले आहेत. अनियंत्रित पाऊस आणि असह्य उन्हाचे चटके हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. त्याची सुरुवात जर एवढी भयावह असेल तर त्याचा अंत केवढा गंभीर असेल याची कल्पनाही न केलेली बरी. मनुष्य निसर्गाच्या मुळावर उठल्याने निसर्गाच्याही सहनशीलतेचा अंत झाला आहे. त्यामुळे निसर्ग आपला रंग दाखविणार हे ठाम आहे. स्वार्थी मनुष्याने फक्त आणि फक्त निसर्गाला ओरबडल्याचे कार्य इमानेइतबारे केले. त्याचे गंभीर परिणाम आता आमच्याच पुढ्यात येऊन ठेपले आहेत. त्यामुळे सजगता हेच आम्हाला या पाशामधून मुक्त करू शकते. अन्यथा वेळ निघून गेल्यावर हातावर हात देऊन बसल्याशिवाय आमच्याकडे काहीच शिल्लक उरणार नाही. क्षणिक सुखाची भौतिक लालसा असंख्य दु:खाची जननी आहे, हे जेव्हा कळेल तोच मानवाच्या कल्याणाचा सुदिन असेल.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

# 'बलसागर' भारत होवो!

दत्तात्रेय आंबुलकर

भारताचे सैन्य, सशस्त्र दल व अत्याधुनिक शस्त्रसज्जतेमुळे गेल्या दशकात भारताने संरक्षण सिद्धतेच्या संदर्भात जागतिक स्तरावर आघाडी घेतली. नुकत्याच लंडन येथे भारत-इंग्लंड दरम्यान झालेल्या व्यापक संरक्षण कराराने भारताचे संरक्षण क्षेत्रातील व्यापक महत्त्व आणि माहात्म्य सर्वमान्य झाले व यातूनच बलशाली भारताचे नवे रूप व स्वरूप अवघ्या जगानेही पाहिले. कधी भारतावर राज्य गाजविलेल्या ब्रिटनला आज भारताशी संरक्षण क्षेत्रासंदर्भात धोरणात्मक करार करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागणे, ही बाब जगातील संरक्षण क्षेत्रातील दिग्गजांसाठी अचंबित करणारी, भारताची संरक्षण क्षेत्रातील क्षमता व सिद्धता सर्वमान्य करणारी ठरली आहे. भारताची संरक्षण सिद्धता व आपल्या सैनिकी तंत्रज्ञांचे कौशल्य जगासमोर नव्याने व प्रभावीपणे झळकले ते ६ मे २०२५ रोजी. केवळ २५ मिनिटांत भारताने पूर्वनियोजितपणे व अचूक स्वरूपात पाकिस्तानातील सर्वदूर व प्रसंगी आत शिरून, दहशतवाद्यांसह मुख्य संरक्षण केंद्रांना हेरून, हल्ला करून पाकिस्तानी दहशतवाद्यांसह दहशतवादी केंद्रेही नष्ट केली. एवढेच नव्हे, तर एवढ्या वेळेत निर्णायक स्वरूपात युद्ध जिंकण्याचा इतिहाससुद्धा यानिमित्ताने भारताने रचला.

भारत आणि भारतीयांच्या संरक्षण सिद्धतेतील कौशल्य पाकिस्तानच्या मनात धडकी भरविणारे व उभ्या जगाला स्तिमित करणारे ठरले. भारताचे २०१६ सालामधील उटी येथील पाकपुरस्कृत दहशतवादी हल्ल्याला अचूक उत्तर म्हणून अशीच चढाई केल्याचे यानिमित्ताने स्मरण होणे स्वाभाविक होते. मात्र, यावेळच्या भारताच्या कारवाईचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी भारताचे आपल्या धोरणात्मक आक्रमकतेला विकसित तंत्र, तंत्रज्ञान, नियोजन व पाकिस्तानचे कमरतोड नुकसान करतानाच संरक्षणाला संपूर्ण सिद्धतेची साथ दिली. परिणामी, विकृत मेजर जनरल व विख्यात संरक्षणतज्ज्ञ राजन कोचर यांनी नमूद केल्यानुसार 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने भारत आणि भारताच्या लष्करी सज्जतेला राजकीय स्थिरता, प्रशासकीय परिपक्वता, परराष्ट्र धोरणाची भक्कमता याची साथ मिळाल्यानेच 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत कारवाई केवळ संरक्षकच न राहता संरक्षणसज्ज सिद्ध झाली.

जाणकारांच्या मते, सध्याच्या आंतरराष्ट्रीय संदर्भात लष्करी कारवाई सुरू करताना अथवा त्याचा प्रतिकार करताना आर्थिक बाजू भरभक्कम असणे गरजेचे व फायदेशीरही ठरते. यावेळी भारताची प्रगत व प्रगतिशील आर्थिक व्यवस्था व सुस्थितीने भारताला मोठेच पाठबळ लाभले. भारताच्या अर्थव्यवस्थेची सध्याच चार ट्रिलियन डॉलर्सकडे वेगवान घोडदौड सुरू असून याची नोंद जग आणि जागतिक पातळीवर वेळोवेळी घेण्यात येत आहे. या आर्थिक प्रगतीलाच भारताच्या देश आणि जागतिक पातळीवरील उत्पादन वाहतूक व्यवस्थेची अव्वलता आता जगाने मान्य केली आहे. याचे प्रत्यंतर यावेळी नव्या संदर्भात आले. ब्रिटनच्या पुढाकारातून नुकत्याच व नव्याने झालेल्या भारत-ब्रिटन संयुक्त कराराने भारताच्या आर्थिक, औद्योगिक व परराष्ट्र धोरणाची छाप पाश्चिमात्य देशांवर पडलेली दिसून येते. विशेषत: ट्रम्प-आयात शुल्काच्या गदारोळातही हे घडू शकले, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सिद्ध झालेली बाब म्हणजे, जेव्हा भारताच्या सुरक्षा संरक्षणाचा प्रश्न येतो, त्यावेळी आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था वा पाकिस्तान, अमेरिका, चीन वा रशिया यांना काय वाटते, हे महत्त्वाचे न ठरता, देश आणि देशवासीयांना काय वाटते, ते महत्त्वाचे ठरते व नेमकी हीच बाब पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानसह डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्या-वल्गनांना बळी न पडता, देशहितासाठी व देशाच्या संरक्षणासाठी काय महत्त्वाचे आहे, त्यावरच विचार करून प्रत्यक्षात आणली. यातूनच 'बलशाली भारत' नव्याने साकारला. त्याचवेळी भारताने गेल्या सुमारे १० वर्षांत विविध प्रकारच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील आव्हानांचा सामना करावा लागू शकतो, याचा सर्वांगीण विचार करून, त्यानुसार देश आणि देशहित रक्षण यासाठी काय करावे लागू शकते, याचा व्यापक विचार करून आपली संरक्षण सिद्धता दाखवून दिली आहे. या धोरणात्मक तयारीमध्ये देशाची भौगोलिक व सागरी सीमा, महत्त्वाची संशोधन केंद्र व औद्योगिक, समुद्री बंदर, वाहतूक व्यवस्था इत्यादींच्या सुरक्षा राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. उदाहरणार्थ मुंबई-जेएनपीटी, कांडला ही बंदरस्थाने, सर्वांत मोठी अशी जामनगर रिफायनरी, मुंबईतील भाभा अणुसंशोधन केंद्र, राजस्थानमधील पोखरणसह ढोलेरा परिसरातील विशाल सौर ऊर्जा प्रकल्प, बाडमेर येथील रिफायनरी, दक्षिण भारतातील पारादीप व विशाखापट्टणम बंदर यांच्या संरक्षणाची विशेष काळजी या प्रकल्पांच्या निर्माण काळापासूनच घेतल्यामुळे त्यांचा उपयोग यावेळी प्रकर्षात जाणवला व सिद्ध झाला. या प्रमुख प्रकल्पांच्या संरक्षण सिद्धतेत मिसाईल क्षेपणास्त्रांसह ड्रोनच्या माऱ्यापासून पुरवलेली भरभक्कम सिद्धतेची यशस्वी चाचणी 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने जगमान्य ठरली व भारत आणि भारतीयांच्या विशेष कौशल्यांचा व बलशाली क्षमतेचा परिचय सर्वांना झाला. याच्याच जोडीला चीनसारख्या शेजारी देशांचा सर्वच बाबतीतील बेभरवशीपणा लक्षात घेता, तांत्रिक क्षेत्रातील संरक्षणाला भारताने विशेष खबरदारी घेण्यासाठी देशांतर्गत तंत्रज्ञान क्षमता विकसित केली आहे. यामध्ये माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित अशी व्यापक सायबर सुरक्षा, आर्थिक व्यवहार योग्य व सुचारू पद्धतीने होण्यासाठी स्वयंसिद्ध तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा, आवश्यक ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास व प्रयोग आणि त्याशिवाय अंतराळ क्षेत्रातील संशोधनाचा उपयोग आता भारत आणि तटीय सागरी क्षेत्राच्या संरक्षणासाठी केला जात आहे, हे विशेष.

सद्य:स्थितीतील भारताची संरक्षण संदर्भातील बलशाली व स्वयंसिद्ध होण्याच्या संदर्भातील सिद्धता सप्रमाण सिद्ध करणारी बाब म्हणजे 'वर्ल्ड इकोनॉमिक फोरम.' या फोरमने संरक्षणात्मकदृष्ट्या सध्या असणाऱ्या वा नजीकच्या भविष्यातील जोखमीच्या संदर्भात 'जागतिक जोखीम अहवाल २०२५' नुकताच प्रकाशित केला आहे. त्यानुसार विशेषत: २०२४-२५ सालच्या दरम्यान आशियाई देशांमध्ये झालेल्या वा सुरू असणाऱ्या युद्ध वा युद्धसदृश बंडाळींच्या पृष्ठभूमीवर संरक्षण सिद्धता प्रमुख औद्योगिक केंद्रांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही तितकीच महत्त्वाची ठरेल, असा प्रामुख्याने इशारा दिला आहे. याचाच अर्थ, देशाच्या सीमेसह देशांतर्गत औद्योगिक-व्यवसायाची प्रमुख व संवेदनशील प्रगती केंद्रांचे संरक्षण तेवढेच महत्त्वाचे ठरेल. या साऱ्या पृष्ठभूमीवर पहलगाम व त्यानंतरच्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने 'आकाश' क्षेपणास्त्राचा यशस्वी व परिणामकारक उपयोग करून भारताने आपली बलशाली संरक्षण सिद्धता सिद्ध केली आहे. आता आव्हान आहे 'आकाश'ला गवसणी घालू शकणाऱ्या 'ब्रह्मांडाचा' संशोधनपर शोध घेण्याचा!

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### 'धर्म अध्यात्म'मधील माहिती अतिशय उपयुक्त

मागील पाच-सहा महिन्यांपासून तरुण भारतमध्ये 'धर्म अध्यात्म' या शीर्षकांतर्गत दर शुक्रवारी सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि धार्मिक कार्यकर्तृत्वाचा तथा ठिकाणांचा ठावठिकाणा प्रकाशित केला जात आहे. बरेच वेळा काही उपयुक्त माहिती किंवा ठिकाणे काळाच्या ओघात विस्मरण पावतात. परंतु धर्म अध्यात्मच्या निमित्ताने अनेक चांगल्या सनातन गोष्टींना उजाळा मिळतो आहे. त्यामुळे धर्म अध्यात्मच्या संयोजिका शिल्पाताई विवेक कवठेकरांचे आणि तरुण भारतचे मनापासून आभार मानावेसे वाटतात. मागील दोन अडीच महिन्यांपासून श्रीराम स्पर्शाने पावन स्थळे या शीर्षकांतर्गत प्रभू श्रीराम आपल्या वनवास काळात जिथे कुठे वास्तव्यास होते त्या ठिकाणाची अतिशय सुंदर माहिती उपलब्ध विविध लेखिकांद्वारे होते आहे. आता पुढच्या शुक्रवारी कुठल्या ठिकाणाची माहिती वाचायला मिळणार याचीही मनाला ओढ लागलेली असते. सोबतच त्या त्या तीर्थक्षेत्रांची चित्रेही प्रसिद्ध होत असल्यामुळे ती तीर्थक्षेत्रे संपूर्णपणे डोळ्यापुढे उभी राहतात. श्रीरामाबद्दल अधिक आस्था आपल्या हिंदू भाविकांना आहे परंतु पुढील पिढीला ही पावन स्थळे कळणे अतिशय आवश्यक आहे . तरुण भारतने या पृष्ठावर ही माहिती वाचकांसाठी/भाविकांसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद. अशाच विविध लेखमाला धर्म अध्यात्माद्वारे पुढील अंकात आम्हाला अपेक्षित आहे.

**संजय मुरूगकर**/९८२२५७००४६

### रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. मारबत उत्सवाची सुरुवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरुद्ध मोठा लढा उभा करणे हा होता. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरीतीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दिष्ट ठरले. येणारे विघ्न दूर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरुवात झाली. यानंतर १८८४ मध्ये पिवळ्या मारबतीची सुरुवात झाली. दोन्ही मारबती मांडण्यामागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा. नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४५ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने संपन्न होते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल. कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात. त्यामुळे ही नागपूरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पूजा-अर्चना व्हायची आणि आताही होते. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा होतात. मारबतीचा सण पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्ह्या पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढून येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जयघोष करून 'ईडा-पीडा, माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत' अशा घोषणांनी केला जातो व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होऊन संपूर्ण नागपूर दुमदुमते. मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावास्येला घरोघरी पळसाच्या फांद्यांची पूजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते 'माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत' अशा घोषणा दिल्या जातात. देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे. त्यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे. याचे प्रायश्चित्त देशातील १४० कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे म्हणावेसे वाटते भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!

**रमेश कृष्णराव लांजेवार**/९९२१६९०७७९

### तुळस दिसे नयना

तरुण भारतची शंभर वर्षे आणि त्या निमित्ताने तुळशीचे महत्त्व सांगून तुळस दान करण्याचा एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. 'जिकडे पाहावे तिकडे तुळस दिसे नयना' असे काहीसे वातावरण झाले आहे. एक लहानसे सहज लागणारे, वाढणारे आणि त्यातून शुद्ध पवित्र वातावरण करणारी ही तुळस आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत तुळशीचे अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे. पण आज अंगणात, दारात तुळस दिसत नाही, पण इतर शोभिवंत झाडे दिसतात.

आता या उपक्रमातून मात्र सगळीकडे तुळस दिसू लागली आहे. दररोज वृत्तपत्रातून येणाऱ्या लेखाच्या माध्यमातून ती किती अनमोल आहे याची जाणीव झाली आहे. जिथे अनेक लोक एकत्र येतात अशा मंदिर, संस्था, शाळा, कार्यक्रम यातून तुळस भेट देणे, दान करणे यातून घरोघरी तुळस राहील. तुळशीच्या मंजिरीतून पुन्हा रोप तयार होते. त्यासाठी वेगळे काहीच करावे लागत नाही. म्हणजे आता भविष्यकाळात तुळस घराघरात दिसेल. शुद्ध आणि पवित्र वातावरण निर्मिती होईल, सकारात्मकता वाढीस लागेल आणि पर्यायाने शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहील हे निश्चित. तुळस लावा पर्यावरण वाचवा हे ध्येय लवकरच नक्की साध्य होणार. एक एक लहानसे पुढे पडणारे पाऊल आपल्याला आपल्या ध्येयाकडे निश्चित घेऊन जाते. तरुण भारतचे हार्दिक अभिनंदन!

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### महाविद्यालयीन बुद्धीबळ स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाच्या महिला उपविजयी

**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**


पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाच्या महिलांनी उपविजेतेपद संपादिले. स्वेरी कॉलेज पंढरपूर येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. या संघात संचिता सोनवणे, पुनम उपासे, संपदा पाटील, साक्षी थोरात, प्रतीक्षा टाकळी यांचा समावेश होता. मुलांमध्ये ओम रोंगे याने पाचवे स्थान प्राप्त केले. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ .ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.



### मोहोळ तालुका डीजे, लेझरमुक्त करावा; आदर्श ज्येष्ठ नागरिक संघटनेचे निवेदन

**मोहोळ, दि.२२ ऑगस्ट-**

मोहोळ तालुका डीजे व लेझर लाईट मुक्त करावा या मागणीसाठी येथील आदर्श ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले .या मागणीचे सर्वत्र स्वागत होत आहे. आजच्या समाधी जीवनात विविध धार्मिक सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये डीजेचा तसेच लेझर लाईट याचा प्रचंड प्रमाणात प्रकाश आवाजामुळे ध्वनी प्रदूषण वाढत आहे. त्याचे थेट परिणाम जनतेच्या आरोग्यावर होत आहेत. डीजेच्या आवाजाने व लेझर लाईट मुळ माणसाच्या जीवनावर दुष्परिणाम होत आहेत .शालेय तसेच महाविद्यालय विद्यार्थी अभ्यासात लक्ष विचलित होते. आजारी पेशंट, लहान मुले व गरोदर महिला यांना मान सिक व शारीरिक त्रास होतो. ध्वनी प्रदूषणामुळे उच्च रक्त दाब, हृदयविकार बहिरेपणा अशा गंभीर आजारांना सामोरे जावे लागत आहे. ध्वनीच्या मर्यादेचे उल्लंघन होत असल्याने याचा थेट परिणाम समाज जीवनावर होत असल्याने उत्सव विवाह सोहळे साजरे करताना सामाजिक भान असणे आवश्यक आहे. यासाठी डीजे मुक्त मिरवणुका तालुका मध्ये व्हाव्यात अशा आशयाचे निवेदन आदर्श ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने देण्यात आले आहे. यावेळी अध्यक्ष भीमाशंकर कुर्डे, पदनकुम ार दीक्षित, गुरुलिंग म्हमाणे, मनोहर गोडसे, उमेश पुराणिक, ज्ञानेश्वर सिताप, अनिरुद्ध क्षीरसागर, अज्ञान स्वामी, सुधाकर कुलाल, अरुण ननवरे, नंदू विभुते, अशोक नागटिळक, भीमाशंकर घोंगडे, राजाभाऊ माने आदिंसह अनेकजण उपस्थित होते.



### अरुण, सुकळे प्रशालेत स्वातंत्र्यदिनाचा उत्सव

**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

अरुण प्राथमिक शाळा कै लक्ष्मीबाई रामभाऊ सुकळे प्रशाला येथे भारतीय स्वातंत्र्य दिनाचा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून माळसिद्ध नवरू हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा आगमन स्वागत गीताने करण्यात आले. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष शंकर चौगुले व ज्येष्ठ नागरिक शाळेचे पालक नारायण यनगदुंल इम्रान बागवान या मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली तसेच देशभक्तीपर गीतांचा आस्वाद घेण्यात आला. त्यानंतर सामूहिक कवयत घेण्यात आली. कार्यक्रमाचा शेवट गोड लाडू वाटप करून करण्यात आले याप्रसंगी हर घर तिरंगा अंतर्गत सहा ते १४ ऑगस्ट दरम्यान घेतलेल्या सर्व उपक्रमांचा आढावा घेण्यात आला आणि नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या असा अक्षर पालकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक रराचपपा मिराकोर व मुख्याध्यापिका अंबुबाई पोतू तसेच सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी संख्येने उपस्थित होते.

# बार्शी तालुक्यातील भोसरे येथे दीड कोटींचा मुद्देमाल जप्त

## ६९३ किलो गांजासह 3 वाहने जप्त, एकास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ ऑगस्ट-**

बार्शी तालुका पोलिसांनी आगळगाव-बार्शी रस्त्यावर भोयरे गावाजवळील सुधीर थिटे यांच्या कुक्कुटपालन शेडजवळ मोठी कारवाई करत ६९२.९४५ किलो गांजासह एका संशयिताला अटक केली आहे. या कारवाईत १ कोटी ६० लाख ५८ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन संशयित फरार झाले आहेत. पोलिसांनी टेम्पो, ट्रक आणि कारसह गांजा ताब्यात घेतला आहे.

बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सहायक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांना बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली होती की, आगळगाव ते बार्शी रस्त्याने आयशर टेम्पो आणि ट्रकमधून गांजाची अवैध वाहतूक होणार आहे. यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांच्या लेखी आदेशान्वये पोलिसांनी सापळा रचला. या कारवाईसाठी सरकारी पंच, वैद्यकीय मापनशास्त्र कार्यालयाचे कर्मचारी बाळासाहेब खाडे आणि व्यावसायिक छायाचित्रकार सुस्मित बागल यांना बोलावण्यात आले. पोलिसांनी सर्व आवश्यक साहित्य, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, लॅपटॉप, प्रिंटरसह तयारी केली. दुपारीच्या सुमारास आगळगावकडून येणारी पांढरी कार (MH १४ EC ४५३६), पांढरा टेम्पो (चक १४ एच् ९८३३) आणि लाल रंगाचा ट्रक (MH ४३ Y ८९४७) संशयास्पदरित्या येताना दिसले. पोलिसांनी वाहनांना थांबण्याचा इशारा केला असता, कारचालक आणि ट्रकचालक पळून गेले. टेम्पोचालक अंकुश दशरथ बांगर (वय ३७, रा. भोयरे, ता. बार्शी) याला पोलिसांनी पाठलाग करुन पकडले. त्याने चौकशीत आपले नाव आणि पत्ता सांगितला आणि वाहनांमध्ये गांजा आणि गांडूळ खत असल्याचे कबूल केले. पोलिसांनी वाहनांची तपासणी केली असता, ट्रकमधून १९६.२२५ किलो गांजा (९ गोण्या, किंमत ३९.२४ लाख रुपये) आणि टेम्पोमधून ४९६.७२० किलो गांजा (२६ गोण्या, किंमत ९९.३४ लाख रुपये) जप्त केला. याशिवाय, ट्रक (किंमत १२ लाख), टेम्पो (किंमत ६ लाख) आणि कार (किंमत ४ लाख) असा एकूण १ कोटी ६० लाख ५८ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. प्रत्येक गोणीतील ५० ग्रॅमचे दोन नमुने तपासणीसाठी घेऊन सर्व मुद्देमाल सील करण्यात आला. संशयित अंकुश बांगर याला नोटीस देण्यात आली. त्याने स्वत:ची आणि पोलिसांची झडती नाकारली. फरार संशयितांपैकी ट्रकचालकाचे आडनाव कदम असून, कारचालक हा ट्रकचा क्लिनर असल्याचे बांगरने सांगितले, परंतु त्यांची पूर्ण नावे आणि पत्ते माहिती नसल्याचे त्याने म्हटले. पोलिसांनी सर्व कारवाईचे छायाचित्रण आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग केले असून, सविस्तर पंचनामा तयार करण्यात आला आहे. या प्रकरणी अंकुश बांगर आणि फरार संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून, फरार संशयितांचा शोध सुरु आहे. या मोठ्या कारवाईमुळे बार्शी तालुका पोलिसांचे कौतुक होत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर आणि पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई यशस्वी झाली. अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरुद्ध पोलिसांची कठोर कारवाई सुरु राहणार असल्याचे दिलीप ढेरे यांनी सांगितले.






# मंगळवेढा नगरपरिषद व पंचायत समितीवर काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवा

## काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटीची बैठक देशाचे नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमारजी शिंदे, खासदार प्रणितीताई शिंदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ साहेब, सोलापूर जिल्ह्याचे निरीक्षक मोहन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.सातलिंग शटगार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवेढा येथे संपन्न झाली. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष शटगार म्हणाले देशाचे नेते राहुलजी गांधी यांचे हात बळकट करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी वज्रमुठ बांधावी व एकत्रपणे लढा द्यावा. खासदार प्रणितीताई शिंदे लोकसभेत जिल्ह्याचे प्रश्न पक्षाचे प्रश्न आक्रमकतेने मांडतात आहेत .यांच्याही हात बळकट करण्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू या असे आवहान केले. सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झालेले आहे. सरकारने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. उमेदवारांनी कामाला लागावे. बूथ कमिट्या सक्षम करून पंचायत समिती व नगरपरिषदे काँग्रेस पक्षाचा तिरंगा झेंडा फडकवा

मंगळवेढा तालुका हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला आहे. नगरपरिषद जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक मध्ये चांगले यश मिळविण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी कामाला लागावे असे आवहान मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रशांत साळे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनराव पाटील, प्रदेश सचिव रविकिरण कोळेकर, मोतीराम चव्हाण ,राहुल घुले, सिद्राम पवार, मारुती वाकडे आदी उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे यांनी केले. याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनराव पाटील, मंगळवेढा शहराध्यक्ष राहुल घुले, प्रदेश सचिव अँड. रविकरण कोळेकर, मारुती वाकडे, दिलीप जाधव, आयोशा शेख, सिद्राम पवार, किसन पाटील आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनराव पाटील, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, शहराध्यक्ष राहुल घुले, प्रदेश सचिव रविकिरण कोळेकर, उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, जिल्हा सरचिटणीस दिलीप जाधव, मारुती वाकडे ,आयोशा शेख, सुनिता अवघडे, बापू अवघडे, मनोज माळी, नाथा ऐवळे गफूर शेख, किसन पाटील, बजरंग चौगुले, सत्तार इनामदार, सैपन शेख, नामदेव डांगे, संदीप फडतरे, शंकर भोसले, इसाक कोकणे, किसन पाटील, सौदागर खांडेकर, निसार पाटील ,सुखदेव डोरले, शहाजी कांबळे, राजन ठेंगील, पंडित पाटील, दर्याप्पा गडदे, श्रीशैल माळी, राजू काळुंगे, शहाजान शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# माळशिरसमध्ये श्रावणी बैलपोळा उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २२ ऑगस्ट-**

माळशिरस तालुका पूर्व भागात श्रावणी बैलपोळा साजरा केला जातो या सणावर जनावर आलेल्या लंबी रोगाचे सावट दिसून आले मात्र परंपरा चालत आलेल्या या सणावर शेतकरी राजाने मात्र जमेल तसा सण साजरा केला. बळीराजाच्या कृषिसंस्कृतीशी निगडित असणारा सण म्हणजे बैलपोळा. वर्षभर शेतकऱ्यांच्या शेतात राबणाऱ्या बैलांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलपोळा साजरा करतात.आज शेतकरी आपल्या बैलजोडीला बाशींग-झूल घालून सजवून त्यांची मिरवणूक काढतात त्यांना चांगलं खाऊ-पिऊ घालून आनंदाने हा सन साजरा करतात. आयुष्यभर धन्याच्या शेतात राबणारा बैल अन् पोटच्या पोरासारखं बैलाला जपणारा शेतकरी यांच्यातील आपुलकी अन् प्रेमाचे ऋणानुबंध दाखवून देणारा हा सन... अकलूज परिसरात आज तुरळकच बैल मिरवणुका निघाल्या परंपरेप्रमाणे काही हाऊ सी शेतकऱ्यांनी आपल्या बैलांची मिरवणूक विजय चौकातून शिवापूर पेठेतून हनुमान मंदिरापर्यंत हलगी लेझीम बँड वाद्यासह काढल्या तर काही शेतकऱ्यांनी बँजो ताफा लावला होता मात्र पूर्वी इतका उत्साह या मिरवणुकीमध्ये दिसून आला नाही शेतकऱ्यांनी आपली बैल जोडी, गाई घरी पुजून सन साजरा केला त्यांना गोडधोड खाऊ घातले आधुनिक युगात ट्रॅक्टर व शेतीची अवजारे आल्याने बैल बारदाना मोडीत निघाला आहे काही हौशी शेतकऱ्यांनी बैलगाडा शर्यतीसाठी हौशी बैल जोड्या संभाळले आहेत मात्र या महागाईच्या दिवसात तेही परवडत नसल्याने नाईलाजाने शेतकरी जनावरे कमी करू लागला आहे. विजय चौक येथे चिखलाची व शाडूची बैल जोडी विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर आली होती मोठ मोठ्या शेतकऱ्यांनीही चिखलाची बैल पुजून हा सण साजरा केला. बैलांच्या सजावटीचे साहित्यही कमी प्रमाणावरच विकले गेले चे व्यापारी रमेश भालेराव व मयूर वेळापूर यांनी सांगितले त्यांनी सांगितले पूर्वी अकलूज हे मोठे बाजारपेठ होती आता गावोगावी सुविधा झाल्या आहेत व दुकानेही झाले आहेत त्यामुळे ग्राहक विभागला गेला आहे तसेच संकरित जनावरांना शिंगे नसल्याने त्यांना बेगिड हिंगोळ लावता येत नाही त्यामुळेही फक्त नवीन कंडा, गोंडा, दोर विकले गेले हौसि ग्राहकांनी भरपूर साहित्य खरेदी केले. महाराष्ट्र बँड पथकाचे मालक जाधव यांनी सांगितले की पूर्वी सकाळपासून रात्री उशिरापर्यंत आम्हाला काम मिळत होते आता मिरवणुकाच निघाल्या नाहीत त्यामुळे आम्हाला बैलपोळ्याचे काम मिळाले नाही

**मध्यवर्ती रेल्वे**

**केटरिंग स्टॉल्सचा ई-लिलाव**

लिलाव कॅटलॉग: SUR-CTG-25-18 तारीख: 21.08.2025 लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ: सुरू 12.00 दुपारी 28.08.2025, बंद 13.40 दुपारी 28.08.2025 स्टेशन्सचे नाव स्टेशन्सवरील चहाच्या स्टॉल्सच्या ई-लिलावासाठी ६० चौरस फूट क्षेत्रफळ दिले जाईल. 1. मोहोल, 2. दुधाणी, 3. माधा, 4. मॉडलिंब, 5. कुर्डुवाडी, 6. लातूर, 7. अराग, 8. भिगवान मोड: आयरेप्स लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल) निविदेचा कालावधी: वार्षिक परवाना शुल्क आणि 5 वर्षे 10% वाढीसह चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी. वेबसाईटचा पत्ता :- सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टलवर उपलब्ध आहेत http://www.Ireps.gov.in अर्ज करण्यापूर्वी सहभागींनी वेबसाइटला भेट देण्याची विनंती केली जाते.

Apex-070 DRM(C), मध्य रेल्वे, सोलापूर

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**

**निर्देशांक क्रमांक २**

निविदा क्रमांक CR-BB-SNT-P-TELE-2025-39 साठी निविदा क्रमांक CR-BB-SNT-P-TELE-2025-39, शुद्धीपत्र क्रमांक 1 जारी करण्यात आला आहे. 1. निविदा दस्तऐवज IPMPLS हटवलेला निविदा दस्तऐवज. 2. अपलोड केलेला दस्तऐवज निविदा दस्तऐवज IPMPLS. 3. अपलोड केलेला दस्तऐवज पूर्व-बिड प्रश्न आणि त्यांचे उत्तर तपशील www.ireps.gov.in या वेबसाइटवर पाहता येतील उर्वरित इतर सर्व अटी आणि शर्ती तशाच राहतील. ही निविदा सार्वजनिक खरेदी धोरण आदेश 2017 दिनांक 15/06/2017 सह संकलित केली आहे APEX-392

रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**

**E-TENDER NOTICE NO : 2025_DOAWB_1212194_1**

**(Supply, Installation, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic Rice Mill Machinery)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Chintamani Farmer Producer Co. Ltd. At- Bhendala, Tah- Paoni, Dist-Bhandara is one of the beneficiaries under the project and inviting online bids on https://mahatenders.gov.in for above mentioned Machinery. The last date for submission of online bid is 22/09/2025 up to 01:00 PM. Any updates or notices shall be published on aforementioned website only.

**District Implementation Unit, SMART Project, Dist.: Bhandara**



## सामूहिक रुद्र पठण

सोलापूर : श्री वीरभद्रेश्वर मंदिरात शुक्रवारी दुपारी उत्तर कसबा परिसरातील महिलांनी श्रावण समाप्तीनिमित्त सामूहिक रुद्र पठण केले.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी कि. अर्ज नं.२८/२०२५ नि. ७

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. साहेब यांचे कोर्टात**

श्रीमती रेखा मल्लिनाथ जिडगी वगैरे --- अर्जदार

विरूध्द

कोणी नाही --- सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी कि. अर्ज २८/२०२५ इंडियन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीताचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराचा पती मल्लिनाथ हा दिनांक १४/११/२०२२ रोजी पुणे वाघोली येथे अपघातात मयत झाले आहे. मयत मल्लीनाथ जिडगी हा मुळचा मौजे वागदरी ता.अक्कलकोट येथील कायमचा रहिवासी आहे. आणि मल्लिनाथ जिडगी हा ग्रामसेवक म्हणून सरकारी नोकरीस होता. मयत मल्लिनाथ जिडगी त्याचे पश्चात अर्जदार व अर्जदार नं.२ व ३ यांचे नांवे कायदेशीर वारसाप्रमाण पत्र मिळणेकामी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात अथवा दिनांक २२/९/२०२५ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपली हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची हरकत नाही म्हणून अर्जदाराच्या मागणी प्रमाणे सक्सेशन वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंदी घ्यावी. हे जाहीर प्रसिध्द केले तारीख २२/०८/२०२५

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर
अक्कलकोट

## जाहीर प्रसिध्दीकरण

ॲड. विजय अ. हर्डीकर
ॲड. अजय दि. माढेकर अक्कलकोट

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. साहेब यांचे कोर्टात**

सिव्हील एम. ए. नं.२४/२०२५

१) कांतप्पा शिवयोगप्पा प्रचंडे
रा. नागणसूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर -- अर्जदार
२) रत्नाबाई महांतेश कोरे
रा. नागणसूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

विरूध्द

कोणी नाही -- सामनेवाला

ज्या अर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. २४/२०२५ हा दि. बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र प्रमाणे दाखल केला असून यातील अर्जदार यांची आई लायव्वा शिवयोगप्पा प्रचंडे हिचे दि. १२/०१/२०२५ रोजी नागणसूर येथे निधन झाले आहे. अर्जदार हेच मयत लायव्वा शिवयोगप्पा प्रचंडे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून यातील अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक २३/९/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. १९/७/२०२५

सही/-
व. लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर
अक्कलकोट

## जाहीर समन्स

**मा.उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि.सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर** - अर्जदार

विरुध्द

(खालील तपशिलातील नमूद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद) - जाब देणार

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | १०१/३१८ २०२५-२६ | २,५१,१७६.८८/- | १<br>३ | **राठोड शंकर काशिनाथ,** रा. प्रताप नगर, विजापूर रोड, सोलापूर, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर<br>**बसळे अनिलकुमार रामचंद्र** रा. भिमा पाटबंधार वसाहत जिल्हा परिषद शाळेजवळ मु.पो. तुंगत, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार, दि. १२/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २१/०८/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

सही/-
उपनिबंधक
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर

## Classifieds

**पाहिजेत**

शेती कामगार बिऱ्हाड पाहिजे. अकलूज येथे नर्सरीत काम करणारे जोडपे पाहिजेत. ९८९०१४३४३२ (गिरमे)

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## महत्त्वाचे

### ...म्हणून मी वेगळा मार्ग निवडला : सारा तेंडुलकर



**मुंबई** : क्रिकेट नेहमीच माझ्याभोवती असले तरी, क्रिकेट माझी कधीही आवड नव्हती व कधीही नाही. मी गली क्रिकेट खेळली आहे, पण कारकिर्दीबद्दल कधीही विचार केला नाही. ती माझा धाकटा भाऊ अर्जुनची ताकद आहे. तो व्यावसायिकपणे या खेळाचा पाठलाग करत आहे व आपली कारकिर्द घडवू पाहात आहे. तो गोव्यासाठी एक अष्टपैलू खेळाडू म्हणून स्थानिक पातळीवर खेळतो, त्यामुळे मी माझा वेगळा मार्ग निवडला, असे भारतरत्न सचिन तेंडुलकरची कन्या २७ वर्षी सारा म्हणाली. इंडिया टुडेने सारा तेंडुलकरची मुलाखत घेतली. यात सारा तेंडुलकरने आपल्या महान वडिलांच्या पावलावर पाऊल का ठेवले नाही असे विचारले असता तिने उघडपणे सांगितले आहे. जेव्हा मी लहान होती, तेव्हा मी क्रिकेट खेळायची, पण मला खेळाची विशालता कधीच समजली नाही, असे ती म्हणाली.सारा तेंडुलकरने वायव्य मुंबईतील अंधेरी येथे पिलेट्स अकादमी सुरु केली आहे. या अकादमीच्या माध्यमातून साराने सामाजिक कल्याण क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. सारा सचिन तेंडुलकर फाऊंडेशनचेही काम पाहते.

### कनिष्ठ तिरंदाजांनी जिंकले कांस्यपदक

**विनिपेग** : कॅनडातील विनिपेग येथे झालेल्या जागतिक युवा तिरंदाजी २०२५ स्पर्धेत भारताच्या १८ वर्षांखालील महिला रिकर्व्ह संघाने कांस्यपदक जिंकले. भारतीय त्रिकुट गाथा आनंदराव खडके, जियाना कुमार व शर्वरी सोमनाथ शेंडेने प्रभावी कामगिरी करत कांस्यपदकाच्या सामन्यात अमेरिकेचा ६-० असा पराभव केला. चौथ्या मानांकित भारतीय संघाला पहिल्या फेरीत बाय मिळाला आणि दुसऱ्या फेरीत मेक्सिकोवर ६-० असा विजय मिळवला. उपांत्यपूर्व फेरीत त्यांनी जपानचा ५-३ असा पराभव केला, परंतु उपांत्य फेरीत कोरिया प्रजासत्ताकाविरुद्ध त्यांना ६-२ असा पराभव पत्करावा लागला. पुरुषांच्या १८ वर्षांखालील रिकर्व्ह गटात अगस्तय सिंग, सोहम शरद कनासे आणि आदित्य शिवप्रसाद पवार यांचे थोडक्यात पदक हुकले आणि कांस्यपदकाच्या सामन्यात त्यांना तुर्कीयेकडून ५-३ असा पराभव पत्करावा लागला. कम्पाऊंड तिरंदाजी स्पर्धेत भारत अजूनही पदकांच्या शर्यतीत आहे. शनिवारी, कुशल दलाल, अपार मिहिर नितीन आणि गणेश मणिरत्नम थिरुमुरु यांचा २१ वर्षांखालील पुरुष संघ सुवर्णपदकासाठी जर्मनीशी लढेल, तर मोहित डागर, योगेश जोशी आणि देवांश सिंग यांचा १८ वर्षांखालील त्रिकुट विजेतेपदाच्या लढतीत अमेरिकेशी लढेल.

### ड्युरंड चषक : डायमंड हार्बर, नॉर्थईस्ट अंतिम सामना आज

**कोलकाता** : प्रतिष्ठेच्या १३४ व्या ड्युरंड चषक जिंकण्यासाठी शनिवारी विवेकानंद युवा भारती क्रीडांगण येथे डायमंड हार्बर आणि गत विजेता नॉर्थईस्ट युनायटेड एफसी यांच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे. या स्पर्धेत एक संघ इतिहासाचा पाठलाग करेल, तर दुसरा संघ आपले वर्चस्व वाढवण्याचा प्रयत्न करेल. विद्यमान विजेत्याच्या वंशावळी आणि सातत्यपूर्णतेला नवोदित डायमंड हार्बरने आव्हान दिले आहे. आशियातील सर्वात जुनी फुटबॉल स्पर्धा एका नवीन अध्यायाच्या प्रतीक्षेत आहे. डायमंड हार्बर आपल्या पहिल्या मुकुटाचा पाठलाग करत असताना नॉर्थईस्ट युनायटेडला विजेतेपद राखण्याची आशा असेल. नॉर्थईस्ट युनायटेड सलग दुसऱ्या वर्षी अंतिम फेरीत परतले असून त्यांनी संपूर्ण मोहिमेत लवचिकता, शिस्त आणि तेजस्वीपणा दाखवला.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८१,३०६.८५ ( -६९३.८६ ) |
| निफ्टी | २४,८७०.१० (-२१३.६५) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. ९९,५०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु.१,१५,००० |

### तापमान/पर्जन्यमान

| | कमाल | मिमी |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.५ | २४.४ |
| अमरावती | २९.८ | ०.० |
| भंडारा | ३१.० | १.० |
| बुलडाणा | २९.० | ०.० |
| चंद्रपूर | ३२.६ | ०.० |
| गडचिरोली | २९.४ | ०.० |
| गोंदिया | ३१.४ | ६.० |
| नागपूर | ३२.८ | ०.० |
| वर्धा | ३१.२ | ०.० |
| वाशीम | २९.२ | ०.० |
| यवतमाळ | ३१.० | ०.० |

# खेलो इंडियाने डल लेक उजळून निघाले




खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन समारंभातील काही मोहक क्षण



**श्रीनगर, २२ ऑगस्ट**

जम्मू-काश्मीरमध्ये शुक्रवारी पहिल्यावहिल्या खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले.या महोत्सवात भारत आणि परदेशातून ८०० हून अधिक सहभागी सहभागी झाले होते. श्रीनगरच्या डल लेकने शुक्रवारी इतिहासाची साक्ष दिली.

मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या महोत्सवाचे वर्णन ऐतिहासिक क्षण असून हा महोत्सव काश्मीरच्या नैसर्गिक सौंदर्याशी खेळाच्या भावनेचे मिश्रण करतो, असे केले.

तीन दिवसांच्या या महोत्सवात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धक सहभागी झाले आहेत. झबरवान पर्वतांच्या आश्चर्यकारक पृष्ठभूमीवर जल क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी सज्ज आहेत.

अनेक राज्यांतील कलाकारांनी शिकारे आणि बोटींवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामुळे भव्य उद्घाटन सोहळ्यात रंगत आली. देशभरातील खेळाडूंनी डल लेकवर एका नेत्रदीपक शिकारा परेडमध्येही भाग घेतला.

पहलगाम हल्ल्यानंतर काश्मीरमधील साहसी पर्यटनाला मोठा चालना मिळण्याची अपेक्षा आहे, तसेच विविध राज्यांतील जल क्रीडा खेळाडूंना त्यांची प्रतिभा दाखवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

# राष्ट्रीय निवड समितीमध्ये नवीन सदस्यांचा शोध

**मुंबई, २२ ऑगस्ट**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) शुक्रवारी पाच सदस्यीय वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय निवड समितीमधील दोन रिक्त जागा तसेच महिला निवड समितीमधील चार पदांसाठी अर्ज मागवले.

मागील वर्षांप्रमाणेच पात्रता निकषही कायम राहिले आहेत. अर्जदारांनी किमान सात कसोटी सामने किंवा ३० प्रथम श्रेणी सामने खेळलेले असावेत. पर्यायी म्हणून, किमान १० एकदिवसीय आंतरराष्ट्रीय (वन-डे) किंवा २० प्रथम श्रेणी सामन्यांचा अनुभव असलेल्या उमेदवारांचा सुद्धा विचार केला जाईल. निवडकर्त्यांचे करार दरवर्षी नूतनीकरण केले जातात. कोणत्या निवडकर्त्यांना बदलले जाईल हे आम्ही अद्याप ओळखले नाही, परंतु ती प्रक्रिया लवकरच हाती घेतली जाईल, असे बीसीसीआयच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले.

पुढील महिन्यात होणाऱ्या आशिया चषकासाठी अलीकडेच संघ निवडणारी सध्याची पुरुष निवड समिती सध्या भारताचा माजी वेगवान गोलंदाज अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखाली आहे व त्यात एसएस दास, सुब्रतो बॅनर्जी, अजय रात्रा व एस. शरथ यांचा समावेश आहे.

मंडळाने पुरुषांच्या कनिष्ठ क्रिकेट निवड समितीवरील सदस्याच्या पदासाठी अर्ज मागवले



आहेत. या समितीकडे शिबिरे, दौरे व स्पर्धांसाठी वयोगटातील संघ (२२ वर्षांखालील) निवडण्याची जबाबदारी असेल. ही भूमिका मुख्य निवड समितीची असण्याची शक्यता आहे.

बीसीसीआयने महिला राष्ट्रीय निवड समितीवरील चार पदांसाठी अर्ज देखील उघडले आहेत. सध्याच्या समितीमध्ये नीतू डेव्हिड (अध्यक्ष), रेणू मागरिट, आरती वैद्य, कल्पना वेंकटचार व श्यामा डे शॉ यांचा समावेश आहे.

मंगळवारी, पुढील महिन्यापासून घरच्या मैदानावर होणाऱ्या वन-डे विश्वचषकासाठी संघ निवडण्यासाठी समितीची बैठक झाली. सर्व अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख १० सप्टेंबर आहे. (वृत्तसंस्था)

# नवी मुंबईत होणार पाच महिला वन-डे विश्वचषक सामने

### एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरूला वगळले

**दुबई, २२ ऑगस्ट**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) अनपेक्षित परिस्थितीमुळे पुढील महिन्यात होणाऱ्या महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या वेळापत्रकात बदल केला आहे. या स्पर्धेत पाच ठिकाणी होणाऱ्या सामन्यांपैकी बंगळुरू येथे होणारे सामने मुंबईत हलविण्याचा निर्णय घेतला आहे. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमची अनुपलब्धता असल्यामुळे फेरबदल आवश्यक होते. ३० सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या महिला वन-डे विश्वचषक स्पर्धेत नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियममध्ये तीन लीग सामने, एक उपांत्य फेरी आणि संभाव्य अंतिम सामना अशी पाच सामने आयोजित केली जाणार आहे.




अनपेक्षित परिस्थितीमुळे आम्हाला वेळापत्रकात बदल करून ठिकाण बदलावे लागले असले तरी, आता आम्हाला पाच जागतिक दर्जाच्या ठिकाणांची यादी मिळाली आहे, जी महिलांच्या सर्वोत्तम खेळाचे प्रदर्शन करेल याचा आनंद आहे. ही स्पर्धा कल्पनाशक्तीला आकर्षित करेल आणि चाहत्यांच्या नवीन पिढीला प्रेरणा देईल, असे आयसीसीचे अध्यक्ष जय शाह म्हणाले. आठ संघांच्या या स्पर्धेसाठी इतर ठिकाणी गुवाहाटी, इंदूर, विशाखापट्टणम् आणि कोलंबो यांचा समावेश आहे.

बंगळुरूला वगळण्याचा निर्णय ४ जून रोजी स्टेडियमबाहेर झालेल्या दुःखद चेंगराचेंगरीच्या पृष्ठभूमीवर घेण्यात आला आहे. या स्टेडियममधील दुर्घटनेत ११ चाहते मृत्युमुखी पडले.

या घटनेपासून स्टेडियममध्ये कोणतेही सामने आयोजित करण्यात आले नाहीत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अखेर कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेला (केएससीए) विश्वचषकासाठी आवश्यक सुरक्षा परवानग्या मिळविण्याचे निर्देश दिले.

तथापि, चेंगराचेंगरीच्या चौकशीत स्थळाची रचना सामूहिक मेळाव्यासाठी अयोग्य व असुरक्षित असल्याचे घोषित करण्यात आल्यानंतर राज्य युनिट निर्धारित वेळेत असे करू शकले नाही. (वृत्तसंस्था)

# प्रज्ञानंद, गुकेशच्या लढती बरोबरीत

### सिन्कफिल्ड चषक बुद्धिबळ

**सेंट लुईस, २२ ऑगस्ट**

अमेरिकेतील सेंट लुईस येथे सुरु असलेल्या सिन्कफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या चौथ्या फेरीत भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदाला अमेरिकेच्या सॅम्युअल सेव्हियनने बरोबरीत रोखले, तर विश्वविजेता डी. गुकेशने फ्रान्सच्या मॅक्सिम वॉचियर-लाग्रेव्हविरुद्धची लढत अनिर्णीत ठेवली.



आर. प्रज्ञानंद व डी. गुकेश

अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाने दिवसाच्या एकमेव निर्णायक सामन्यात उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हचा पराभव केला. हा त्याचा गत काही दिवसांतील दुसरा विजय ठरला.

इतर सामन्यांमध्ये अमेरिकेच्या लेव्हॉन ॲरोनियनने पोलंडच्या डुडा जान-क्रिज्स्टोफशी बरोबरी साधली आणि फ्रेंच अलिरेझा फिरोजाने वेस्ली सोसोबत गुण विभागले.

पाच फेऱ्या शिल्लक असताना कारुआनाने चार सामन्यांतून तीन गुणांसह एकमेव आघाडी घेतली. प्रज्ञानंद व ॲरोनियन प्रत्येकी २.५ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहेत. वेस्ली, फिरोझा, वॉचियर-लाग्राव्ह, सेव्हियन व गुकेश या पाच खेळाडूंचा समूह प्रत्येकी दोन गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. डुडा त्याच्यापेक्षा अर्धा गुण मागे आहे, तर अब्दुसत्तोरोव्ह त्याच्यापेक्षा केवळ अर्धा गुण मागे आहे. प्रज्ञानंदाने क्वीनच्या पांढऱ्या पैन गेममध्ये सामना केला आणि सेव्हियनच्या मार्गात कोणतीही वास्तविक समस्या निर्माण करू शकला नाही व हा सामना लवकरच अनिर्णीत राहिला. गुकेशलाही आपल्या पांढऱ्या सोंगट्यांचा फारसा वापर करता आला नाही. वॉचियर-लाग्राव्हने कठोर प्रतिकार केला. (वृत्तसंस्था)

# एलावेनिल वलारिवनचे सुवर्णलक्ष्य

### आशियाई नेमबाजी स्पर्धा

**श्यामकेंट, २२ ऑगस्ट**

भारतीय नेमबाज एलावेनिल वलारिवनने शुक्रवारी येथे १६ व्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारच्या अंतिम फेरीत प्रभावी कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले.



विश्वचषक स्पर्धेत अनेक सुवर्णपदके जिंकणारी व जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतही अव्वल स्थानावर राहिलेली तामिळनाडूची २६ वर्षीय नेमबाज एलावेनिल २५३.६ गुणांसह अंतिम फेरीत अव्वल स्थानावर राहिली. चीनच्या झिनलू पेंगने २५३ गुणांसह रौप्यपदक जिंकले, तर कोरियाच्या युंजी क्वोनने (२३१.२) कांस्यपदक जिंकले. याआधी सांघिक स्पर्धांमध्ये रौप्य आणि कांस्यपदक जिंकल्यानंतर चालू स्पर्धेत वलारिवनचे हे पहिले वैयक्तिक पदक ठरले. या स्पर्धेत सहभागी असलेली आणखी एक भारतीय महिला मेहुली घोष आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत २०८.९ गुणांसह चौथ्या स्थानावर राहिली. (वृत्तसंस्था)

# विशाल टीकेने मोडला राष्ट्रीय विक्रम

**चेन्नई, २२ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या ६४ व्या आंतरराज्य वरिष्ठ ॲथ्लेटिक्स स्पर्धेत पुरुषांच्या ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत विशाल टीकेने ४५.१२ सेकंदांची वेळ नोंदवत नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. त्याने २०१९ पासून मुहम्मद अनस याहियाचा जुना विक्रम मोडला. तामिळनाडूच्या राजेश रमेशला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.



मी खूप मेहनत घेतली आहे व मी हा विजय माझ्या प्रयत्नांचे बक्षीस म्हणून पाहतो. हे केवळ राष्ट्रीय विक्रम किंवा पात्रता फेरीबद्दल नाही, मी केवळ माझे सर्वोत्तम प्रदर्शन करू इच्छित होतो, असे विशालने सांगितले. विशाल या हंगामापूर्वी कधीही ४५ सेकंदाच्या खाली गेला नव्हता, परंतु आता त्याने पाच वेळा हे यश मिळवले आहे. उल्लेखनीय म्हणजे, तो गेल्या वर्षी केवळ ४०० मीटर धावला व त्याने जलद प्रगती केली, मे २०२५ मध्ये झालेल्या आशियाई ॲथ्लेटिक्स स्पर्धेत ४५.५७ सेकंदांची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी केली. या हंगामात मिळालेल्या यशाचे श्रेय विशालने त्याचे प्रशिक्षक जमैकाचे जेसन डॉसन यांना दिले. (वृत्तसंस्था)

# गौहर सुल्ताना सर्व क्रिकेटमधून निवृत्त

**नवी दिल्ली** : भारताची महिला डावखुरी फिरकीपटू गौहर सुलताना सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्त झाली आहे.

एप्रिल २०१४ मध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणे हा सर्वात मोठा सन्मान होता, असे गौहर सुलताना म्हणाली. तथापि, सुलतानाने २०२४ आणि २०२५ च्या महिला प्रीमियर लीग हंगामात यूपी वॉरियर्सचे प्रतिनिधित्व करून यशस्वी पुनरागमन केले. विश्वचषक, दौरे व कौशल्य आणि वृत्तीची चाचणी घेणाऱ्या लढायांमध्ये- सर्वोच्च स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान आहे, असे सुलतानाने निवृत्तीची घोषणा करताना एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये लिहिले.

मैदानातील माझ्या प्रत्येक सहकाऱ्यांसोबतच्या भेटीमुळे मी क्रिकेटपटू म्हणून घडली आहे, असेही ती म्हणाली. सुलतानाने एकदिवसीय सामन्यांमध्ये १९.३९ च्या सरासरीने ६६ बळी आणि टी-२० मध्ये २६.२७ च्या सरासरीने २९ बळी घेतले आहेत. २००९ आणि २०१३ मध्ये तिने दोन एकदिवसीय विश्वचषक खेळले आणि ११ सामन्यांमध्ये १२ बळी टिपलेत. (वृत्तसंस्था)

# युपी टी-२० लीग क्रिकेटमध्ये मेराठ मॅव्हेरिक्सच्या रिंकूचे शतक

**लखनौ, २२ ऑगस्ट**

येथील एकाना स्टेडियमवर सुरु असलेल्या युपी टी-२० क्रिकेट लीग स्पर्धेत गौर गोरखपूर लायन्सविरुद्धच्या सामन्यात मेरठ मॅव्हेरिक्स संघाला विजय मिळवून देताना रिंकू सिंगने पहिले टी-२० शतक झळकावले. या शतकी खेळीबरोबरच आपण आशिया चषकासाठी सज्ज असल्याचे व आपण भारताचा सर्वात धोकादायक फिनिशरपैकी एक असल्याचे दाखवून दिले आहे.




रिंकूने गौर गोरखपूर लायन्सच्या १६८ धावांच्या लक्ष्यावर एकहाती मात केली.

मेरठची प्रारंभी ८ व्या षटकात ४ बाद ३८ अशी घसरण झाली होती, त्यामुळे पाठलाग जवळजवळ संपलेला दिसत होता. पण कर्णधार रिंकूने साहेब युवराज (२२ चेंडूत नाबाद २२) सोबत उत्कृष्ट दर्जाचा प्रतिआक्रमण केला.

डावखुरा फलंदाज रिंकू सिंगने अवघ्या ४८ चेंडूत ७ चौकार व ८ उत्तुंग षट्कारांसह नाबाद १०८ धावा केल्या.

त्यापैकी पाच षट्कार त्याच्या शेवटच्या सहा चेंडूंमध्ये लागले. त्याने शेवटच्या षटकांमध्ये अब्दुल रहमान व वासू वत्सला गोलंदाजीच्या चिंधड्या उडवल्या व एक षटक शिल्लक असताना विजयावर शिक्कामोर्तब केले. (वृत्तसंस्था)

# यू मुम्बाचा सुनील, पुणेरी पलटनचा इनामदार ट्रॉफी जिंकण्यास उत्सुक

### १२वा प्रो-कबड्डी लीग हंगाम २९ ऑगस्टपासून

**मुंबई, २१ ऑगस्ट**

यंदाचा बारावा प्रो-कबड्डी लीग हंगाम २९ ऑगस्टपासून प्रारंभ होणार आहे. प्रो-कबड्डी लीगचा सर्वात यशस्वी कर्णधार सुनील कुमार १८ सप्टेंबर रोजी जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर होणाऱ्या आगामी प्रो-कबड्डी लीग (पीकेएल) २०२५ हंगामात महाराष्ट्र डर्बीमध्ये माजी विजेता यू मुम्बा आणि पुणेरी पलटन यांच्यात सामना होणार आहे.

सुनील कुमार एक दशकापूर्वी विजेतेपद जिंकणाऱ्या यू मुम्बा संघाचे नेतृत्व करणार आहे, त्याच वेळी असलम इनामदारने हंगाम १० मध्ये पुणेरी पलटनला ट्रॉफी मिळवून दिली होती व पीकेएल जिंकणारा तो पहिला महाराष्ट्रीयन कर्णधार ठरला होता.

महाराष्ट्र कबड्डीसाठी खूप काळापासून लोकप्रिय आहे आणि प्रो-कबड्डी लीगच्या (पीकेएल) हंगाम १२ मध्ये सर्वाधिक प्रतिनिधित्व मिळवणाऱ्या दुसऱ्या क्रमांकाच्या संघात असेल. या खेळात राज्याचा समृद्ध वारसा पुढे नेणारे यू मुम्बा आणि पुणेरी पलटन हे दोघेही माजी प्रो-कबड्डी लीग विजेते आहेत.



सुनील कुमार



अस्लम इनामदार

१२ व्या हंगामाच्या सुरुवातीला या क्लासिक महाराष्ट्रीयन प्रतिस्पर्ध्याचे पुनरागमन होईल. पारंपारिकपणे, दोन्ही संघ स्पर्धेच्या व्यवसायिक शेवटी नियमित दावेदार राहिले आहेत आणि नेहमीप्रमाणे या हंगामात एकापेक्षा एक चांगली कामगिरी करण्याची अपेक्षा जास्त आहे.

या प्रतिस्पर्ध्याचा नवीनतम अध्याय १८ सप्टेंबर रोजी जयपूरमधील ऐतिहासिक सवाई मानसिंग इनडोअर स्टेडियमवर उलगडेल. २०२४ मध्ये प्रो-कबड्डी लीगचा १००० वा सामना याच ठिकाणी झाला होता.

पुणेरी पलटनचे प्रशिक्षक म्हणून कबड्डीचे दिग्गज अजय ठाकूर यांची उपस्थिती ही स्पर्धा आणखी वाढवते. त्याच वेळी, यू मुम्बाचे मुख्य प्रशिक्षक अनिल चपराना यांच्या मार्गदर्शनाखाली आहे, जे एका हंगामानंतर सहाय्यक प्रशिक्षक म्हणून पुन्हा संघात सहभागी होणार आहेत.

दुखापतीतून परतलेला आणि आपली छाप पाडण्यास उत्सुक असलेला पुणेरी पलटणचा कर्णधार इनामदार म्हणाला की, महाराष्ट्रात जन्मलेला आणि वाढलेला असल्यामुळे कबड्डीमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करणे हे माझे नेहमीच स्वप्न होते. पुणेरी पलटणसाठी खेळणे आणि विजेता होणे हा माझ्या कारकिर्दीतील सर्वात अभिमानास्पद क्षणांपैकी एक आहे. पीकेएलमध्ये पुन्हा एकदा इतक्या मोठ्या मंचावर उभे राहणे आणि मी जिथून आलो आहे, त्याचे प्रतिनिधित्व करणे ही माझ्यासाठी खूप खास भावना आहे.

या हंगामाकडे पाहताना, यू मुम्बाचा कर्णधार सुनील कुमार म्हणाला की, महाराष्ट्र नेहमीच कबड्डीचे एक बलस्थान राहिले आहे व यावरून हा खेळ खरोखरच किती मोठा आहे हे दिसून येते. माझ्यासाठी, यू मुम्बाचे नेतृत्व करणे ही खूप अभिमानाची गोष्ट आहे. या हंगामात आमचे ध्येय प्लेऑफच्या पलीकडे जाऊन ट्रॉफी मुंबईत परत आणणे आहे.

यू मुम्बाचे मुख्य प्रशिक्षक अनिल चपराणा म्हणाले की, यू मुम्बाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून परत येणे माझ्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. माझे लक्ष खेळाडूंमध्ये शिस्त, निर्भयता आणि कधीही हार न मानण्याची वृत्ती निर्माण करण्यावर आहे, त्यामुळे प्रत्येक सामन्यात त्यांचे सर्वोत्तम देतील.

पुणेरी पलटणचे मुख्य प्रशिक्षक अजय ठाकूर हे एक खेळाडू म्हणून त्यांच्या अनुभवाचा वापर यशस्वी पूर्णवेळ प्रशिक्षक होण्यासाठी करण्यास तितकेच उत्सुक आहे.

खेळाडू होण्यापासून पूर्णवेळ प्रशिक्षकाची भूमिका स्वीकारणे हे एक आव्हान आणि विशेषाधिकार दोन्ही आहे. अनेक वर्षे कबड्डी खेळल्यानंतर आता मी या नवीन पिढीतील खेळाडूंमधील सर्वोत्तम कामगिरी बाहेर काढण्यासाठी त्या अनुभवाचा वापर करू इच्छितो, असे ठाकूर म्हणाले. (वृत्तसंस्था)

# भारत निर्भय सूर्याच्या नेतृत्वाखाली आशियावर वर्चस्व गाजवू शकतो

**नवी दिल्ली, २२ ऑगस्ट**

भारताचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागने आगामी आशिया चषक जिंकण्यासाठी सध्याच्या भारतीय टी-२० संघाला पाठिंबा दिला आहे. निर्भय सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ आशियावर वर्चस्व गाजवू शकतो, असे सेहवागने म्हटले आहे.

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान संयुक्त अरब अमिरातमध्ये (यूएई) होणार आहे. २०१६ मध्ये टी-२० स्वरूपात स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीचे विजेतेपद पटकावणाऱ्या भारताचा गट पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान, ओमान आणि यजमान यूएईसह गट अ मध्ये आहे. गट ब मध्ये श्रीलंका, हाँगकाँग, अफगाणिस्तान आणि बांगलादेश यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

### सिनरचा कोप्रिव्हाविरुद्ध सलामीचा सामना रंगणार

**न्यू यॉर्क** : अव्वल मानांकित आणि गतविजेता जॅनिक सिनर आपले अमेरिकन ओपन विजेतेपद कायम राखण्यासाठी पहिल्या फेरीत झेक प्रजासत्ताकच्या विट कोप्रिव्हाविरुद्ध सलामीचा सामना खेळणार आहे. या स्पर्धेत नोवाक जोकोविच आमि स्पेनचा कार्लोस अल्काराझला एकाच गटात ठेवण्यात आले आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला अल्काराझसोबतच्या सिनसिनाटी ओपन अंतिम सामन्याच्या पहिल्या सेटमध्ये निवृत्त झालेला २४ वर्षीय इटालियन खेळाडू उपांत्यपूर्व फेरीत ब्रिटनच्या जॅक ड्रेपरशी भेटू शकतो. कार्लोस अल्काराझला यूएस ओपनमध्ये नोवाक जोकोविचशी झुंज द्यावी लागली. अल्काराझला अंतिम फेरीत पोहोचण्याचा एक कठीण मार्ग आहे,

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### मंदिर समितीच्या गोशाळेत पोळा सण उत्साहात साजरा, श्रीस अलंकार परिधान

**पंढरपूर, दि.२२ ऑगस्ट -**
श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरची यमाई तलाव येथे गोशाळा आहे. या गोशाळेत मंदिर समितीच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यावेळी बैल-गाईंची विधिवत पुजा करण्यात आली. या गोशाळेत लहान मोठी २२६ गाई व वासरे आहेत. तसेच पोळा सणानिमित्त श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचा कंगनजोड, शिरपेच, मत्स्य जोड, गोफ, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तोडेजोड, पदकासह लॉकेट, बोरमाळ, चंद्रहार, मोहन माळ इत्यादी व श्रावणी शुक्रवार निमित्त श्री रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्याची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.



### केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आठवले यांचा सत्कार

**अक्कलकोट दि २२ ऑगस्ट-**
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार ना .रामदासजी आठवले साहेब हे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले असता पंढरपूर शासकीय विश्राम गृह येथे रिपाइं अक्कलकोट तालुक्याच्या वतीने केंद्रीय मंत्री रामदाजी आठवले साहेबांचे स्वागत सत्कार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या उपस्थित मध्ये रिपाइं आठवले (गट)अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी अक्कलकोट तालुक्यातील विविध प्रश्नांचे निवेदन देण्यात आले तसेच अक्कलकोट तालुक्यातील अ.जा आ.जा आणि इतर अनेक जातींचे जात फडताळणी प्रमाणपत्र प्रलंबित असल्याचे आठवले साहेबांचे निदर्शनास आणून दिले यावेळी संबंधित जात फडताळणी समिती अध्यक्ष व सदस्य यांना सूचना देऊ असे आठवले साहेब यांनी सांगितले यावेळी जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले,जिल्हा सरचिटणीस,शामसुंदर रवी गायकवाड,जिल्हा पदाधिकारी व अक्कलकोट तालुक्यातील रिपाइं युवक आघाडी जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरू,तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे,गौतम मडिखांबे,सिद्धार्थ आण्णा शिवशरण,अमोल साबळे, आदी उपस्थित होते.

### भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते छोटुभाई उर्फ गोकुळदास पोहे अनंतात विलीन

**बार्शी, दि. २२ ऑगस्ट**
ज्येष्ठ भाजपा नेते छोटुभाई उर्फ गोकुळदास मदनलाल लोहे यांच्या पार्थिवावर आज बार्शीतील मोक्षधाम येथे अंतिम सस्कार करण्यात आले. याप्रसंगी आप्तेष्ट नातेवाईक, मित्र परिवार आणि बार्शी शहरातील विविध राजकीय पक्षातील मान्यवर नेते, सामाजिक सघटनाचे प्रतिनिधी आणि भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सघ परिवार व भगवत सहकारी परिवार, कामगार चळवळीतील सहकारी, व्यापारी बाधव मोठया संख्येने अंत्यविधीस उपस्थित होते. याप्रसंगी आ. दिलीपराव सोपल, डॉ. बी.वाय. यादव रा. स्व. सघाचे जिल्हा कार्यवाह ऋषिकेश कुलकर्णी, तालुका कार्यवाह अरुण ग्रामोपाध्ये, भारतीय जनता पार्टी नेते विजय राऊत, भगवत सह. परिवार ॲड. असिफभाई ताबोळी, नंदकुमार देशमु, प्रा शेखर गजभार, सुनिल जावळी आणि सतोष ठोगे आदी मान्यवरानी श्रद्धांजली वाहिली. सर्वांनी छोटुभाईच्या आठवणीस उजाळा देताना रा. स्व. संघ, जनसघ, एकत्रित जनता पक्ष व आताची भारतीय जनता पार्टी, भारतीय मजदूर सघ, भगवंत परिवार अशा सर्वासोबत असायचे. एकाच विचारधारेवर कोणतीही तडजोड न करता आपल्या विचारावरती ठाम, परखड व स्पष्टपणे अखेरच्या श्वासापर्यंत काम करत राहिले. असे व्यक्तीमत्व म्हणून छोटुभाऊ लोहे याची ओळख होती. असे व्यक्तीमत्व आता समाजात लोप पावत आहेत. छोटुभाऊ लोहे यांच्याविषयी अनेकांनी श्रद्धांजलीपर भाषणात राजकिय व सामाजिक कार्याबद्दल गौरव व्यक्त केला.



## निधन वृत्त...

### ॲड. प्रदीप बोचरे



**बार्शी, दि २२ ऑगस्ट -**
अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील ड. प्रदीप बोचरे यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी पहाटे खाजगी रुग्णालयात निधन झाले. निधनासमयी ते ५६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठेतील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### लक्ष्मीबाई नक्का



**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**
जुना बिडी घरकुल, सोलापूर येथील रहिवासी कै. लक्ष्मीबाई राजनरसू नक्का (वय वर्षे ८३) यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. शुक्रवार दि. २२/०८/२०२५ रोजी पद्मशाली स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, तीन मुली, जावई, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. पूर्व भागातील प्रसिद्ध नक्का हॅण्डलूम्सचे श्रीनिवास नक्का यांच्या त्या मातोश्री होत.

# पंढरपुरात भरदिवसा एका तरुणावर वार

**कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा**

**पोलीस प्रशासन बैठकांमध्ये व्यस्त**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ ऑगस्ट -**
तीर्थक्षेत्र पंढरी नगरीमध्ये कोयता गँगची दहशत पुन्हा वाढीस लागल्याचे दिसत आहे. कारण पंढरपूर मध्ये आज एक धक्कादायक घटना घडली असून दिवसाढवळ्या एका १७ वर्षे तरुणावर भर चौकात कोयत्याने वार करण्यात आले आहे. श्रेयस धर्मा पवार (वय १७) असे या हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. येथील शहर पोलीस ठाण्यात या घटनेबाबत रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती दरम्यान दिवसाढवळ्या झालेल्या



या हल्ल्याच्या घटनेमुळे सर्वसामान्य नागरिक मात्र भयभीत झाले असून पोलिसांचा गावगुंडांवर वचक राहिला नाही का ? असा सवाल देखील आता सर्व सामान्य नागरिकातून उपस्थित केला जात आहे.

येथील संत गजानन महाराज मठासमोर एका तरुणावर चार ते पाच तरुणांनी कोयत्याने हल्ला केल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली. अज्ञात कारणा वरून तरुणांच्या टोळक्याने श्रेयस धर्मा पवार (वय १७) या तरुणावर धारदार कोयत्यांनी वार केले आहेत. या हल्ल्यामध्ये श्रेयश पवार हा सतरा वर्षीय तरुण गंभीर जखमी झालेला आहे.

गणेश उत्सव जवळ आल्यामुळे एकिकडे पोलीस अधिकारी व प्रशासन शुक्रवारी दुपारी गणेश मंडळ पदाधिकार्यांच्या समवेत बैठका घेऊन कायदा सुव्यवस्था राखण्याचे आव्हान करीत असतानाच दुसरीकडे ही घटना घडली आहे. विशेष म्हणजे काळा मारुती पोलीस चौकी हल्ला झालेल्या ठिकाणा पासून अगदी हाकेच्या अंतरावर आहे. तरी देखील ही घटना घडल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून पंढरपूरमध्ये सोशल मीडियावर उघडपणे गुंडगिरीचे स्टेटस तसेच व्हिडिओ व्हायरल होत आहेत. त्यामुळे या मधूनच पुन्हा एकदा पंढरपूर मध्ये टोळी युद्ध भडकते की काय अशी भीती सध्या पंढरपूर मधील नागरिकांना वाटू लागली असून त्यातूनच हा हल्ला झाला असावा अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.



**श्री नागनाथ मंदिर मोहोळ येथे नागेशभक्त श्री नागनाथ गायकवाड(करोडपती विमा एजंट) यांनी आज श्रावण समाप्ती निमीत्त त्यांच्या शेतात पिकलेल्या पेरूंची आरास बैलपोळा दिवशी केली.**



## वाघाची कातडी व हत्तिदंत बाळगल्या प्रकरणी शहाला जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी दि.२२ ऑगस्ट-**
टेंभुर्णी ता माढा येथे दि.२१ रोजी तस्करी करण्यासाठी वाघाची कातडी आणि हस्तिदंत जवळ बाळगल्या प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या टेंभूर्णी येथील व्यापारी अमोल विजयकुमार शहा यांस बुधवार दि.२० रोजी माढा न्यायालयाने जामीन अर्ज मंजूर करण्यात आला असल्याची माहिती ड संतोष कानाडे यांनी दिली.

सोलापूर नियंत्रण कक्ष आणि टेंभुर्णी पोलीसांनी शनिवारी दि.२१जून रोजी संयुक्त कालवाई करून व्यापारी अमोल विजयकुमार शहा वय ४५ वर्षे रा. ढवळेनगर, टेंभुर्णी ता. माढा जि सोलापूर यास अटक करून वाघाची कातडी व हस्तिदंत बाळगल्या प्रकरणी अटक केली होती.याप्रकरणात पोलीसांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले नंतर संशयित आरोपीने ड.संतोष कानाडे यांचेमार्फत अर्ज केला होता.यामध्ये झालेला तपास,सादर केलेला न्यायनिवाडा ग्राह्य धरून न्यायाधीश ए डी कुलकर्णी यांनी जामीन मंजूर केला.आरोपीतर्फे ड संतोष कानाडे यांनी तर सरकार पक्षातर्फे ड कांबळे यांनी काम

## शिक्षक देशाच्या प्रगतीसाठी सगळ्यात महत्त्वाचा घटक

**माजी आ. राजन पाटील यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२२ ऑगस्ट-**
शिक्षक हा देशाचा कणा आहे.तो सुजाण नागरिक घडवण्याचा प्रयत्न करतो.अहोरात्र आपल्या शाळेसह कर्तव्यनिष्ठ कार्य करत असतो. तो प्रसिद्धीपासून दूर असतो.शिक्षकांनी केलेल्या कार्याची प्रेरणा देऊन त्यांच्या पाठीवर थाप देण्यासाठीच मोहोळ तालुका प्राथमिक शिक्षक समितीने लक्ष्मीबाई पाटील कृतिशील शिक्षक पुरस्काराचे आयोजन केल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील यांनी व्यक्त केले.

मोहोळ तालुका प्राथमिक शिक्षक समितीकडून २००५ सालापासून मातोश्री लक्ष्मीबाई पाटील कृतिशील शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ आयोजित करण्यात येत आहे.२०२५ या वर्षी श्रीमती सविता भिवाओहोळ जगताप वस्ती,शाहाजान रसूल मुलाणी देवडी, दिनकर प्रभाकर चव्हाण शिरापूर (सो),महेश नवनाथ गोडगे माळी वस्ती अनगर,परशुराम बब्रुवान गुरव न.पिंपरी, अनिता रावसाहेब पाचोरे पेनुर नं १,जयश्री आप्पाराव डुबल डोके वस्ती मोहोळ,काशिनाथ नागनाथ कोळी विरवडे बु,सुहास सुभाष क्षीरसागर मलिकपेठे,कालिंदा



भारत देशमुख पापरी,पूजा धनराज वाघमारे वस्ती वाघोली,रोहित सूर्यकांत उबाळे पोफळी,तनुजा बजरंग इंगळे शेटफळ,शरणू बसवराज हरनूर कातेवाडी,पिंटू काळू राठोड मुर्ढेवाडी,चंद्रकांत बलभीम कोळी शिक्षण कार्यालय मोहोळ अशा एकूण १६ शिक्षकांना पुरस्कार वितरित करण्यात आले पुरस्कार वितरण कार्यक्रम घाटोळे मंगल कार्यालयात झाला.याप्रसंगी ते बोलत होते. प्रसंगी सेवानिवृत्त शिक्षकांचा ही सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष पाटील पुढे बोलताना म्हणाले की देशाच्या प्रगतीसाठी सगळ्यात महत्त्वाचा घटक हा शिक्षक आहे.मुलांचा बुद्धांक बनवण्याचं काम करतो. विद्यार्थी हा चिखलाच्या गोळ्याप्रमाणे असतो. ज्या पद्धतीने कुंभार चिखलाच्या गोळ्याला आकार देतो त्या पद्धतीने त्याची निर्मिती होते. त्याच पद्धतीने शिक्षक हा विद्यार्थ्याला घडवत असताना कसे परिश्रम घेतो त्याच पद्धतीने विद्यार्थी घडत असतो. त्यावरच विद्यार्थ्याचे भविष्य अवलंबून राहते. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती धनाजी गावडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, माजी उपनगराध्यक्ष प्रमोद डोके, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती जगन्नाथ कोल्हाळ, नागेश साठे,कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बालाजी साठे,गोविंद पाटील, अनिल कादे, राजकुमार पाटीलसह शिक्षक उपस्थित होते.

## अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत करा



**किसान एकता संघ दिल्लीची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि २२ ऑगस्ट**
अक्कलकोट तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी किसान एकता संघ दिल्ली या संघटनेच्या वतीने करण्यात आली. याबाबतचे निवेदन शुक्रवार दिनांक २२ ऑगस्ट रोजी नायब तहसीलदार यांना देण्यात आले. किसान एकता संघ दिल्लीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष चंद्रकांत रेवणसिद्ध पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. अतिवृष्टीमुळे झालेल्या सर्व पिकांचे सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी. दुधनी मंडल मधील खरीप पिकांचे पंचनामे करा. अक्कलकोट तालुक्यात गेल्या पंधरा दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. या पावसामुळे अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निर्माण होऊन खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तालुक्यातील शेतीतील तूर , उडीद , सोयाबीन , मूग , कांदा, फळबागा यांचे मोठे नुकसान झाले आहे. दुधनी मंडल मध्ये पंचनामे करण्यास विलंब होत असून या ठिकाणी पंचनामे सुरू करावेत. तलाठी , सर्कल यांना पंचनामे करण्याचे आदेश देण्यात यावेत. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत शासनाने द्यावी अशी मागणी किसान एकता संघाच्या वतीने करण्यात आली. अक्कलकोटचे नायब तहसीलदार दत्तात्रय गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील, तालुकाध्यक्ष रमेश वागे, उपाध्यक्ष नागेश कांबळे, शिवानंद नागणसुरे ,महिला अध्यक्ष ज्योती वगाले, उपाध्यक्ष राजशेखर मुलगे, अशोक ढगापूर, सरपंच चांद जमादार, उपसरपंच सिद्धलिंग आंदेवाडी, मुबारक नाईकवाडी, मल्लिकार्जुन पाटील उपस्थित होते. अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना पंचनामे करून तात्काळ मदत देण्यात यावी अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडू असा इशारा राष्ट्रीय उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिला.



## सेट्रीज एनवोर्मेंटल ट्रस्ट तर्फे शेतकऱ्यांना फळझाडांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ ऑगस्ट -**
सेट्रीज ऍग्रो फॉरेस्ट प्रकल्प अंतर्गत वाणीचिंचाळे, ता.सांगोला येथे मोफत फळबाग मार्गदर्शन व फळझाडे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, ट्रस्टचे महाराष्ट्र समन्वयक महेश पाटील, आबा लाड, जिल्हा समन्वयक विनोद सुभेदार, वाणीचिंचाळे गावचे सरपंच, माजी सरपंच, सर्व पदाधिकारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेट्रीज एनवोर्मेन्टल ट्रस्टच्या माध्यमातून सांगोला, मंगळवेढा व पंढरपूर या तालुक्यांमध्ये शेतकरी बांधवांसाठी केशर आंबा, दशेरी आंबा, फणस, चिंच, जांभूळ, आवळा, संत्री, मोसंबी, चिकू यासारखे फळझाडे त्याचबरोबर मोहगणी, चंदन, रक्त चंदन, साग हे देखील झाडे मोफत दिली जात आहेत. ज्या शेतकरी बांधवांना फळझाडे लावायची आहेत त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन ट्रस्टच्या वतीने यावेळी करण्यात आले.

## सोलापूर सोशल फाउंडेशनतर्फे सांगोला तालुक्यात रोपांची भेट



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ ऑगस्ट -**
माणगंगा ब्रह्मणसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सांगोला तालुक्यातील माणनदी काठावर वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन अशा खुल्या स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. या स्पर्धेसाठी लागणारी विविध प्रकारची रोपे सोलापूर सोशल फाउंडेशन यांच्यावतीने पुरविण्यात आली आहेत. वृक्षारोपण स्पर्धेत भाग घेणाऱ्या ग्रामपंचायतीना या रोपाचे वाटप सोलापूर सोशल फाउंडेशनचे सल्लागार अजितदादा कंड्रे, मुख्य समन्वयक विजय पाटील, डॉ. श्रीधर यलमार, ऍड.गजानन भाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माणगंगा भ्रमण सेवा संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे, उपाध्यक्ष डॉ.विजय जाधव, सचिव डॉ.राजेंद्र सूर्यवंशी, डॉ.मच्छिंद्र सोनलकर, चिणके गावचे उपसरपंच मोहन मिसाळ, तानाजी केदार, सुरेश मिसाळ, तानाजी मिसाळ, राजेश मिसाळ, दत्तात्रय मिसाळ, नंदकुमार मिसाळ, मुख्याध्यापक बंडगर, सुहास राऊत, माजी सरपंच गोपाळ मिसाळ, राजू झरे उपस्थित होते.

आ.सुभाषबापू देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली व सोलापूर सोशल फाउंडेशन माध्यमातून जिल्ह्यामध्ये वृक्ष लागवड करून सोलापूर जिल्हा समृद्ध करूया असे मनोगत अजितदादा कंड्रे यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच विजय पाटील व ऍड.गजानन भाकरे यांनी मनोगतात दि.२७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर आयोजित केलेल्या पर्यटन सप्ताहाची संपूर्ण सविस्तर माहिती दिली. वैजिनाथ घोंगडे यांनी वृक्ष लागवड स्पर्धेची माहिती दिली. प्रास्ताविक मोहन मिसाळ यांनी केले. वृक्ष लागवडीसाठी आ.सुभाषबापू देशमुख यांनी उत्कृष्ट प्रकारच्या विविध जातींच्या रोपांचा पुरवठा केल्याबद्दल सर्व उपस्थितांच्या वतीने आ.सुभाषबापू देशमुख यांचे आभार मानण्यात आले.




## ठाणे येथील गोविंदा मंडळाचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. २२ ऑगस्ट -**
ठाणे येथील दहीहंडी फोडणाऱ्या गोविंदा मंडळाचा सत्कार श्री क्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.

ठाणे येथील माथाडी कामगार नेते स्वामी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आमदार शिवाजीराव पाटील(चंदगड,जि.कोल्हापूर) यांच्या स्वामी प्रतिष्ठानच्या वतीने दहीहंडी उत्सवाचा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. दहीहंडी फोडण्याचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. दरम्यान मुंबई वडाळा येथील प्रसिद्ध आराध्य ग्रुप गो. गोविंदा या दहीहंडी उत्सव सराव कार्यक्रमाचा शुभारंभ श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.

बृहन-मुंबई महानगरपालिकेचे माजी नगरसेवक विजयभाऊ तांडेल यांनी आयजन केले होते. सिनेअभिनेता सुनिल शेट्टी, माजी खासदार किरीट सोमय्या, आमदार प्रवीण दरेकर माजी खासदार मनोज कोटक, खासदार संजीव नाईक, नजीब मुल्ला, माजी खासदार आनंद परांजपे, आ.निरंजन डावखरे,राजाभाऊ गवारे, मंगेश चिवटे, अन्नछत्र मंडळाचे खजीनदार लाला राठोड, विश्वस्त संतोष भोसले, रोहित खोबरे, योगेश अहंकारी, शिवराज स्वामी, मैनुद्दीन कोरबू, सरफराज शेख, प्रा.सायबन्ना जाधव, स्वामीनाथ गुरव, संतोष माने, असद फुलारी, कुणाल भालेकर, रमेश हलसंगी, आदिसह विविध विभागाचे ठाणे येथील अधिकारी, कर्मचारी, गोविंदा पथकातील गोविंदा बहुसंख्येने उपस्थित होते.

## महत्वाचे...



### राजा माने यांना 'शांतीदूत' पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि.२२ ऑगस्ट -**

संपादक, माध्यम तज्ज्ञ व राजकीय विश्लेषक राजा माने यांच्या पत्रकारितेतील योगदानाबद्दल त्यांना ''शांतीदूत''हा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.''शांतीदूत'' चे संस्थापक व निवृत्त आय पी एस अधिकारी डॉ. विठ्ठलराव जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राजा माने हे डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र व प्रतिबिंब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तसेच महाराष्ट्र शासनाच्या शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी समितीचे सदस्य आहेत.गेली ४२ वर्षे ते महाराष्ट्राच्या पत्रकारितेत सक्रीय आहेत.या प्रसंगी सौ विद्याताई जाधव यांच्या हस्ते सौ मंदा माने यांचा ही सन्मान करण्यात आला.या वेळी डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना राज्य सचिव महेश कुगावकर, राज्य संघटक अमोल पाटील,पुणे शहर पदाधिकारी पराग डिंगनकर, शांतीदूत परिवाराचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष सुरेश सपकाळ, सचिव, मधूकर चौधरी, अध्यक्ष शिवाजी नगर शांतीदूत परिवार आदी उपस्थित होते.



### महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना उपशहर प्रमुखपदी वैभव रंपुरे यांची निवड

**सोलापूर, दि.२२ ऑगस्ट -**

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना सोलापुर उपशहरप्रमुखपदी वैभव रंपुरे यांच्या निवडीचे पत्र महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते देण्यात आले.वैभव रंपुरे सलग दहा वर्षापासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत महाराष्ट्र सैनिक म्हणून कार्यरत आहेत व राजे ग्रुपच्या माध्यमातून वसतिगृह,महापालिका शाळा व बेघर लोकांसाठी मनसेच्या अनेक आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोलापूर विभागाने त्यांना विद्यार्थी सेनेच्या उपशहरप्रमुख पदाची जबाबदारी दिली आहे. राज ठाकरेंच्या विचारांनी प्रेरित होऊन कट्टर मनसैनिकास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी विद्यार्थी सेनेच्या शहर उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देऊन त्यांचा मनसे सन्मान केला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, वाहतूक सेना शहर संघटक जितेंद्र टेंभुर्णीकर, स्वयंरोजगार जिल्हासंघटक गोविंद बंदपट्टे मनसैनिक उपस्थित होते.

### दारुच्या नशेत तरुणाने स्वत:ला केले जखमी

**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

दारुच्या नशेतील तरुणाने ब्लेडने मारून घेऊन स्वत:ला जखमी करून घेतले. हा प्रकार शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारास सत्तर फूट परिसरातील गेंटयाला टॉकीजजवळ घडला. राजू गंगाराम द्यावलपल्ली (वय २५ , रा. गेंटयाल टॉकीजजवळ) असे तरुणाचे नाव आहे. राजू याने मद्यप्राशन केले होते. शुक्रवारी सकाळी त्याने राहत्या घराजवळ ब्लेडने स्वत:च्या डाव्या हातावर कापून घेतले. यात जखमी झाल्याने दुपारी २.२० वाजता आई लता यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चारचाकी वाहनाची दुचाकीला धडक अक्कलकोट येथील दोघे जखमी

**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

वळसंगहून अक्कलकोटच्या दिशेने जाताना वळसंग सूतमिलसमोरील रस्त्यावर पाठीमागून चार चाकी वाहनाने धडक दिल्याने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. यात अक्कलकोट येथील दोघे जखमी झाले असून हा अपघात शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास घडला. बिस्मिला रफिक आत्तार (वय ४०) व फरीद रफिक आत्तार (वय १८, दोघे रा. मेतन नगर, अक्कलकोट) अशी जखमीची नावे आहेत. वरील दोघे वळसंग येथून दुचाकीवरून अक्क्कलकोट येथे जात होते. वळसंग सूतमिलसमोरील रस्त्यावर त्यांच्या दुचाकीला पाठीमागून आलेल्या चारचाकी वाहनाने धडक दिली. यात बिस्मिला यांच्या पायाला आणि पाठीला जखम झाली. तर फरीदच्या डोक्याला मुकामार लागल्याने दुपारी चार वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पाच महिन्याची गरोदर महिला पाय घसरून पडली

**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

मुलीला शाळेत सोडायला जाताना रस्त्यावरील चिखलात पाय घसरून पडल्याने पाच महिन्याची गरोदर महिला जखमी झाली. हा प्रकार बुधवारी सकाळी अकरा वाजता विरतपस्वी शाळेजवळ घडला.सविता बालाजी निचळ (वय २१, रा. मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे महिलेचे नाव आहे. सविता या बुधवारी सकाळी अकराच्या सुमारास मुलीला शाळेत सोडण्यासाठी घरातून पायी निघाल्या होत्या. त्या विरतपस्वी शाळेजवळ गेल्यानंतर तेथील चिखलात त्यांच्या पाय घसरल्याने त्या खाली पडल्या. यात त्यांच्या डाव्या पायाला जखम झाली. तसेच उजव्या हाताला व कमरेला मुकामार लागला. शुक्रवारी दुपारी १.२० वाजता त्या उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# पिकांच्या नुकसानीचे पंचनामे आजपासून : जिल्हाधिकारी

## अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

जिल्ह्यात मागील काही दिवसापासून अतिवृष्टी, सततचा पाऊस तसेच उजनी धरण १००% भरल्याने तसेच वीर धरणातून भीमा व सीना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी सोडावे लागले त्यामुळे दोन्हीही नदीकाठच्या गावांमध्ये तसेच शेती पिकामध्ये पुराचे पाणी जाऊन झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५ पासून सुरू करावेत, असे आदेश कृषी, महसूल व ग्रामविकास यंत्रणांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.



तसेच जिल्ह्यात अतिवृष्टी व सततच्या पावसाने अनेक लघु व मध्यम प्रकल्प भरलेले असून या प्रकल्पातूनही पाणी ओव्हर फ्लो झाल्याने शेती पिकांचे नुकसान झालेले आहे, अशा ठिकाणचेही नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले आहेत. पंचनाम्यापासून एक ही शेतकरी वंचित राहणार नाही याबाबत संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आज रात्री कृषी विभागाच्या जिल्हा, तालुका व ग्राम स्तरीय यंत्रणेची तसेच तहसीलदार प्रांताधिकारी यांची दूरदृश्य प्रणाली द्वारे अतिवृष्टी, पुराच्या पाण्यामुळे झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या अनुषंगाने आढावा बैठक घेऊन त्यात सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित करावेत असे आदेश त्यांनी दिले.

डीसीसी बँक कर्जवाटप प्रकरणी...

# जबाबदारी निश्चितीवर आता एकत्रित सुनावणी


### सहकारमंत्री पाटील यांच्यासमोर सुनावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्ज वाटपातील गैरप्रकारासंदर्भात मुंबई येथे सहकारमंत्री बाबासाहेब पाटलांसमोर माजी संचालक मंडळांची सुनावणी झाली. त्यावेळी जबाबदारी निश्चितीची सुनावणी विविध घेण्यापेक्षा एकत्रित घ्यावी, अशी मागणी माजी संचालक मंडळांनी केली. त्यास सहकारमंत्री पाटील यांनी मंजुरी दिली. त्यामुळे आता माजी संचालक मंडळांची कलम ८८ ची सुनावणी एकत्रित होणार आहे.

जिल्हा बँकेच्या कर्ज वाटपात गैरप्रकार केल्याचा ठपका ठेवून माजी संचालक मंडळावर कलम ८८ नुसार जबाबदारी निश्चित केली होती. त्याविरोधात तत्कालिन ३६ संचालकांनी तीन याचिका दाखल केल्या होत्या. त्याची सुनावणी सुरू आहे. सहकारमंत्री पाटील यांच्याकडे माजी संचालक मंडळांनी अपील केल्यानंतर अनेक माजी संचालक मंडळांची पहिली सुनावणी झाली. मात्र, दुसऱ्या सुनावणी दरम्यान सर्वच माजी संचालक मंडळांनी एकत्रित येऊन याचिकाकर्त्यांची सुनावणी एकत्रित घेण्याची मागणी केली. त्यास सहकारमंत्र्यांनी मंजुरी दिली. दरम्यान, सी. ए. संजय कोठाडिया यांनी दाखल केलेल्या अपिलामध्ये तत्कालिन संचालकांच्या वतीने एकत्रित सुनावणी घेण्याचे लेखी निवेदन दाखल केले होते. त्यास मंजुरी मिळाली आहे.

### बप्पा निघाले रेल्वेने...



सोलापूर : रेल्वे स्टेशनवरून गणपती बाप्पा जयघोषात निघाल्याचा शुक्रवारी टिपलेला क्षण.



# मिल कामगारांच्या पेन्शन वाढीसाठी वंचित बहुजन आघाडीचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२२ ऑगस्ट -**

सध्याच्या वाढत्या महागाईत ८०० ते १००० रुपयांच्या पेन्शनमध्ये घरखर्च, औषधोपचार, दैनंदिन गरजा भागवणे अशक्य होत असून कामगार उपासमारीच्या काठावर आले आहेत. केंद्र सरकारने यावर तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा कर्मचारी भविष्य निधी संघटन यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. १९९५ साली बंद पडलेल्या लक्ष्मी-विष्णू मिलच्या कामगारांना आजतागायत फक्त ८०० ते १००० रुपयांचीच पेन्शन मिळते. या तुटपुंज्या पेन्शनवाढीसाठी कामगारांनी अनेक वर्षांपासून मोर्चे, आंदोलने, निवेदने दिली, विविध संघटनांनीही सातत्याने पाठिंबा दर्शवला.

तरी केंद्र सरकारने कोणतीही ठोस दखल घेतली नाही. कामगारांनी आयुष्यभर कष्ट करून घाम गाळला, मात्र त्याचे फळ म्हणून केवळ ८०० ते १००० रुपये पेन्शन मिळत आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना दरवेळी पेन्शन वाढ मिळते, तर श्रावणबाळ, निराधार योजना, 'लाडकी बहीण' योजनांतर्गत दरमहा १५०० रुपयांची तरतूद होते; परंतु कामगारांना न्याय मिळाला नाही. यावेळी विजयकुमार उघडे, प्रशांत गोणेवार, रमेश गायकवाड, प्रभाकर तुपारे, श्रीनिवास बंगाळे, मनोज हावळे, विलास शंके, राम घागरे, विनायक लसूल आदी उपस्थित होते.

# संत सेना महाराज पुण्यतिथी समाधी सोहळा भक्तिभावात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

नाभिक समाज होटगी रोड, विजापूर रोड, जुळे सोलापूर, हत्तुरे नगर च्या वतीने लिं.सौ. सिद्धव्वाबाई हत्तुरे सांस्कृतिक भवनात संत सेना महाराजांची पुण्यतिथी समाधी सोहळा कीर्तनाने मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला. संत सेना महाराजांच्या प्रतिमेचे पूजन माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे व नाभिक समाजाचे ज्येष्ठ नेते पांडुरंग चौधरी, मल्लिकार्जुन राऊत, रामलू कोंडुर ज्येष्ठ साहित्यिक चेन्नवीर भद्रेश्वर मठ यांच्या हस्ते करण्यात आले.

'सेवाधर्म हेच खरे कर्म' आपल्या अभंगातून सर्वांना सेवाभावाची शिकवण देणारे संत आहेत असे प्रतिपादन माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे यांनी केले.ह.भ.प. दत्तात्रय रामचंद्र क्षीरसागर महाराज यांनी आपल्या कीर्तनात संत सेना महाराज - विठ्ठलाचे नि:सीम भक्त होते. न्यायनीतीस अनुसरून वागणे, यात जीवाचे रहस्य आहे. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम यातील कर्तव्य पार पाडण्यातही ईश्वरी सेवेचा मोबदला हाती लागतो. अशी त्यांची श्रद्धा होती.

संत नामदेवांप्रमाणे महाराष्ट्राबाहेर येऊन सेनाजींना उत्तर भारतातील हिमाचल प्रवेश, पंजाब, राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि बिहार या राज्यात रामभक्तीचा प्रचार सुरू करून उच्चनीच जातिभाव सोडून समान पातळीवर जगण्याचा संदेश दिला. सेनाजींनी हिंदी, मारवाडी, पंजाबी इत्यादी भाषेत भक्तीवर आधारित काही पदे लिहिली आहेत. त्यातील पंजाबी पदांचा शिखांचे 'गुरुग्रंथ साहिब' या धर्मग्रंथात समावेश केलेला आहे. अशी सेना महाराजांची महती आपल्या रसाळ वाणीतून सांगितले.



पेशवेकालीन देवदेवेश्वर संस्थानच्या

# मृत्युंजयेश्वर मंदिरात महामृत्युंजय मंत्राच्या यज्ञाची आहुतीद्वारे सांगता

**अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २२ ऑगस्ट -**

कोथरूड, पुणे येथील पेशवेकालीन देवदेवेश्वर संस्थानचे मृत्युंजयेश्वर मंदिरात होमहवनाद्वारे चाललेल्या महामृत्युंजय मंत्राच्या यज्ञाची आहुती देऊन सांगता करण्यात आली. हा कार्यक्रम प्रदोषकाळी आहुती देऊन सांगता करण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील व श्री क्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

कालप्रदोष आणि श्रावणमास समाप्ती निमित्ताने देवदेवेश्वर संस्थानच्या वतीने मृत्युंजयेश्वर मंदिरात ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् । उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय मामृतात् ।। महामृत्युंजय मंत्र पठण हवन आणि ।।श्रीहरी: ।। श्रीपुष्पदन्तविरचीत ।। शिवमहीम्न: स्तोत्र पठण करण्यात आले. मंदिरात होमहवन, आहुती व धार्मिक कार्यक्रम हजारो सदभक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी थोरले बाजीराव पेशवे यांचे वंशज व देवदेवेश्वर संस्थानचे विश्वस्त श्रीमंत पुष्करसिंह पेशवे, रमेशजी भागवत, विश्वस्त, देवदेवेश्वर संस्थान, सुधीरजी पंडित, सी.ए. व विश्वस्त, देवदेवेश्वर संस्थान, सचिनजी कुलकर्णी, मुकूल माधव फौंडेशनचे प्रमुख, कार्यक्रम आयोजक संदिपजी खर्डेकर, प्रवक्ते, आणि अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त संतोष भोसले, बाबुराव कुलकर्णी, जयंत सुभेदार, संतोष माने उपस्थित होते.

# विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मार्क्सवादी विचारधारेने समाजपरिवर्तनाचा मार्ग

**डॉ. सुभाष जाधव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

मार्क्सवादी विचारधारा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवाद यांची एकत्रित सांगड घालून समाजपरिवर्तनाचा मार्ग तयार करता येतो, असे प्रतिपादन डॉ. सुभाष जाधव यांनी आपल्या व्याख्यानात केले.

डॉ. जाधव म्हणाले की, वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे निसर्गातील घटनांचे निरीक्षण करून, पुरावे गोळा करून आणि तर्कशुद्ध निष्कर्ष काढणे हा एक पद्धतशीर मार्ग आहे. यात अंधश्रद्धा, अतिभौतिक श्रद्धा किंवा केवळ परंपरेवर आधारित विचारांचा निषेध करून पुराव्यावर आधारित ज्ञानालाच मान्यता दिली जाते. प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि कार्यकारणभाव




समजून घेणे हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा गाभा असल्याचे त्यांनी सांगितले. विवेकवादाबाबत बोलताना ते म्हणाले, विवेकवाद म्हणजे तर्क, कारणमीमांसा आणि पुराव्यावर आधारलेले विचार व कृती. यात मानवी बुद्धीला सर्वोच्च स्थान दिले जाते. श्रद्धेपेक्षा तर्काला महत्त्व देऊन अंधश्रद्धा, जातिभेद, धर्मांधता यांचा उच्छेद हाच विवेकवादाचा उद्देश आहे.

मार्क्सवादी विचारसरणीशी या दोन्ही प्रवाहांची सांगड घालताना डॉ. जाधव यांनी निदर्शनास आणले की, Dialectical Materialism या तत्त्वज्ञानानुसार निसर्ग, समाज आणि विचारसरणी हे सर्व भौतिक वास्तवावर आधारलेले आहेत. म्हणूनच सामाजिक-आर्थिक शोषणाचे विश्लेषण व परिवर्तन वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकवादाशिवाय शक्य नाही. यावेळी त्यांनी भारतातील हमीद दलवाई, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांसारख्या विचारवंतांचे विवेकवादी चळवळीतले योगदान अधोरेखित केले.

उद्या रवि. २४ ऑग. सायं. ७ वा स्मृति मंदिरात

गेल्या जन्मीची शिक्षा या जन्मात भोगणे म्हणजे, बायको शॉपिंग करताना तिच्या मागून फिरणं...

एसपी क्रिएशन निर्मित
नवनीत प्रकाशित



हीच खरी फॅमिलीची गंमत आहे

तिकीट विक्री सुरु आहे

लेखन दिग्दर्शन गीते संतोष पवार
नेपथ्य संदेश बेंद्रे संगीत आशुतोष वाघमारे
प्रकाश योजना निखिल सातोपे वेशभूषा हास्या पवार

कलाकार : हर्षदा कर्वे, प्रतिक पाध्ये, विनिषा कुलकर्णी, राकेश शालिनी आणि शलाका पवार आणि संतोष पवार आणि सागर कारंडे

ति.वि. bookmyshow प्रयोग व फोन बुकिंग संपर्क : शिवाजी उपरे 9623004299

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ४ सप्टेंबरला गायन स्पर्धा

**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

डॉ. निर्मलकुमार फडकुले प्रतिष्ठानतर्फे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिनानिमित्त सुगम गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष दत्ता गायकवाड व प्रशांत देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



सोलापूर जिल्ह्यातील नवोदित गायक, गायिकांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. हिंदी, मराठी भाषेतील भावगीत, भक्तीगीत, गझल, अभंग यावर आधारित ही स्पर्धा राहणार आहे. ही स्पर्धा डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात गुरुवार ४ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता आयोजित केलेली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कलावंतानी प्रवेशिका डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर कार्यालयात आणून द्यावेत. वाढदिवसानिमित्त ग्रंथ प्रदर्शन फडकुले सभागृह येथे ४ ते ७ सप्टेंबरपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता होईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या पत्रकार परिषदेस प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष बाबुराव मैंदर्गीकर, सचिव बिपीनभाई पटेल आदी उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...

### मुरूम चोरणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

मुरूम चोरून दहा चाकी टिपरमधून वाहतूक करीत असताना महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी दोघांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. याबाबत मंडल अधिकारी रत्नाकर अर्जुन कांबळे (वय ४0, राहणार शिवरत्न नगर , जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अजय ओराव (वय २२, राहणार कुमठे, तालुका उत्तर सोलापूर) आणि निखिल गुप्ता या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ ऑगस्ट रोजी दुपारी कुमठे गाव ते मंजरेवाडी या रस्त्यावर एम एच ५0 एन ८८ ८६ या दहा चाकी टिप्पर मधून अजय ओराव हा निखिल गुप्ता याच्याशी संगणमत करून चार ब्रास मुरूम चोरून कुमठे गाव ते मंजरेवाडी या रस्त्याने घेऊन जात असताना मंडल अधिकारी कांबळे यांनी अजय पकडले अजय ओराव यांच्याकडे मुरमाच्या रॉयल्टी बाबत तसेच गाडीच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता ओरावयाने कागदपत्रे दिली नाहीत. पोलीस हवालदार बहिर्जी पुढील तपास करीत आहेत

### पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांवर गुन्हा

**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

पैशासाठी विवाहितेचा छळ करून तिला माहेरी हाकलून देणाऱ्या पतीसह तिघांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत उजमा शादाब बागवान (राहणार सिद्धेश्वर नगर भाग चार कुम ठा नाका सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरून पती शादाब सासू रुकसाना दीर शोएब (सर्व राहणार सय्यद नगर हडपसर, पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक सप्टेंबर २०२0 ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत उजमा या पती शादाब याच्यासोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती शादाब व त्याच्या घरातील इतरांनी उजमा हिच्या वडिलांनी लग्नात दीड तोळे सोने न घातल्याचा तसेच दीर शोएब यास पाच लाख रुपये न दिल्याच्या राग मनात धरून सतत वेळोवेळी उजमा हिस शिवीगाळ व दमदाटी केली तसेच तिचा शारीरिक व मानसिक त्रास छळ केला. पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे करीत आहेत

### मोलकरणीने केले दीड लाखाचे मंगळसूत्र लंपास

**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

सात वर्षापासून घरात काम करीत होती. विश्वासू असल्याने ती चोरी करणार नाही,असे वाटले, मात्र घरात काम करणाऱ्या महिलेने घरातून दिड लाख रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले आहे. याप्रकरणी अर्चना देवकुळे (रा सोलापूर) या महिलेवर जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सोनल चंद्रकांत दायमा (वय ४६ , रा. श्रीकृष्णाश्रय हिरा मेडीकल जवळ,सम्राट चौक सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुरुवारी जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दोन महिन्यापूर्वी घडली आहे. संशयित आरोपी महिला या दायमा यांच्या घरी कामास आहेत. तरी त्या महिलेने राहत्या घरामधील बेडरुमधील ड्रॉवरवर दिड तोळे हिराचे पेन्डाल असलेले सोन्याचे मंगळसूत्र एकुण दिड किंमतीचे असून ते लंपास केले. त्यानंतर तीचे दैनंदिन काम सुरु होते. त्या महिलेस पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले, तिच्याकडे कसून चौकशी केली असता तीने चोरी केल्याची कबुली दिली, मात्र ते मंगळसूत्र कुठे हरवले असल्याचे सांगितले,त्या महिलेस शुक्रवारी तीस न्यायलयात हजर केले जाणार आहे, हे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. त्या महिलेवर गुन्हा नोंद केला आहे.

### सैनिकी मुलींच्या वसतिगृहात अधिक्षक पदाची भरती

**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलींचे वसतिगृह सोलापूर येथे अशासकीय सहायक वसतिगृह अधिक्षकाचे १ पद भरावयाचे आहे. मानधन रू. २४ हजार ८७५ प्रतिमहा असेल. उमेदवार हा युध्द विधवा किंवा माजी सैनिकाच विधवा पत्नी असावी. उमेदवारास मराठी व इंग्रजी टंकलेखन व संगणक हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.तरी सोलापूर जिल्ह्यातील युध्द विधवा व माजी सैनिक विधवा पत्नींनी आपले अर्ज सैनिक सेवेची इतर शैक्षणिक कागदपत्रे दि. ३ सप्टेंबर २०२५ पूर्वी या कार्यालयात जमा करावीत. त्यानुसार ३ सप्टेंबर रोजी मुलाखती घेण्यात येतील. तसेच उमेदवारांनी मुलाखतीस येताना स्वत:ची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत.

# बळीराजाने केली सर्जा-राजाची पूजा; ‘भरविला’ पंचपक्वानांचा घास!

- सोलापूरसह मराठवाड्यात पोळा सण उत्साहात
- बैलांबरोबर इतर जनावरांनाही मिळतो सणाचा मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

वर्षभर ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता बळीराजाबरोबर खांद्याला खांदा लावून शेती करणाऱ्या सर्जा-राजाचा आज (दि. २२) पोळा सण. या दिवशी बळीराजाच्या मालकीनेने त्यांची पूजा करून पाची पक्वान्नाने बैलजोडीसह घरातील इतर जनावरांना भरविले. दरम्यान, हा पोळा सण उत्तर, दक्षिण सोलापूरसह मराठवाड्यात अगदी उत्साहात साजरा करण्यात आला.

या सणाच्या पूर्वसंध्येलाच बैलांना स्वच्छ धुवून खांदेमळणी करण्यात आली. आज दिवसभर या बैलांच्या खांद्यावर शिवळही दिले नाही. वर्षभर शेतात राबून त्यांच्या खांद्याला घट्टे पडलेले असतात म्हणून पोळ्याच्या पूर्वसंध्येला खांदेमळणी केली जाते. पोळ्यादिवशी या बैलांच्या शिंगांना बेगड लावली जातात आणि त्यांच्या अंगावरही विविध रंगाने रंगविले जाते. इतकेच नाहीतर दुपारी त्यांची पूजा करून मिरवणूकही



काढली जाते. काही ठिकाणी हलगी, बँड वाजवून त्यांना मिरविले जाते तर काही भागात चक्क डॉल्बी लावून मिरविले जाते. शेतीमध्ये बैल हे शेतकऱ्याचे मुख्य साथीदार असतात. नांगरणी, पेरणी, वाहतूक यासाठी बैलांचा उपयोग होतो. त्यांचे परिश्रम मान्य करून, त्यांना मान देण्यासाठी पोळा साजरा केला जातो.

### प्रेम अन् जिव्हाळा व्यक्त करण्याचा दिवस

बैल पोळा हा सण शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या दिवशी श्रावण महिना समाप्त होतो. वर्षभर शेतामध्ये काम करणाऱ्या बैलांप्रती प्रेम आणि जिव्हाळा व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. हा सण भारतामध्ये विविध भागामध्ये शेतकरी मोठ्या उत्साहात साजरा करतात. हा सण प्रामुख्याने महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, विदर्भ, तेलंगणा आणि काही दक्षिणेकडील भागात साजरा होतो.

### बैलांप्रती कृतज्ञतेचा सण

जसे आपण दिवाळीला घर–देवता, होळीला अग्नी, तसा पोळा हा बैलांसाठी असतो. शेतकरी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा करतो. या दिवशी बैलांना स्नान घालतात, त्यांना तेल लावतात, शिंगांना रंगवतात, झगमगते हार–फुले, गळ्यात माळ घालतात. पाठीवर झुली घालून त्यांना गोड खाऊ घालतात. इतकेच नाहीतर बैलांची पूजा करून शेतकरी समृद्ध पिकं, चांगले आरोग्य, कष्टाची योग्य फळे मिळावीत यासाठी प्रार्थना करतो.

### बैलांसाठी विश्रांतीचा दिवस

या दिवशी बैलांना स्वच्छ धुवून बैलांच्या कपाळी कुंकवाचा टिळा लावून, हार–फुले, माळा घालतात. त्यांना अगरबत्ती लावून ओवाळणी करून गोड पदार्थ खाऊ घालतात. या दिवशी बैलांना शेतात कामाला जुंपत नाहीत. वर्षभर राबणाऱ्या बैलांना या दिवशी आराम देण्यात येतो. त्यांना सजवून त्यांची पूजा केली जाते. तसेच खास पारंपरिक मेजवानीचा बेत आखला जातो.

## प्राचार्य अंबादास पांढरे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार

### जिल्ह्यातील पहिला स्व.सुखदेव साखरे पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

शिक्षण क्षेत्रातील उपक्रम शीलतेचा व समाजाभिमुख कार्याचा गौरव करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या ‘स्व. सुखदेव साखरे आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराचा’ पहिला मान जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अंबादास पांढरे यांना मिळाला आहे. श्री राजेश्वर विद्यालय, राजुरी (ता. करमाळा) चे पहिले मुख्याध्यापक असलेले स्व. सुखदेव साखरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा पुरस्कार दरवर्षी दिला जाणार आहे.



हा पुरस्कार शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता, स्व. साखरे सरांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व रु. ११ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारासाठी कोणतेही अर्ज मागविले गेले नाहीत तर स्व. साखरे सरांचे माजी विद्यार्थी प्रा. डॉ. संजय चौधरी, कृषी अधिकारी देविदास सारंगकर, विक्रीकर अधिकारी तुकाराम जाधव, उद्योजक प्रवीण साखरे, स्टडी सर्कलचे संचालक सतीश मोरे, धनंजय साखरे आदींच्या समितीने जिल्ह्यात कार्यरत असलेल्या मुख्याध्यापकांमधून शोध घेऊन प्राचार्य पांढरे यांची निवड केली आहे.

**प्राचार्य पांढरे यांचे कार्य**

२८ वर्षांच्या सेवेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रमशील कार्य. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत. गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून त्यांचे पुनर्वसन. क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर खेळाडू घडवण्यात मोलाचा वाटा सामाजिक उपक्रमांत सातत्याने आघाडी व प्रेरणादायी कार्य.

## सराईत गुन्हेगार भिम गुरव दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट -**

मुरारजी पेठेतील सराईत गुन्हेगार भिम गुरव यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.



भिम उर्फ आकाश विलास गुरव (वय ३५, घर नं. ११४, अभिमानश्री नगर, मुरारजी पेठ, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. भिम गुरव याच्याविरुध्द सन २०१३,२०१५,२०१८२०२१ आणि २०२५ या कालावधीमध्ये मारहाण करून दहशत निर्माण करणे, व्यापाऱ्यांना मारहाण करणे, दमदाटी करून पैशांची मागणी करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे गुरव यास त्याच्या गुन्हेगारी कारवायांबद्दल सोलापूरातून तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव फौजदार चावडी पोलिसांकडून पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत भिम गुरव यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. त्यानुसार गुरव यास तडीपार केल्यानंतर लातूर येथे सोडण्यात आले आहे.

## आंतरराज्य गुन्हेगारास अटक; घरफोडीचे दोन गुन्हे उघड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने आंतरराज्य सराईत गुन्हेगारास अटक करून त्याच्याकडून घरपोडीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. अजय सुरेश कुंची कोरवी (वय २५, राहणार राणी पेठ, जिल्हा विजयनगर कर्नाटक) असे गुन्हेगाराचे नाव आहे. याशिवाय पोलिसांनी अजय याचा अल्पवयीन साथीदार याच देखील ताब्यात घेतले आहे. विजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांना घटनास्थळावरून मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजवरून पोलिसांनी सोलापूर रेल्वे स्टेशन येथे सापळा लावून कर्नाटकातील सराईत गुन्हेगार अजय कुंची कोरवी यास ताब्यात घेतले.

यावेळी पोलिसांनी अजय सोबत असलेल्या त्याच्या अल्पवयीन साथीदारास देखील ताब्यात घेतले या दोघांकडून विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आले असून २७ हजार ६८0 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक दादा गायकवाड सुशांत वराळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड, पोलीस हवालदार सचिन हार, गणेश शिर्के, लक्ष्मीकांत फुटाणे, शंकर भिसे, अजय परदेशी, समाधान मारकड, राहुल विटकर, अमृत सुरवसे, संतोष माने, सद्दाम आबादी, राजे संतोष चाणकोटी यांनी केली.

## भाजपा सहकार कार्यकारीणीची निवड २५ ऑगस्टला होणार

### भाजपा सहकार प्रकोष्ठाचे प्रदेश संयोजक अरूण कापसे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

संयोजक, सहसंयोजक, सहकार विभाग मीडिया जिल्हा संयोजक तसेच सर्व अकरा तालुक्यांतील तालुका संयोजक, सहसंयोजक आणि कार्यकारिणी सदस्यांची निवड केली जाणार आहे. यामध्ये बार्शी शहर व ग्रामीण, सोलापूर शहर व ग्रामीण तसेच मोहोळ शहर व ग्रामीण या भागांसह इतर तालुक्यांतील पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा समावेश आहे.

या मुलाखती २५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता येथील शासकीय विश्रामगृह येथे होणार असून इच्छुकांनी आपला आजवर केलेल्या कामाचा अहवाल आणि सहकार क्षेत्रातील योगदानाची माहिती सोबत आणावी, असे आवाहन भारतीय जनता पार्टी सहकार प्रकोष्ठाचे प्रदेश संयोजक अरुणभाऊ कापसे यांनी केले आहे. सहकार क्षेत्रातील आजी-माजी ज्येष्ठ कार्यकर्त्यांनीही या मुलाखतींना उपस्थित राहावे, असेही ते म्हणाले. या मुलाखतींचा उद्देश




पक्षाच्या सहकार प्रकोष्ठाला नवचैतन्य देणे, जबाबदार कार्यकर्त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देणे आणि भारतीय जनता पार्टीची ताकद प्रत्येक शहर, ग्रामीण भाग आणि तालुका स्तरावर मजबूत करणे हा आहे. सहकार क्षेत्रात आपल्या कामातून जिल्हाभर ठसा उमटवलेले अरुणभाऊ कापसे यांच्या नेतृत्वाखाली व भाजप विधान परिषद गटनेते व सहकार प्रकोष्ठ संयोजक प्रवीण दरेकर यांच्या मार्गदर्शना खाली नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे संघटनाला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास श्री. कापसे यांनी व्यक्त केला आहे.



## मराठा समाजाचा रविवारी वधू-वर परिचय मेळावा

**सेवा संघाचा उपक्रम : यंदाचा ३१ वा मेळावा**

**सोलापूर :** मराठा सेवा संघ संचलित मराठा वधू-वर परिचय व सामुदायिक विवाह कक्षाच्या वतीने रविवार, दि. २४ ऑगस्ट रोजी मराठा वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ. जी.के देशमुख यांनी दिली.

मराठा सेवा संघाच्या वधू वर परिचय मेळाव्याचे यंदाचे ३१ व वर्ष आहे. प्रति वर्षाप्रमाणे यंदा वधू -वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे. रविवार, दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता आदित्य नगर येथील आदित्य सांस्कृतिक भवनमध्ये वधू वर परिचय मेळावा पार पडणार आहे. मनुष्य जीवनातील विवाह संस्थेला अन्यसाधारण महत्व आहे. समाज प्रबोधनातून सहभागातून ती भक्कम करण्यासाठी व विवाह संस्था बळकट व्हावी यासाठी मराठा सेवा संघाच्यावतीने प्रतिवर्षी वधू -वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले जाते. यंदाच्या वधू-वर मेळाव्याची नोंदणी देखील चालू झाली आहे. नोंदणीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. शहराच्या विविध भागात ग्रामीण भागांमध्ये वधू- वर कक्षाच्या वतीने विविध बैठका घेऊन मेळाव्याची माहिती समाज बांधवा पर्यंत पोहचवली जात आहे. नियोजनाच्या बैठका देखील पार पडल्या आहेत. तरी इच्छुक वधू वराच्या पालकांनी वधू-वर परिचय मेळाव्यामध्ये सहभागी होऊन मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकाच्या वतीने केले आहे.

# राज्य कर सेवेतील लाखभर पगार घेणारे दोन अधिकारी लाचलुचपतच्या जाळ्यात

▶▶ दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

शहरातील वस्तू व सेवा कार्यालयातील दोन अधिकाऱ्यांना पाच हजार रुपयांची किरकोळ लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. या दोघांनाही विशेष न्यायालयाचे न्यायाधीश कटारिया यांनी दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

राज्य कर अधिकारी महेश जरीचंद चौधरी, (वय ४१ वर्षे, रा. हरिश्चंद्र नगर, धाराशिव, पद राज्य कर अधिकारी), नेमणूक वस्तु व सेवा कर कार्यालय सोलापूर व आमसिध्द इराण्णा बगले (रा. रेणुका नगर,जुळे सोलापूर, पद-राज्य कर निरीक्षक) नेमणूक वस्तु व सेवा कर कार्यालय अशी अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे सोलापूर मधील एका तक्रारदाराने अँटी करप्शन सोलापूर युनिट यांच्याकडे तक्रार केली




होती. प्राप्त तक्रारीनुसार सापळा लावण्यात आला होता. तक्रारदार यांच्या मालकीचे कंन्स्ट्रक्शन अँन्ड सर्विंग फर्म आहे. तक्रारदार याने फर्मच्या नावे वस्तु व सेवाकर कार्यालय येथे नवीन जीएसटी क्रमांक मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला होता. वस्तू व सेवा कर कार्यालयातील राज्य कर अधिकारी महेश जरीचंद चौधरी, राज्य कर निरीक्षक आमसिध्द इराण्णा बगले यांनी तक्रारदार यांना नवीन जी.एस.टी क्रमांकास मंजूरी देणेकरीता तक्रारदार यांच्याकडे ५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती या तक्रारीची पडताळणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आली होती. २१ ऑगस्ट रोजी सापळा लावण्यात आला. जीएसटी इन्स्पेक्टर आमसिद्ध बगले यांनी पाच हजार रुपये स्वीकारून ती लाच रक्कम जीएसटी अधिकारी महेश जरीचंद चौधरी यांच्या टेबलावरील फाईलखाली ठेवली. त्याचवेळी एसीबी अधिकाऱ्यांनी धाड टाकून जीएसटी कार्यालयातील दोन्ही अधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. घटनास्थळी पंचनामा करून विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुरुवारी रात्री उशिरा गुन्हा नोंद केला. ही कारवाई एसीबीचे उपअधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शैलेश पवार, गणेश पिंगू वाले पोलीस हवालदार अतुल घाडगे, सलीम मुल्ला, स्वामीराव जाधव, राहुल गायकवाड यांनी केली

## कचरा संकलनचा ठेका घेणाऱ्या चालकासह चौघांवर गुन्हा

### कंत्राटी चालकास विजेचा शॉक लागून मृत्यू प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

पालिकेची घंटागाडी धुताना कंत्राटी वाहन चालकास विजेचा शॉक लागला मृत्यू झाला. याप्रकरणी कचरा संकलनाचा ठेका घेणाऱ्या चालकासह चौघांवर पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना जुळे सोलापुरातील पालिकेच्या एचएसआर पाण्याची टाकीजवळ कचरा संकलन करणाऱ्या ठिकाणी घडली. गुरुसिध्दय्या सोमशेखर हिरेमठ (वय ४५, स्वागत नगर, ताई चौक, सोलापूर) असे विजेचा धक्का लागून मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

गुरुवारी सकाळी नातेवाइकांनी मदत मिळाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भुमिका घेतली. नातेवाईका समवेत घंटागाडी चालक व माजी नगरसेवक बाबा मिस्त्री यांनी ठिय्या मांडला होता. पोलिसांनी मध्यस्थी केली व मृताचा भाऊ गंगाधर हिरेमठ (वय ४२ रा. नरसिंह विडी घरकुल) नातेवाइकांनी दिलेल्या फिर्यादीवरून जास्तीची मदत न देणाऱ्या ठेकेदार एन.एच. पटेल, अश्विनी कुमार मानवी, काशीनाथ राठोड, अजयकुमार घोडके यांच्यावर विजापूर नाका पोलिसांत गुरुवारी गुन्हा नोंद झाला आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या एचएसआर पाण्याची टाकी जुळे सोलापूर या ठिकाणी नाशिकच्या वॉटरग्रेस प्रोडक्स कन्नावार कंपनीला कचरा संकलन करण्याचा ठेका दिला आहे.

त्या कंपनीने उपलब्ध करून दिलेल्या रॅम्पवर असलेल्या पाण्याच्या प्रेशर गनद्वारे गुरुसिध्दय्या हिरेमठ हा कंपनीची घंटागाडी धुवत होता. घंटागाडी धुवत असताना त्याला अचानक इलेक्ट्रिक लाईचा करंट लागून त्याचा मृत्यू झाला. तरी नाशिकच्या कंपनीने व सोलापुरात ठेका चालवणाऱ्या व्यक्तीने कामाच्या ठिकाणी इलेक्ट्रिक शॉकद्वारे अपघात होवू नये, सुरक्षेचे साहित्य पुरवणे आवश्यक आहे. तरी देखील कंत्राटी कामगारांच्या सुरक्षेची कोणत्याही प्रकारची योजन केली नाही, वाहन धुण्याच्या ठिकाणी लाईट कनेक्शन मुळे करंट लागून कोणत्याही प्रकारची जिवित हानी होऊ नये म्हणून उपाययोजना न करता व विद्युतरोध साहित्य पुरवलेले नाही तरी नाशिकच्या वॉटरग्रेस प्रोडक्टसचा मालक या कर्मचाऱ्याच्या मृत्यूस कारणीभूत आहे. त्यामुळे मालक, ठेकेदारासह चौघांवर गुन्हा दाखल केला आहे या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक पवार करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सगुण निर्गुण परमात्मा एकच आहे : हभप. डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २२ ऑगस्ट**

या विश्व निर्मितीचे रहस्य उलगडताना भागवतात असे सांगितले आहे की, संपूर्ण सृष्टीची निर्मिती ईश्वराने आपल्या मायेच्या साहाय्याने केली आहे. मात्र, ही माया स्वतंत्र सामर्थ्य नसून ती ईश्वराच्या पूर्ण अधीन आहे. ईश्वर हीच मूळ शक्ती असून तोच मायेचा अधिपती आहे. म्हणूनच माया ईश्वराला बांधून ठेवू शकत नाही, उलट ईश्वर इच्छेनुसार मायेच्या साहाय्याने अनंत विश्वाची रचना करतो.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २८

सगुण आणि निर्गुण या संकल्पनांचा विचार केला असता, सगुण रुपात ईश्वर भक्तांच्या भक्तीला प्रतिसाद देतो, तर निर्गुण रुपात तो अव्यक्त, निराकार, परमार्थ तत्त्व आहे. या दोन्ही रुपांमध्ये काही भेद नाही. सगुण आणि निर्गुण हे दोन भिन्न देव नसून एकाच परमात्म्याची दोन भिन्न अनुभूती आहेत. श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर श्रीभगवंत मंदिरातील निरुपणात हा गूढार्थ स्पष्ट केला.

भागवत ग्रंथामध्ये विदुर आणि मैत्रेय ऋषी यांच्यातील संवाद अत्यंत महत्त्वाचा आहे. विदुराने केलेल्या तात्त्विक प्रश्नांना मैत्रेय ऋषी उत्तरे देताना विश्वाच्या निर्मितीपासून ते आत्मसाक्षात्कारापर्यंतची सखोल तत्त्वचर्चा करतात. यामध्ये सगुण असलेला परमात्माच निर्गुण कसा आहे, हे उलगडण्यासाठी रासक्रीडेचे वर्णन येते. रासक्रीडेतील प्रत्येक गोपीसोबत एक कृष्ण असल्याचे चित्रण केवळ लीला नाही तर एक गहन तात्त्विक सत्य आहे. परमात्मा सर्वांच्या अंतःकरणात एकाच वेळी असतो; प्रत्येक भक्ताला तो स्वतःसाठीच आहे असे वाटते. पण जेव्हा अहंकार उदयाला येतो, तेव्हा त्या दिव्य अनुभूतीपासून जीव दूर होतो.

डॉ. जयवंत महाराज सांगतात की, खरे संकट बाहेरुन येत नाही, ते आपल्या अंतरंगातील विकारांमुळेच निर्माण होते. लोभ, क्रोध, मत्सर, अहंकार हे विकार म्हणजेच बंधनाची कारणे आहेत. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात, काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः। हाच शत्रू जीवाला बंधनात अडकवतो. म्हणून या विकारांचे निर्मूलन म्हणजेच खरी साधना होय.

विकारांचा क्षय झाला की, अंतःकरण शुद्ध होते आणि शुद्ध अंतःकरणातच परमात्म्याचे दर्शन होते. यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः। अथ मर्त्योऽमृतो भवति। म्हणजेच, अंतःकरणातील सर्व कामना नाहीशा झाल्या की, माणूस मोक्षाचा अधिकारी होतो.

त्यामुळे, सृष्टीरचनेचे गूढ समजून घेताना भक्ताने हे लक्षात ठेवले पाहिजे की, मुक्तीचा मार्ग बाह्य जगात नसून अंतःकरणातील विकार निवृत्तीमध्ये आहे. सगुण-निर्गुण परमात्म्याचे चिंतन, भक्तिभावाने केलेले नामस्मरण आणि ईश्वरावरील अखंड विश्वास हेच जीवनाला परमार्थाच्या शिखरावर घेऊन जातात, असे मार्गदर्शन डॉ. जयवंत महाराजांनी आज सत्राच्या शेवटी केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २३ ऑगस्ट २०२५ | भारतीय भाद्रपद मासारंभ |
| विक्रम संवत् २०८२ | अमावास्या |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| अमावास्या भाद्रपदा (११.३५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मघा (२४.५४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (१३.१८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - किस्तुघ्न (२३.३७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# लाल झेंडे आणि लाल सलामीच्या गगनभेदी घोषणांनी रे नगर दणाणले

## माकपचे राज्यस्तरीय अभ्यास शिबिर उत्साही वातावरणात सुरु




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

अखंड लढा व श्रमिकांच्या त्यागातून उभी राहिलेली ३० हजार असंघटीत कामगारांची वसाहत रे नगर आज जगात पथदर्शी ठरत आहे. या क्रांतिकारी नगरीत महाराष्ट्राला नवी दिशा देण्यासाठी सज्ज झालेल्या लढाऊ कार्यकर्त्यांची वैचारिक जडणघडण घडविण्यासाठी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)चे महाराष्ट्र राज्यस्तरीय तीन दिवसीय अभ्यास शिबिर उत्साही वातावरणात सुरू झाले.

शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी लाल झेंडा फडकावून शहिदांना अभिवादन करण्यात आले. प्रजा नाट्य मंडळाच्या कलावंतांनी क्रांतिकारी गीते सादर केली. ''लाल झेंडे को लाल सलाम!, शहिदोंके अरमानोंको मंझिल तक पहुंचाएंगे!, साम्राज्यवाद मुर्दाबाद!, सांप्रदायिकता हो बरबाद!, दुनिया के मजदूर एक हो!'' अशा जोरदार घोषणांनी यावेळी रे नगर परिसर दणाणून गेला.

सोलापूर जिल्ह्यातील नकोच्या कार्यकर्त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पक्ष व जनसंघटना मजबूत ठेवण्याचे अभूतपूर्व कार्य केले असल्याचे गौरवोद्गार माकप पॉलिट ब्युरो सदस्य कॉ. डॉ. अशोक ढवळे यांनी प्रतिनिधी आणि उपस्थितांसमोर बोलताना यावेळी काढले. आणि ''जनक्रांतीसाठी जनतेचा सहभाग अनिवार्य आहे. त्यांच्या राजकीय प्रबोधनाचे तंत्र हे अभ्यास शिबिर आत्मसात करेल,''असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मंचावर केंद्रीय समिती सदस्य कॉ. बादल सरोज, राज्य सचिव डॉ. अजित नवले, राज्य सचिवमंडळ सदस्य विजय गाभणे, ॲड. एम. एच. शेख, सुनील मालुसरे, शैलेंद्र कांबळे, किरण गहला, जिल्हा सचिव युसूफ मेजर आदी उपस्थित होते.

उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान राज्य सचिवमंडळ सदस्य शुभा शमीम यांनी भूषविले. राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी प्रास्ताविक केले, तर ॲड. एम. एच. शेख यांनी प्रतिनिधींचे स्वागत करून, दिवंगतांना आदरांजलीचा शोकप्रस्ताव मांडला. सोलापूर जिल्हा समितीच्या वतीने डॉ. अशोक ढवळे व कॉ. बादल सरोज यांचा सोलापुरी श्रमिकांच्या श्रमाचे प्रतीक असलेली चादर देऊन सत्कार करण्यात आला.

# दान देण्यासाठी धैर्य लागते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

धनाचा सदुपयोग करा. धन संग्रह वृत्ती बाळगू नका.दानधर्मासाठी धनाचा वापर करा. येताना काही आणले नाही आणि जाताना काही न्यायचे नाही एवढे लक्षात असू द्याङ्ग असे प्रतिपादन स्वाध्यायी तृप्ती रांका (बेंगलोर) यांनी केले. बलिदान चौक येथील जैन स्थानकात पर्युषण महापर्वानिमित्त आयोजित प्रवचनात त्या बोलत होत्या. यावेळी सोनल चंगेडिया (सोनई)व अक्षता कोठारी (मिरजगाव)हे उपस्थित होते. यावेळीबोलतानात्याम्हणाल्या,लोभ ही अतिशय वाईट गोष्ट आहे.तुम्ही कोणत्याही प्रकारे मार्गे पैसा जमवता याला महत्व आहे.तुमच्या अंगी जर धनसंग्रह वृत्ती बाळगली तर कितीही धन तुम्ही संग्रह केला तरी लोभ तुम्हाला शांत बसू देत नाही. लोभामुळे आत्म्याचा विनाश होतो. धनसंग्रह वृत्तीमुळे माणूस नियम व नैतिकता विसरून जातो व वाटेल त्या मार्गाने पैसा कमवतो.परिग्रह अथवा संग्रहाच्या वृत्तीने साठवलेले धन तुमच्याही काही कामाचे नाही आणि लोकांच्याही काही कामी येत नाही. मुळात आपल्या गरजा या मर्यादित ठेवा. गरजा कधीच संपत नसतात. आपल्या गरजा संपल्यानंतर जे उरले आहे त्याचे तरी दान करा. धन जमविण्यापेक्षा धन सोडा.धन सुटत नाही परंतु धन सोडण्यासाठी धैर्य लागते. धनाचा वापर दानासाठी करा. दान देताना भावना शुद्ध हवी. दान देताना मनात शंका नको. दान देताना कुठेही आपल्या नावाची पाटी असावी असा आग्रह करून नका.दानात नामाचा लालच नको. त्यामुळे कर्मबंध बांधले जातात. एखादा पंखा जरी भेट दिला तरी त्या पंख्यावर भेट देणाऱ्याचे नाव टाकून भेट दिले जाते. पंखा जेवढा फिरतो तेवढेच सत्कर्म बांधले जातात.धार्मिक कार्यासाठी दान द्या. दानामध्ये गुप्त दानाला महत्त्व आहे. दान म्हणजे देणे. दान देण्याला परिस्थितीची नव्हे तर मनाची



पर्युषण महापर्व विशेष

आवश्यकता असते.मन जर लहान असेल तर गडगंज संपत्तीही अपुरी वाटू लागते. तृष्णा शमत नाही. दान देताना अहंकार बाजूला ठेवला पाहिजे. दान देताना आपली भावना निरपेक्ष असली पाहिजे.मोबदल्याची अपेक्षा ठेवून दिलेले दान खरोखरं दानच नव्हे तो तर व्यापार झाला. दान म्हणून काहीतरी द्यायचे आणि त्याची परतफेड म्हणून आपल्याला मानसन्मान मिळावा,पद मिळावे, निदान आपले नाव चमकावे ही अभिलाषा बाळगणे चुकीचे आहे.दान देण्यासाठी धैर्य लागते. आत्मविश्वास लागतो.



# श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये प्रकाश प्रवहन कार्यक्रम साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर, सोलापूर येथे प्रकाश प्रवहन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे,मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे,ज्येष्ठ शिक्षक बसवराज कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.मनसा फाउंडेशन,बेंगलोरचे स्वयंसेवक निखिल गांधी यांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी निखिल गांधी यांनी प्रकाश प्रवहन करण्याची पद्धत सांगितली,सराव घेतला. प्रकाश प्रवाह केल्याने स्मरणशक्ती वाढते,ग्रहण शक्ती वाढते,एकाग्रता वाढते, अभ्यासात लक्ष लागते,कलेमध्ये आवड निर्माण होते असे फायदे सांगत याचा सराव दररोज करावा असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले व सर्व उपस्थितांचे आभार अनिता हौदे यांनी मानले.

# समाजाला दृष्टिकोन देण्याचे काम छायाचित्रकार आणि कॅमेरामन करतात : प्रथमेश कोठे

## रोप फाउंडेशनच्या वतीने छायाचित्रकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

जागतिक छायाचित्र दिनाचे औचित्य साधून रोप फाउंडेशनच्या वतीने दैनिकात काम करणाऱ्या छायाचित्रकार आणि कॅमेरामन यांचा सत्कार शुक्रवारी करण्यात आला.

माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्या हस्ते छायाचित्रकार आणि कॅमेरामन यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव, रोप फाउंडेशनचे प्रशांत बाबर, फोटो अँड व्हिडीओ जर्नलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संदीप वाडेकर, प्रा. अश्विनकुमार नागणे, संपन्न दिवाकर, मुसा अत्तार मिलिंद गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



दैनिक आणि चॅनेल मध्ये काम करताना पत्रकार जितका महत्वाचा भाग आहे तितकेच छायाचित्रकार आणि कॅमेरामन देखील महत्वाचे आहेत, एखादी बातमी करताना फोटो किंवा व्हिडिओ महत्वाचा भाग असतो, सध्या डिजिटल युग आहे, समाजाला दृष्टिकोन देण्याचे काम हा छायाचित्रकार आणि कॅमेरामन करत असतो असे मत प्रथमेश कोठे यांनी केले. यावेळी दैनिकात काम करणारे छायाचित्रकार आणि विविध वृत्तवाहिन्यामध्ये काम करणारे कॅमेरामन उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनकुमार नागणे यांनी केले. ईरन्ना जुजगार यांनी आभार मानले.




# श्रीगणेशोत्सव मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन शुक्रवार दि.२२ रोजी मीठ गल्ली येथील शिवानुभव मंगल कार्यालय येथे माजी नगरसेवक तथा भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते झाले.

प्रारंभी गणेश प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करुन सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाच्यावतीने प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, भाऊ रोडगे, कसबा गणपती अध्यक्ष बाळासाहेब मुस्तारे, सिध्देश्वर यात्रेचे मानकरी सागर हिरेहब्बु, आजोबा गणपती ट्रस्टी उपाध्यक्ष शिवानंद मेंडके, आजोबा गणपतीचे ट्रस्टी खजिनदार चंद्रकांत कळमणकर, केदार वनारोटे, प्रफुल्ल झाडबुके यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला.

याप्रसंगी उत्सव अध्यक्ष सोमनाथ मेंडके, ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे, सुनिल रसाळे, दास शेळके, संजय शिंदे, माजी उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर, विजय पुकाळे, कैलास मेंगाणे, नंदकुमार उपाध्ये, अशोक कलशेट्टी, विष्णु मुधोळकर, लता फुटाणे, गणेश चिंचोळी, हेमा चिंचोळकर यांच्यासह उत्सव पदाधिकारी व गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मजरेवाडी येथे अनधिकृत बांधकाम होत असल्याचा आरोप

## महापालिका प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

मौजे मजरेवाडी येथील जूना सर्वे नं. २२१ नवीन सर्वे नं. १९ /अ/ इ प्लॉट नं.-यु.एल.२, मोती महल डी विंग या अपार्टमेंटच्या कंपाउंड भिंतीपासून दहा फुटावर बिल्डरकडून अनधिकृत बांधकाम सुरू आहे असा आरोप करत यासंदर्भात महापालिकेने लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी यासीन जहागीरदार यांनी पत्रकार परिषदेत केली.

आम्ही राहत असलेली जागा करिश्मा डेव्हलपर्सकडून विकत घेतलेली आहे. आमच्या अपार्टमेंटपुढे आमचे बिल्डर हे अपार्टमेंटच्या कंपाऊंड भिंतीपासून सरासरी अंदाजे १० फुटावर अनधिकृतपणे बांधकाम करीत आहेत. या बांधकामामुळे आमचे अपार्टमेंट मधील पार्किंगसाठी राखीव असलेली जागा नाहीशी झाली व त्यामुळे आमच्या जागेकडे येणारे नैसर्गिकरित्या मिळणारे हवा व प्रकाश मिळणे बंद झालेले आहे. यांच्या अपार्टमेंट मधून बाहेर पडण्यास जो रोड होता तो देखील अरुंद झालेला आहे. हे बांधकाम ज्यावेळी सुरू झाले. त्यावेळी आम्ही बिल्डरकडे याबाबत हरकत घेतली, परंतु त्याने दंडेलशाहीने बांधकाम तसेच सुरू ठेवले. या विरोधात आम्ही महापालिकेकडे तक्रार केली. यावर महापालिकेने ८ जुलै २०२५ रोजी बिल्डरला बांधकाम थांबवण्यास आदेश दिले होते मात्र बिल्डरने बांधकाम सुरूच ठेवले आहे.

या बांधकाम परवान्याची मुदत याआधीच संपलेली आहे. त्यामुळे बिल्डर बांधकाम परवाना नूतनीकरण करण्याच्या प्रयत्नात असून तसा अर्ज आपल्याकडे आल्यास तो मंजूर करण्यात येऊ नये. अनधिकृत बांधकाम बिल्डरने स्वतःहून काढून घेण्याबाबत महापालिकेने आदेश द्यावेत. या आदेशाचे पालन न झाल्यास महापालिकेने कारवाई करावी व बिल्डरवर कारवाई करण्यात यावे, अशी मागणी यासीन जहागीरदार यांनी केली आहे.

# विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सवाची मिरवणूक यंदा डॉल्बी, डीजे, लेसरमुक्त

## झाडे लावा झाडे जगवा उपक्रम राबवणार : शाबादे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

विजापूर रोड मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची श्री विसर्जन मिरवणूक यंदा डॉल्बीडीजे व लेसर शो मुक्त राहणार आहे, अशी माहिती मंडळाचे संस्थापक विजय शाबादे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मंडळाची स्थापना ४० वर्षांपूर्वी करण्यात आली. यंदा श्री विसर्जन मिरवणूक डॉल्बी डीजे व लेसर शोशिवाय करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. या निर्णयाला साथ न देणाऱ्या मंडळांना पोलिसांनी मिरवणुकीत सहभागी होण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी मंडळातर्फे पोलिसांकडे करण्यात आली आहे. एवढेच नव्हे डॉल्बी डीजेवर शासनाने बंदी घालावी अशी मागणी केली आहे.

यंदा उत्सव काळात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी समाजात वावरताना जबाबदारीने कसे वागावे याबाबत जागृतीपर कार्यक्रम घेण्यात येणार आहे. यंदाच्या मिरवणुकीत आम्ही सर्व मंडळाना पारंपारिक वाद्यांचे लेझिम, ढोल, ताशा याचाच वापर करावा, असे आवाहन करीत आहोत. या उत्सवात आळंदीचे महाराज यांचे तीन दिवसीय प्रवचन व्दारकाधीश मंदिर येथे ठेवण्यात आले आहे. महिला व पुरुष यांची भजनदेखील स्पर्धा घेणार आहोत. दरसाल प्रमाणे याही वर्षी झाडे लावा झाडे जगवा हा उपक्रम राबवणार असून आत्तापर्यंत ५३८७ झाले लावलेली आहेत व ४१८५ झाडे जगवली आहेत. जेथे पाया तेथे छाया हा उपक्रम गेली दहा वर्षे राबवत आहोत.

त्यामुळे जुळे सोलापूर भागात घर बांधत असतांना घरमालकांना एक रोप देऊन सहकार्य करीत आहोत. याचबरोबर देहदान, नेत्रदान, अवयवदान याच्या प्रचार व प्रसाराचे कामदेखील करीत आहोत, असे शाबादे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस उत्सव अध्यक्ष रवींद्र भोपळे, सचिव प्रसाद गाजरे, सुजाता म्हेत्रे, वैशाली माशाळ, बाळासाहेब पाटील, ॲड. संदीप बेंद्रे आदी उपस्थित होते.

# एन. बी. नवले सिंहगडमध्ये उद्योजकता व नवोपक्रमाला चालना

## लीन स्टार्टअप व एमव्हीपीवर चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग व इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिल तर्फे लीन स्टार्टअप व किमान व्यवहार्य उत्पादन या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.



सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या चर्चासत्रात प्रमुख पाहुण्या स्वाती मुसाके यांनी विद्यार्थ्यांना लीन स्टार्टअपची तत्त्वे व मर्यादित संसाधनांत उद्योजकीय प्रवास कसा सुरू करता येतो याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी एमव्हीपी तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत प्रत्यक्ष उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले.या वेळी उपप्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे, डॉ. विजय बिरादार, डॉ. एम. एच. नायकवाडी, प्रा. एस. टी. जगताप समन्वयक प्रा. आर. डी. चव्हाण यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांनी विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणाबरोबरच नवोपक्रम व उद्योजकता आत्मसात करण्याचे आवाहन केले.तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात सक्रिय सहभाग घेतला. प्रश्नोत्तर सत्रात निधी उभारणी, व्यवसायातील जोखीम, बाजारपेठेतील स्पर्धा यासंबंधी विचारलेल्या प्रश्नांना श्रीमती मुसाके यांनी समाधानकारक उत्तरे दिली. विभागप्रमुखांनी अशा उपक्रमांच्या सातत्याने विद्यार्थ्यांमध्ये नवनवीन कल्पना व उद्योजकतेस चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्यांना रोजगारक्षमतेसोबतच स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी दिशा मिळेल, असा आशावाद कार्यक्रमाच्या शेवटी व्यक्त करण्यात आला.



# ४१ हजार बहिणींकडून फडणवीस यांना राख्या

**सोलापूर दि.२२ ऑगस्ट-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बहिणींनी प्रेम व श्रद्धेच्या निशाणी म्हणून राख्या पाठविण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

शहर व जिल्ह्यातील ८ संघटनात्मक मंडळातून तब्बल ४१ हजार बहिणींनी राख्या पाठवल्या. या सर्व राख्या मुंबई येथे पोहोचणार आहे. यावेळी भाजपा अध्यक्ष रोहिणी तडवळकर, महिला मोर्चा अध्यक्षा विजया वड्डेपल्ली, सावित्री पल्लाटी, शारदा तवटी, अंजली वलसा, ललिता चौगुले, सुनिता कोरे, कार्यालय प्रमुख श्रीहरी म्याकल, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, अंबादास बिंगी, नागेश गंजी, बाशाभाई शेख, इजाज सय्यद आदी उपस्थित होते.या उपक्रमातून सोलापूरच्या बहिणींचे प्रेम, आपुलकी आणि विश्वास देवाभाऊंप्रती अधोरेखित झाला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### मंद्रूपच्या सकळेश्वर यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम; रविवारी पालखी मिरवणूक

**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**


मंद्रूप गावचे ग्रामदैवत श्री सकळेश्वर देवस्थानची पारंपरिक यात्रा यावर्षी २४ ऑगस्ट रोजी भक्तिभावात संपन्न होणार आहे. ही जत्रा नेहमीप्रमाणे श्रावण मास संपल्यानंतर अमावास्येच्या दिवशी आयोजित केली जाते. यात्रेच्या पूर्वसंध्येला म्हणजेच २३ ऑगस्ट शनिवार रोजी रात्रभर भजन-कीर्तन व विणा पकडण्याचे कार्यक्रम होणार आहे. गावातील भक्तमंडळींच्या सहभागाने रात्रीचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम रंगणार आहेत. २४ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता श्री सकळेश्वर मूर्ती पालखी मिरवणुकीस प्रारंभ होणार असून संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता पालखी देवस्थान परिसरात आल्यानंतर महापूजा व आरती संपन्न होईल. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग असून, सर्वांनी भक्तिभावाने यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन श्री सकळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सतीश मेंडगुदले यांनी केला आहे.



### मोडनिंब येथे रविवारी तिरंगा चषक बुद्धिबळ स्पर्धा

**मोडनिंब, दि.२२ ऑगस्ट-**

स्वातंत्र्यदिनानिमित्त सोलापूर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने 'तिरंगा चषक' जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन तनिष्का चेस अकॅडमी यांच्यातर्फे करण्यात आले आहे. ही स्पर्धा येत्या रविवारी सकाळी ९ वाजता शिवपार्वती मंगल कार्यालय मोडनिंब येथे होणार आहे. अंकुर फाउंडेशन हे स्पर्धेचे प्रायोजक आहेत.स्पर्धा तीन वयोगटांतर्गत होणार आहे. १४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील व खुला वयोगट असे वयोगट असून प्रत्येक वयोगटातील विजेत्यांना आकर्षक रोख बक्षिसे व पदक देण्यात येणार आहेत.याशिवाय, माढा तालुक्यातील सर्व वयोगटातील खेळाडूंसाठी स्वतंत्र विशेष बक्षिस योजना जाहीर करण्यात आली आहे. नोंदणी प्रक्रिया ऑनलाइन आहे. स्पर्धा स्विस लीग पद्धतीने खेळवली जाणार आहे. सहभागी खेळाडूंनी खासगी चेसबोर्ड, ओळखपत्र, जेवणाचा डबा व पाण्याची बाटली आपल्याकडे आणणे अनिवार्य आहे.बुद्धिबळ ही व्यक्तिमत्त्व विकास घडवण्याची स्पर्धा आहे, या स्पर्धेत सहभागी व्हा असे आवाहन तनिष्का चेस अकॅडमीचे परमेश्वर सुरवसे यांनी केले आहे.



### तंटामुक्त अध्यक्षपदी संजय होळे यांची पुनश्च निवड


**अक्कलकोट, दि. २२ ऑगस्ट-**

घोळसगाव ग्रामपंचायत येथे ग्रामभेमध्ये संजय मल्लिनाथ होळे यांची महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी बहुमताने पुनश्चः निवड करण्यात आली. निवडीच्याप्रसंगी घोळसगावचे सरपंच राजशेखर कीवडे ग्रामसेवक चव्हाण सर्व ग्रामपंचायत सदस्य अंगणवाडी सेविका मदतनीस आशाताई व सर्व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. संजय होळे यांचां यानिमित्याने सत्कार सदनशील शेतकरी मीयासाहेब फकीर यांच्या हस्ते करण्यात आल. ग्रामसभेमध्ये विविध विषयावर चर्चा करण्यात आली सभेमध्ये मागील झालेले कामाचे माहिती दिली चालू कामाबद्दल सुद्धा चर्चा करण्यात आली. सभेला बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते तंटामुक्त अध्यक्ष संजय होळे यांची पुनश्च निवड करून ग्रामसभा व ग्रामस्थांनी त्यांच्यावर मोठा विश्वास व्यक्त केला.

### शेटफळ येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**मोडनिंब, दि.२२ ऑगस्ट-**

सोलापूर पुणे महामार्गावर शेटफळ गावाजवळ शुक्रवार (दि. २२) रोजी सकाळी साडे दहा वाजण्याच्या सुमारास उड्डाणपुलावर मोडनिंब वरून वडाचीवाडी येथे जात असताना दुचाकी क्र. (एम. एच. ४५ए.टी.०२६०) या दुचाकीला भरधाव वेगाने जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने बाजूने जोरदार धडक देऊन झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराच्या डोक्यावरून टायर गेल्यामुळे तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातातील मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव बापू हरिबा निळे (वय ३०, वर्षे रा. वडाचीवाडी तालुका.माढा, जिल्हा सोलापूर) असे आहे. सदर अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाला मोहोळ येथील खासगी रुग्णवाहिकेमधून वरवडे टोल नाका येथील डॉ.महेंद्र ताकतोडे आणि रुग्णवाहिका चालक सागर फाटे आणि शेटफळ येथील ग्रामस्थांच्या यांच्या मदतीने मोहोळ येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल केले असून या अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल प्लाजा येथील ग्रस्तीपथक प्रमूख उमेश भोसले, ग्रस्तीवाहन चालक नागनाथ भालेराव, सहाय्यक स्वप्नील शिंदे आणि मोडनिंब महामार्ग पोलिस मदत केंद्राचे अधिकारी किरण आवताडे आणि त्यांचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.सदर अपघाताची माहिती मोहोळ पोलिस स्टेशन येथील अपघात विभागाचे अधिकारी क्षिरसागर यांना दिली असल्याची माहिती वरवडे टोल प्लाझा येथील गस्तीपथकाचे प्रमुख उमेश भोसले यांनी दिली आहे.



# पिंपरीत वाघाचा हल्ला? रेडी ठार झाल्याने वनविभाग सतर्क

■ वैराग भागात वाघाचा वावर

■ यावली, ढोराळे मध्ये घबराट

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २२ ऑगस्ट-**

गुरुवारी भरदिवसा ढोराळे येथे हल्ला करून बैलाला ठार मारल्याची घटना ताजी असतानाच आज पुन्हा पिंपरी येथे एक रेडी ठार मारल्याचे प्रकरण समोर आले आहे. या दोन्ही घटनांमध्ये वन्यप्राणी बिबट्या की वाघ याबाबत वन 0f0 .वभाग संभ्रमा अवस्थेत होते. मात्र ठसे तज्ञांनी दिलेल्या अहवालानुसार दोन्ही ठिकाणी हल्ला करणारा वाघच असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे वैराग भागात पुन्हा एकदा वाघाचे अस्तित्व आढळून आले असून ग्रामस्थांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी असे आवाहन वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या आठ दिवसांपासून भोगावती नदीच्या तीरावरती वसलेल्या मोहोळ ,माढा आणि बार्शी तालुक्यातील गावांमध्ये सतत होत असलेल्या वन्यजीव प्राण्यांच्या हल्ल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मागील बुधवारी बार्शी तालुक्यातील यावली मध्ये महेश मदने यांच्या द्राक्ष बागेत तर मंगल चंद्रकांत तुरे यांच्या मोसंबीच्या बागेमध्ये वन्यजीवांचे ठसे आढळून आले होते. हे ठसे बिबट्याच्या ठशापेक्षा मोठे असल्यामुळे ते वाघाचे ठसे असू शकतात असा अंदाज वनविभागाचा होता. त्यामुळे त्यांनी या ठशांचे फोटो ठसे तज्ञांकडे पाठवले होते. दरम्यान दुसऱ्या दिवशी लगेच यावली गावाला लागून असलेल्या ढोराळे गावाच्या हद्दीमध्ये या अज्ञात वन्यजीवाने हल्ला करून नितीन पाटील यांच्या बैलाला ठार मारले. हा हल्ला भर दिवसा झाल्यामुळे ग्रामस्थ चांगलेच भयभीत झाले. या ठिकाणी देखील वन्य प्राण्याचे ठसे आढळून आले होते. ते ठसे वन विभागाने ठसे तज्ञांच्या कडे पाठवले होते. त्यानुसार ठसे तज्ञांनी अहवाल दिला असून यावली आणि ढोराळे येथील ठसे वाघाचेच असल्याचे निष्पन्न झाले आहे. गुरुवारी ही घटना घडल्यानंतर तेथून सुमारे पंधरा ते वीस किलोमीटर अंतरावर असलेल्या पिंपरी येथे शुक्रवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास माधव झेंडे यांच्या रेडी वरती वाघाने हल्ला करून ठार मारले आहे. रेडीच्या अंगावरती खोलवर जखमा झालेल्या असून या ठिकाणी वाघाचे ठसे आढळून आलेले आहेत. पिंपरी येथील ठसे स्पष्ट असून वाघाचे असल्याचे निष्पन्न झाले आहे. हा वाघ यावली ढोराळे या गावांपासून पिंपरी गावांपर्यंत पोहोचला आहे येथून पुढे तो येडशी अभयारण्याकडे जाऊ शकतो असा अंदाज वनविभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. यापूर्वी वैराग भागात आठ महिन्यांपूर्वी वाघ येऊन गेला होता त्यावेळेस देखील त्याने बैल, वासरू, रेडकु यांच्यावर हल्ला केल्याच्या घटना घडल्या होत्या. आता पुन्हा एकदा वाघाचा वावर या भागात वाढला आहे. यातील ढोराळे यावली पिंपरी या गावांमध्ये मात्र तो पहिल्यांदाच आल्याचे दिसून येत आहे. ग्रामस्थांसह शेतकऱ्यांनी घाबरून न जाता वन विभागाच्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन वनविभागाने केले आहे.




### बार्शीचे विठ्ठल काळे यांना दोन राज्याचा बेस्ट ॲक्टर पुरस्कार

■ पणजी येथील राज्य चित्रपट सोहळ्यात प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ ऑगस्ट-**

गोवा राज्य सरकारचा १० वा गोवा राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा १४ ते १७ ऑगस्ट रोजी पणजी येथे संपन्न झाला. या मानाच्या पुरस्कार सोहळ्यात अभिनेता विठ्ठल काळे याला काजरो (The Bitter tree) या कोकणी भाषेत असलेल्या चित्रपटातील अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता ज्युरी पुरस्कार मिळाला आहे.

महाराष्ट्र आणि गोवा या दोन्ही राज्याचा सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार मिळवणारा विठ्ठल काळे हा पहिला अभिनेता ठरला आहे. कोकणी भाषा येत नसतानाही त्या भाषेचा अभ्यास करुन त्याने ही भूमिका साकारली आहे. काजरो या कोकणी चित्रपटाला ६७ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला आहे. गेल्या वर्षी मुंबईतील राज्य ५८ व्या चित्रपट पुरस्कार सोहळ्यात अभिनेता विठ्ठल काळे याला 'बापल्योक' या मराठी भाषेतील चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता, सर्वोत्कृष्ट कथा आणि सर्वोत्कृष्ट संवाद असे महाराष्ट्र शासनाचे एकूण तीन पुरस्कार मिळाले होते. विठ्ठलने बापल्योक, पुनःश्च हरिओम, लाईक आणि सब्स्क्राईब, घर बंदूक बिर्याणी, राक्षस, हॉटेल मुंबई या चित्रपट आणि मानवत मार्डर्स, या वेब सिरीजमध्ये लक्षवेधी अभिनय केला आहे. विठ्ठलने दोन्ही राज्य, निवड समिती, परीक्षक, दिग्दर्शक, सहकलाकार आणि निर्माते यांचे आभार मानत आनंद व्यक्त केला. पुरस्कारांमुळे माझ्यावर जबाबदारी आणखीन वाढली आहे, शाच उत्तमोत्तम चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळावी ही इच्छा देखील व्यक्त केली आहे.



# पिलीव येथे श्री संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न

**तभा वृतसेवा,**
**पिलीव दि २२ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे नाभिक समाज संघटनेच्या वतीने श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी नागोबा मंदिरामध्ये अतिशय भक्तिमय वातावरणामध्ये साजरी करण्यात आली.

यावेळी गुरुभक्ती भूषण हरिहर नंदन महाराज उर्फ रवींद्र करमाळकर यांच्या कीर्तनाने व त्यांच्या अमृतवाणीतून श्री संत सेना महाराज यांच्या जीवनावरील सर्व प्रसंग कथन करण्यात आले. पिलीव, झिंजेवस्ती, सुळेवाडी, भैसवस्ती, कुसमोड, चांदापुरी, काळमवाडी ,सुळेवाडी येथील भजनी मंडळांनी साथ दिली. नामाचा गजर करत पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संत सेना महाराज हरिहर महाराज व पांडुरंगाच्या आरती होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी सभापती संग्रामसिंह जहागिरदार, पिलीव सोसायटीचे चेअरमन किसन सातपुते, माजी सरपंच अमोल मदने, संग्राम पाटील, अविनाश जेऊरकर, कल्याण जावळे, संतोष पडळकर, सागर मेटकरी, सिद्धिविनायक गणेश मंडळाचे पदाधिकारी, पत्रकार, नाभिक समाजाचे आजी-माजी पदाधिकारी तसेच सर्व घटकातील भाविक भक्त, ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी संत पूजन ग्रामपंचायतचे माजी सदस्य पोपट दत्तात्रय काळे यांनी केले. अध्यक्ष मंगेश वाघमारे, उपाध्यक्ष अमोल काळे, खजिनदार सारंग काळे, सचिव सचिन देवकर, आदिनाथ शिंदे, माजी अधयक्ष निलेश शिंदे, रघुनाथ देवकर, सचिन वाघमारे, विकास देवकर, नंदकुमार काळे, प्रशांत काळे, सारंग काळे, यांच्यासह नाभीक संघटनेचे आजी माजी पदाधिकारी, समाजबांधव, महीला यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. समाजातील तरुणानी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले

### झिंजेवस्तीच्या अनुजा मदने सहाय्यक आयुक्तपदी नियुक्त

**पिलीव, दि २२ आगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील अनुजा लहु मदने यांची नुकतीच बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यकारी सहाय्यकपदी निवड झाली आहे.



अनुजा हिचे शिक्षण इलेक्ट्रिकान्स व टेलिकम्युनिकेशन यामध्ये झाले असुन त्या यापुढे अभियंता पदासाठी प्रयत्नशील राहणार आहेत. अनुजा ह्या मुळच्या झिंजेवस्ती गावच्या असुन त्या झिंजेवस्ती गावचे माजी उपसरपंच गोविंद एकनाथ मदने यांच्या नातसुन आहेत.अनिता मदने यांच्या हया निवडीबद्दल झिंजेवस्ती, पिलीव परीसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडुन अभिनंदन व कौतुक होत आहे.



### देहाचा अहंकार बाळगू नका : देहूकर

**वेळापूर, दि.२२ ऑगस्ट-**

मनुष्य आपल्या जीवनात किती जगतो या पेक्षा कसा जगतो याला अतिशय महत्व असून आपल्या जीवनातील कर्म जर चांगल्या पद्धतीने केले तर त्याला कोणतेही पातक लागू शकत नाही. मनुष्याने आपल्या देहाचा अहंकार न बाळगता सदाचाराने जीवन जगावे असे प्रतिपादन ह. भ.प बापूसाहेब महाराज देहूकर यांनी कीर्तनातून व्यक्त केले.

कै. गजेंद्र काळे यांचे प्रथम पुण्यस्मरणार्थ मळोली येथे आयोजित कीर्तनात ह.भ.प गुरुवर्य बापूसाहेब देहूकर यांनी जगतगुरू तुकाराम महाराज यांच्या क्षणोक्षणी हाची करावा विचार । तरावया पार भवसिंधू ।। या अभंगावर चिंतन केले. जोपर्यंत आई वडिल जिवंत आहेत तोपर्यंत सेवा करण्याचे आवाहन केले. कोट्यावधीची संपत्ती नव्हे तर कार्यचं महत्वाचे असल्याचे ते म्हणाले. मळोली, कुसमोड, इंदापूर भजनी मंडळ व मृदूंगाचार्य समाधान शिंदे व माऊली घोरपडे यांनी कीर्तनासाठी साथ दिली.

### सिद्धापूर पूलासाठी साडेसहा कोटी मंजूर

■ आमदार आवताडे यांच्या प्रयत्नांस यश

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. २२ ऑगस्ट-**

मंगळवेढा तालुक्यातील सिद्धापूर येथे पूल बांधकामासाठी साडेसहा कोटी एवढा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासूनचा संघर्ष आणि पाठपुरावा अखेर प्रत्यक्षात आला आहे. अखेर आमदार समाधान आवताडे याच्या प्रयत्नांस यश आले आहे.

सिद्धापूर भागातील नागरिकांच्या दळणवळण तसेच दैनंदिन वाहतुकीच्या दृष्टिकोनातून हा पूल बांधणे अतिशय गरजेचे होते. त्यासाठी या भागातील नागरिकांनी आमदार समाधान आवताडे यांना वेळोवेळी प्रत्यक्ष भेटून तसेच सदर मागणीचे निवेदन देऊन हा पूल बांधकामासाठी निधी मंजूर करून द्यावा अशी मागणी केली होती. कारण सिद्धापूर-



वडापूर असा मार्ग असणाऱ्या या पुलावरून मंगळवेढा व दक्षिण सोलापूर या दोन्ही तालुक्यातील अनेक नागरिक, नोकरदार, विद्यार्थी तसेच छोटे मोठे व्यवसाय करणारे व्यापारी आणि शेतकरी आपला दैनंदिन वावर ठेवत असतात. आमदार आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार व पालकमंत्री जयकुमार गोरे तसेच संबंधित खात्यातील अधिकारी पदाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करून या पुलासाठी निधी मंजूर करून आणला आहे. शासनाकडून निधीची तरतूद झाल्याने या पुलाच्या बांधकामाचे प्रत्यक्ष काम लवकरच चालू होणार आहे.

### निंबळक येथे व्यसनमुक्ती रणरागिणी कार्यशाळा

■ एकता महिला मंचाच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २२ ऑगस्ट-**

एकता महिला मंचच्या वतीने निंबळक येथे महिलांसाठी व्यसनमुक्ती रणरागिणी प्रशिक्षण कार्यशाळा व मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व्यसनमुक्ती तज्ञ डॉ. संदीप तांबारे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. मंचच्यावतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ. तांबारे यांनी कुटुंबाचे व्यसनापासून संरक्षण करण्यासाठी प्रतिबंधक योजनांचे प्रशिक्षण दिले. व्यसनमुक्ती उपचारानंतरचे आर्थिक नियोजन याबद्दल त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी कुटुंब समुपदेशक ॲड अंकिता देवळे, मानसोपचार तज्ञ मृणाली निमोरे, मंचचे प्रभाकर क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी निंबळकच्या प्रमुख राणी पाटील, सोनाली भराटे, योगिता पाटील, राणी जगताप, जयश्री पाटील, सुनीता निंबाळकर, पद्मिनी पाटील, मानसी भिसे, वंदना पाटील, सविता पाटील, सिंधुबाई पवार, लक्ष्मी निंबाळकर, सुरेखा जगताप, गोदाबाई जाधव, भाग्यश्री जाधव, शांता जाधव,अलका कांबळे, सरुबाई कांबळे, कांता जाधव, मंगल भराटे, लक्ष्मी जाधव, रोहिणी भराटे, फर्जना शेख, उज्वला पवार, शुभांगी भराटे, मनीषा भराटे, प्रतीक्षा वाघमारे, आशाबाई पाटील, सविता कांबळे, इंदुबाई वाघमारे, सुनीता कांबळे, कीर्तन कांबळे, रेश्मा नावडकर, कविता जाधव, अर्चना पाटील, सुनीता वाघमारे, पल्लवी वाघमारे आदीसह गावातील अन्य महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन व प्रास्ताविक मानसी भिसे यांनी केले. आभार प्रभाकर क्षीरसागर यांनी मानले.



# आंतरराष्ट्रीय केळी निर्यातीबद्दल 'विठ्ठलगंगा'चा सन्मान

■ तामिळनाडूच्या तिरूचिरापल्ली येथील राष्ट्रीय केळी केंद्रात झाला कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.२२ ऑगस्ट-**

तामिळनाडूतील तिरुचिरापल्ली येथे राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राच्या ३२ व्या वर्धापन दिन व किसान मेळाव्याच्या औचित्याने आयोजित समारंभात, विठ्ठलगंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, सोलापूर यांना गौरविण्यात आले.

हा पुरस्कार केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या संघटनात्मक बळकटीकरणासाठी, शाश्वत शेती पद्धतींसाठी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दर्जेदार भारतीय केळी निर्यात करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राकडून मिळालेला हा सन्मान विठ्ठलगंगा एफपीसीएलच्या सातत्यपूर्ण कार्याची राष्ट्रीय स्तरावर घेतलेली दखल आहे.




महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हा हा देशातील सर्वात मोठ्या केळी उत्पादक पट्ट्यांपैकी एक आहे. या भागातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय व शाश्वत शेती पद्धती, निर्यातीसाठी आवश्यक दर्जा नियंत्रण व प्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम विठ्ठलगंगा एफपीसीएलने केले आहे. संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडले गेले असून, त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव व दर्जा प्रमाणपत्र मिळवून देण्यात यश आले आहे.

संस्थेने केवळ निर्यात वाढवली नाही तर शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याकरिता अनेक उपक्रम राबवले आहेत. अत्याधुनिक पॅक हाऊस सुविधा, मोठ्या क्षमतेचे कोल्ड स्टोरेज, आधुनिक प्रयोगशाळा, गुणवत्ता तपासणी यंत्रणा, शेती निविष्ठा विक्री केंद्रे आणि शेतमालाचे थेट करार पद्धतीने विक्री यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

या प्रसंगी राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राचे संचालक डॉ. सेल्वाराजन यांनी विठ्ठलगंगा एफपीसीएलच्या कार्याचे कौतुक करताना, संशोधनाधिष्ठित शेती, दर्जा नियंत्रण आणि निर्यातीसाठी लागणाऱ्या वैज्ञानिक पद्धती यांचा प्रभावी वापर करून विठ्ठलगंगा एफपीसीएलने देशातील इतर एफपीसीएलसाठी आदर्श निर्माण केला आहे, असे प्रतिपादन केले.

या सन्मानाबद्दल विठ्ठलगंगा कंपनीचे चेअरमन श्री धनराज शिंदे म्हणाले की, हा पुरस्कार केवळ आमच्या संस्थेचा नाही तर प्रत्येक शेतकरी सदस्याच्या मेहनतीचा आणि सर्व भागीदारांच्या विश्वासाचा गौरव आहे. संस्थेच्या स्थापनेपासून आम्ही शेतकऱ्यांना थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील आहोत.आगामी काळात विठ्ठलगंगा एफपीसीएलचे ध्येय शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे, आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रक्रिया व पॅकिंग युनिट्स उभारणे, नव्या बाजारपेठांशी व्यापार करार करणे तसेच भारतीय केळीला ‥जागतिक ब्रॅण्ड‥ म्हणून ओळख निर्माण करणे हे असेल.

या पुरस्कारामुळे विठ्ठलगंगा एफपीसीएलने भारताच्या केळी निर्यात क्षेत्रात आपली ठळक ओळख निर्माण केली असून, भारतीय कृषी उत्पादनांना जागतिक स्पर्धात्मकता व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी एक भक्कम पाऊल उचलले आहे. यावेळी डॉ. तुशार कांती बेहरा संचालक, आयसीएआर-आयआयएचआर, बेंगळुरू, डॉ. पी. गोविंदराज संचालक, आयसीएआर-एसबीआय, कोइंबतूर, डॉ. आर. थंगावेलू संचालक, आयसीएआर-एनआरआयआयपीएम, दिल्ली, डॉ. आर. सेल्वाराजन संचालक, आयसीएआर-एनआरसी बनाना, तिरुचिरापल्ली, जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष व जागतिक केळी तज्ञ डॉ. के. बी. पाटील जैन इरिगेशनचे अनिल पाटील तसेच विविध भागातील कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी, प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पिलीव येथील पत्रकार संजय पाटील यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज रत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृतसेवा,**
**पिलीव दि २२ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील पत्रकार संजय पाटील यांना पूणे जिल्हातील आळंदी देवाची येथील शिव प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकार व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना ' राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज रत्न पुरस्कार २०२५., जाहीर झाला आहे.



सदरचा पुरस्कार १४ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता पुणे येथील पत्रकार भवन याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

गेल्या विस वर्षापासून पत्रकार म्हणून व सामाजिक कार्यात भरीव योगदान दिल्याबद्दल सदरचा पुरस्कार संजय पाटील यांना जाहीर करण्यात आले असल्याचे शिव प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले.

पत्रकार संजय पाटील यांना सदरचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल , पिलीव पत्रकार संघ, पिलीव येथील माजी विद्यार्थी सामाजिक संघटना आठवणी ९५ , तसेच पिलीव ,कुसमोड, झिंजेवस्ती परीसरातील शैक्षणिक ,राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, शैक्षणिक क्षेत्रातील मित्र परिवार, माजी विद्यार्थी, नातेवाईक, विविध क्षेत्रातील मान्यवरांकडुन या पुरस्काराबद्दल पत्रकार संजय पाटील सर यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.



## महत्त्वाचे



### हिंदू धर्मशास्त्रानुसार 'गणेशोत्सव मूर्ती विसर्जना'चे नियोजन करण्याची मागणी

**हिंदु जनजागृती समितीचे आयुक्तांना निवेदन**

**सोलापूर, दि.२२ ऑगस्ट-**

गेल्या काही वर्षात विविध ठिकाणी गणेशोत्सव मूर्ती विसर्जनासाठी महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून घनकचरा विभागाच्या गाड्यांचा वापर करणे तसेच गणेशमूर्ती निर्जन स्थळी, खाडीत वा खदानीमध्ये फेकून देण्याचे प्रकार निदर्शनात आले आहेत. हा प्रकार अत्यंत गंभीर असून कोट्यावधी गणेश भक्तांच्या धार्मिक भावना दुखावणारा आहे. त्यामुळे सोलापूर महापालिकेने हिंदु धर्मशास्त्रानुसार गणेशमूर्तीचे विसर्जन होईल यासाठी आवश्यक ते नियोजन करावे अशी मागणी हिंदु जनजागृती समितीच्यावतीने एका निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन सोलापूर महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांना देण्यात आले. यावेळी हिंदु जनजागृती समितीचे दत्तात्रय पिसे, शिवसेना उप जिल्हाप्रमुख बापू ढगे, संदीप ढगे, शिवराज पडशेट्टी, शेखर गोसकि, अग्नी चनमल उपस्थित होते. गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील प्रमुख सार्वजनिक व कौटुंबिक उत्सव असून या वर्षी शासनाने त्याला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. शास्त्रानुसार गणेशमूर्ती वाहत्या पाण्यात विसर्जित करण्याचा धर्मसंस्कार आहे. तेव्हा शासनाने या प्रक्रियेचे पावित्र्य जपणे हे आद्यकर्तव्य आहे. तसेच त्याचा अपमान करणे हा कायद्याने गुन्हा आहे.



### आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी साजरा केला बैलपोळा सण

**सांगोला, दि. २२ ऑगस्ट -**

शेतकऱ्यांचा लाडका सण बैलपोळा सांगोला तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सांगोल्याचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी अचकदाणी गावातील शेतकऱ्यांसोबत एकत्र येऊन हा सण पारंपारिक पद्धतीने साजरा केला. आ.देशमुख यांनी स्वतः बैलांची पूजा करून त्यांना पुरणपोळी, वडे आणि कढीचा नैवेद्य दाखवला. बैल हा शेतकऱ्याचा खरा मित्र आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या या मूक प्राण्यांबद्दल आपण आदर आणि प्रेम व्यक्त करायलाच हवे, असे मत आ.देशमुख यांनी व्यक्त करत शेतकऱ्यांच्या कष्टाचे आणि बैलांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या सहभागाने शेतकरी वर्गामध्ये उत्साह वाढला आणि पारंपारिक सणांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले.




### वडवळ येथे मोहोळ तालुका काँग्रेस कमिटीची बैठक संपन्न

**सोलापूर, दि.२२ ऑगस्ट-**

मोहोळ तालुका काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या अध्यक्षतेखाली वडवळ येथे संपन्न झाली. स्वागत व प्रास्ताविक तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी यांनी केले. आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी गण - गटातून तयारी ठेवावी असे आवाहन शटगार यांनी केले. यावेळी माजी सभापती बाबासाहेब शिरसागर, माजी तालुकाध्यक्ष सुभाष पाटील, प्रदेश सचिव शाहीन शेख, प्रदेश सचिव सुरेश हावळे, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, शहराध्यक्ष किशोर पवार, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष अँड. गजेंद्र खरात, विभक्त जाती भटक्या जमाती विभागाचे नेते सिद्राम पवार, निलेश जरग, लक्ष्मण भालेराव, दमन चव्हाण, रामदास पाटील, तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, सुरेश अप्पा शिवपुजे, सिद्राम पवार, आरिफ पठाण, बिरा खरात ,दत्तात्रेय सावंत ,दाजी कोकाटे, अंजलीताई वस्त्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### पोळा सणानिमित्त श्री विठ्ठलास सुवर्ण अलंकार



**पंढरपूर,दि.२२ ऑगस्ट -**

पोळा सणानिमित्त श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचा कंगनजोड, शिरपेच, मत्स्य जोड, गोफ, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तोडेजोड, पदकासह लॉकेट, बोरमाळ, चंद्रहार, मोहन माळ इत्यादी पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. श्रावणी शुक्रवार निमित्त श्री रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्याची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

# उजनीतून विसर्ग कमी; पुराचा धोका टळला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ ऑगस्ट -**

गेल्या आठ दिवसापासून पुणे जिल्ह्यात दमदार पाऊस पडत होता. या पावसाचे पाणी उजनी धरणात मोठ्या प्रमाणावर येत असल्यामुळे उजनी धरणातून भीमा नदीत मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरु होता. यामुळे चंद्रभागा नदीला पूर आला होता. मात्र पुणे जिल्ह्यातील पाऊस सध्या थांबला आहे. त्यामुळे वरुन उजनीत येणारी पाण्याची आवक कमी झाली आहे. परिणामी उजनी धरणातून भीमा नदीत सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गामध्ये कपात करण्यात आली असल्यामुळे पंढरपूरवरील पुराचा धोका टळला आहे. मात्र असे असले तरी चंद्रभागा ही धोक्याच्या पातळीजवळ पोहोचली असून



सध्या चंद्रभागेच्या पात्रात एक लाख ९० हजार क्युसेक विसर्गाने पाणी वाहत आहे

गेल्या आठ दिवसापासून भीमा आणि निरा खोऱ्यात तसेच पुणे जिल्ह्यात दमदार पाऊस पडत होता. यामुळे उजनी धरणात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक होत होती.

उजनी धरण १०५ टक्के पेक्षा अधिक भरले असल्याने पूर नियंत्रण करण्यासाठी उजनी व वीर धरणातून भीमा नदीत सुमारे एक लाख ९० हजार क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग सुरु होता. यामुळे पंढरपूरात चंद्रभागेच्या पाणी पातळीत कमालीची वाढ झालेली होती. चंद्रभागा नदीने रौद्ररुप धारण केले होते. चंद्रभागेला पूर आला. शहरातील व्यासनारायण व अंबिका नगर झोपडपट्टी येथे पुराचे पाणी गेल्यामुळे सुमारे दोनशे कुटुंबांना प्रशासनाकडून सुरक्षीत ठिकाणी हलविण्यात आले आहे. गुरुवारी रात्री पासून गोपाळपूर रस्त्यावरील दोन्ही पूल पाण्याखाली गेले असल्यामुळे कर्नाटकाकडे जाणारी वाहतूक कासेगाव अनवली मार्गे वळविण्यात आली आहे. दरम्यान दोन दिवसांपासून पुणे जिल्ह्यात पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे उजनीत येणाऱ्या पाण्याची आवक कमी झाली आहे.

सहाजिकच यामुळे उजनी धरणातून भीमा नदी मध्ये सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गा मध्ये कपात करून शुक्रवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास एक लाख ३५ हजार क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग करण्यात आला. त्यानंतर दुपारी एकच्या सुमारास एक लाख १० हजार तर दुपारी साडेतीनच्या सुमारास तो केवळ ८० हजारावर आणण्यात आला. पाण्याच्या विसर्गा मध्ये कपात केल्यामुळे पंढरपूरला होणारा पुराचा धोका तुर्तास तरी टळला असल्याचे दिसून येत आहे.

**वीर धरणातील विसर्गात देखील घट**

वीर धरणातील पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी शुक्रवारी (ता.२२) दुपारी दोन वाजता नीरा नदीच्या पात्रात सुरु असलेला विसर्ग कमी करुन तो ६ हजार ५९५ क्युसेक इतका करण्यात आल्याची माहिती निरा उजवा कालवा विभाग फलटणचे कार्यकारी अभियंत्याकडून देण्यात आली.

## गणेशोत्सव उत्साहात व शांततेत साजरा करा : डगळे

**डीजेचा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ ऑगस्ट -**

पंढरपूर शहर व तालुक्यात सर्वधर्मीय सण, उत्सव आतापर्यंत उत्साहाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरे झाले आहेत. हीच परंपरा कायम ठेवत यंदाचा गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात तसेच डॉल्बीमुक्त वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.



गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या सण उत्सवाच्या निमित्ताने शांतता समितीची बैठक रखुमाई पोलीस संकुल येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दीपक धोत्रे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, टी वाय मुजावर,पोलीस पाटील, रेखा घनवट, मूर्तिकार डीजेचे मालक तसेच शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी सहा. पोलीस अधीक्षक श्री.डगळे म्हणाले, नागरिकांना ध्वनीप्रदुषणाचा त्रास होवू नये यासाठी डीजेचा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करावा. लेजर शोचा वापर टाळावा.पर्यावरण पूरक गणेश मूर्तीची स्थापना करावी. गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपाचा रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. मंडळांनी विविध सामाजिक उपक्रम राबवावेत. महिला, वृद्ध व बालके यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपयोजना कराव्यात. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकांसाठी जे मार्ग तसेच विसर्जनाची जागा निश्चित केले आहेत त्या ठिकाणी विसर्जन करावे तसेच मिरवणुकीसाठी दिलेल्या वेळेची मर्यादा पाळावी. गणेशोत्सव साजरा करताना कुणाच्याही भावना दुखावणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. सोशल मीडियावर तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट करु नयेत. मंडळानी स्वयंसेवक नेमावेत. तसेच सीसीटिव्ही लावावेत.जाहिरात फलक लावतांना आवश्यक परवानगी घ्यावी. जाहिरात फलकावरील मजकुर जातीय, धार्मिक द्वेष निर्माण करणारे नसावेत. वर्गणीसाठी कुणावरही जबरदस्ती करु नये, विसर्जनावेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी.

उत्सव साजरे करताना कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोर पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ढगळे यांनी केले आहे. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनीही यावेळी महत्वाच्या सूचना दिल्या. यावेळी विविध गणेशमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना येणाऱ्या अडचणी तसेच काही सूचना मांडल्या.

**मुख्याधिकाऱ्यांचे आश्वासन**

या बैठकीत मार्गदर्शन करताना पंढरपूर नगरपालिका नगरपालिका प्रशासनाकडून गणेशोत्सवानिमित्त शहरातील रस्त्यांची डागडुजी, मोकाट जनावरे तसेच आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल असे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.



## आमदार आवताडेंनी घेतली बँक अधिकाऱ्यांची बैठक

**पीक, शैक्षणिक, मुद्रा लोनसह विविध महामंडळाचे कर्जाबाबत घेतला आढावा**

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. २२ ऑगस्ट -**

पीक कर्ज वाटप, मुद्रा लोन, विविध महामंडळ, सोसायटी संदर्भातील नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी यंदाच्या कर्ज वाटप समितीची आढावा बैठक पंढरपूर येथे आमदार समाधान आवताडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचायत समितीच्या शेतकी भवन येथे घेण्यात आली.

या बैठकीत सर्व खाजगी आणि सरकारी बँकांचे प्रतिनिधी याचबरोबर मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. याप्रसंगी आमदार आवताडे यांनी पीक कर्ज, शैक्षणिक कर्ज तसेच महामंडळाचे कर्ज वाटप करताना कागदपत्रावरून शेतकऱ्यांची अडवणूक करू नये. तात्काळ कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचना बँकांच्या अधिकाऱ्यांना दिल्या. आमदार आवताडे म्हणाले, बँकांच्या कर्मचाऱ्यांनी बँकेत आलेल्या शेतकरी ग्राहकांशी व्यवस्थितरित्या संवाद साधावा. लाडकी बहीण योजनेचे पैसे पीक विमा रक्कम व इतर अनुदान कर्ज खात्यात जमा करू नये. ज्या कर्जदाराला इन्शुरन्स घ्यायचा नसेल तर त्याला इन्शुरन्स घेण्याची जबरदस्ती करू नये. या बरोबरच कर्जा वाटपा बाबत गावोगावी मेळावे घेऊन शासनाच्या आदेशानुसार सिबिल न पाहता गरजू लोकांना वेळेत कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे अशा सूचना देखील त्यांनी सर्व बँकेच्या अधिकाऱ्यांना केल्या.

**दर तीन महिन्यांनी घेणार बैठक**

इथून पुढे दर तीन महिन्याला शेतकरी आणि बँक अधिकारी यांचे कर्ज वाटपाबाबत बैठक घेतली जाईल असे देखील आमदार समाधान अवताडे यांनी सांगितले

**ग्रामीण बँकेचे काम चांगले**

यावेळी त्यांनी ग्रामीण बँकेचे काम चांगले आहे. परंतु एखाद्या शाखेच्या चुकीच्या कामा मुळे बँकेचे नाव खराब होत असल्याची खंत व्यक्त करत बँकांनी कर्ज देताना कागदपत्रावरून अडवणूक करू नये गरजू लोकांना वेळेत कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या.

## जनमेयजराजे भोसले यांच्या हस्ते पुणे येथील यज्ञाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि २२ ऑगस्ट-**

कोथरूड, पुणे येथील पेशवेकालीन देवदेवेश्वर संस्थानचे मृत्युंजयेश्वर मंदिरातील महामृत्युंजय मंत्राच्या यज्ञाची सागंता उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील व श्री क्षेत्र अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या हस्ते झाली. मंदिरात होमहवन, आहुती व धार्मिक कार्यक्रम हजारो सदभक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी थोरले बाजीराव पेशवे यांचे वंशज व देवदेवेश्वर संस्थानचे विश्वस्त श्रीमंत पुष्करसिंह पेशवे, रमेश भागवत, विश्वस्त, देवदेवेश्वर संस्थान, सुधीर पंडित, सी.ए. व



विश्वस्त, देवदेवेश्वर संस्थान, सचिन कुलकर्णी, मुकूल माधव फौंडेशनचे प्रमुख, कार्यक्रम आयोजक मा.सौ. व संदिप खर्डेकर, प्रवक्ते, महाराष्ट्र प्रदेश (भाजपा) आणि अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त संतोष भोसले, बाबुराव कुलकर्णी, जयंत सुभेदार, संतोष माने, निमंत्रित मान्यवर व उद्योजक आदिजन बहुसंख्येने उपस्थित होते.

# विजयदादांना हरिभाऊ नाना शिंदे फाउंडेशन जीवनगौरव पुरस्कार प्रदान

## स्मृतिदिनानिमित्त १२१ जणांचे रक्तदान; नेत्रतपासणी, रोपवाटप आदी कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२२ ऑगस्ट-**

हरिभाऊ नाना शिंदे फाउंडेशन तर्फे देण्यात येणार जीवनगौरव पुरस्कार माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांना संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. केशव महाराज नामदास व संत सावता माळी महाराज यांचे वंशज रमेश महाराज वसेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वामन उबाळे होते. हरिभाऊ नाना शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त वृक्ष वाटप व संगोपन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शेंडगे हॉस्पिटल यांचे सहकार्याने पाचशे रोपांचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर पुणे येथील बुधरानी हॉस्पिटल यांच्यामार्फत डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये ५० रुग्णांनी सहभाग नोंदवला.

तसेच मोहोळ येथील डॉ.पाटील यांच्या मार्फत विद्यालयातील ५०० विद्यार्थ्यांचे डोळे तपासणी करण्यात आली. तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये १२१ रक्तदात्यांनी रक्त दान केले.

याप्रसंगी माजी जि.प. सदस्य संजय पाटील भिमानगरकर, माजी जि.प. सदस्य संजय पाटील घाटणेकर, राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, सप्तशृंगी पतसंस्था चेअरमन अतुल चव्हान, देवानंद गुंड पाटील, माजी सभापती भारत शिंदे, तुकाराम मस्के यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विलास देशमुख,दादासाहेब जामगावकर,राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, व्हॉ. चेअरमन कुर्मदास साखर कारखाना सुधीर पाटील, माजी जि. प. अध्यक्षा निशिगंधा कोल्हे, बालाजी पाटील, ज्योती कुलकर्णी, विनंती कुलकर्णी, बाबूराव सुर्वे, एम. एस. पाटील, माजी उपसभापती प्रतापराव नलावडे, डॉ. शरद मोरे, पोपट अनपट, सरपंच सुरत्नप्रभा ताकतोडे, काकासाहेब पाटील, माणिक लांडे, शांतीलाल बागवाले, प्राचार्य सुहास माळी, विनायक विद्यालय चे प्राचार्य कुबेर कोरडे, हरिभाऊ शिंदे फाउंडेशन चे अध्यक्ष यशवंत शिंदे सर्व सभासद ग्रामस्थ व माढा तालुक्यातून अनेक प्रतिष्ठित नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश घाडगे यांनी केले,प्रस्ताविक आनंद कुलकर्णी यांनी तर आभार बाबासाहेब शेळके यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फाउंडेशनचे सहसचिव संजय शिंदे, सावता घाडगे, संतोष कोरडे ,यशवंत पाटील, विशाल घाडगे, शहाजी शेळके, विशाल शेळके, विशाल पाटील, शुभम केदार, अजिंक्य शिंदे, आबासाहेब सोलंकर, काटकर , गणेश राऊत आदींनी परिश्रम घेतले.